अध्याय एकतिसावा.

श्रीगणेशायनमः ॥ ॥ ॐ नमो श्रीसद्गुरु अच्युत । तूं देही असोनि देहातीत । गुणीं निर्गुणत्वें वर्तत । देहममत्व तुज नाहीं ॥ १ ॥ देहममता नाहीं निःशेख । तानेपणीं प्यालासी विख । पूतना शोषिली प्रत्यक्ष । दावाग्नि देख प्राशिला ॥ २ ॥ जो तूं वैकुंठपीठविराजमान । त्या तुज नाहीं देहाभिमान । होऊनि गोवळांसमान । हुंबरी घालिशी जाण स्वयें ॥ ३ ॥ तुज पावावया कर्मबळें । सदा सोशिती सोंवळें ओंवळें । तो तूं मेळवूनि गोवळे । जेवणमेळे स्वयें करिसी ॥ ४ ॥ ज्यातें म्हणती दुराचार । तो तूं करूनि व्यभिचार । केला गोपिकांचा उद्धार । हें अगम्य चरित्र वेदशास्त्रां ॥ ५ ॥ घरीं

शंकर-ब्रह्मदेवांसहि अतर्क्य आहे, त्याचें लक्षण मी सांगेन. तरी श्रोत्यांनीं लक्ष द्यावें. ९ श्रीकृष्णाचें निर्याण हाच एकादश स्कंधाचा कळस आहे. ज्याला देहाभिमान नाहीं, तें पूर्ण परिपक्व ब्रह्मच होय. ४१० त्याला जन्म घेण्यास, देहधारण करून वागण्यास व देहत्याग करण्यास भय वाटत नाहीं. ही ब्रह्मपरिपूर्णता हरीनें दाखविली. ११ एकनाथ जनार्दनाला शरण जाऊन पुढील सरस निरूपणाचें सद्गुरुकृपेनें व्याख्यान करील. तरी संतांनीं माझ्याकडे लक्ष द्यावें. ४१२.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार
विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव संवादांतील स्वकुलनिर्दलन
या नांवाचा तिसावा अध्याय समाप्त झाला.

हे सद्गुरो ! अच्युता ! तूं देहधारी असून देहातीत आहेस. गुणी असून निर्गुणत्वानें रहात आहेस. तुला देहाभिमान नाहीं. देहाची ममता नाहीं. १ तूं बालपणींच विष प्राशन केलें होतेंस. पूतनेला प्रत्यक्ष शोषिलेंस. दावाग्नि प्राशन केलास. २ तूं वैकुंठाच्या सिंहासनावर बसणारा असून तुला देहाभिमान नाहीं. तूं स्वतः गवळ्यासारखा होऊन त्यांच्याबरोबर हुंबरी घातलीस. ३ कर्माच्या बळावर तुला पोंचण्यासाठीं कर्मठ लोक सोंवळे ओंवळें करीत बसतात. तो तूं गवळी जमवून त्यांच्या समुदयांत जेवलास. ४ ज्याला दुराचार म्हणतात, तो व्यभिचार करून तूं गोपिकांचा उद्धार केलास. हें तुझें चरित्र वेदशास्त्रांसहि अगम्य आहे. ५ तुझ्या घरीं सोळा हजार स्त्रिया व साठ लक्ष मुली

सोळा सहस्र नारी । नांदसी साठी लक्ष कुमारीं । तरी बाळब्रह्मचारी । सनत्कुमारीं वंदिजे ।। ६ ।। तुझे ब्रह्मचर्याची थोरी । शुक नारद वंदिती शिरीं । हनुमंत लोळे पायांवरी । तूं ब्रह्मचारी नैष्ठिक ।। ७ ।। व्रतबंध नव्हतां आधीं । तुवां भोगिली गोवळी पेंधी । तो तूं ऊर्ध्वरेता त्रिशुद्धी । तुज भीष्म वंदी सर्वदा ।। ८ ।। नवलक्ष गोकंठपाशीं । तुज बांधवेना हृषीकेशी । तो तूं भावार्थें बांधिलासी । रासक्रीडेसी गोपिकीं ।। ९ ।। जैसें जैसें त्यांचे मनांत । तैसतैसा तूं क्रीडा करित । सहा मास रात्रि करूनि तेथ । तत्प्रेमयुक्त विचरसी ।। १० ।। तो तूं कामासी नातळत । कामिनीकाम पूर्ण करित । लाजवूनि विधिवेदार्थ । गोपिका समस्त तारिल्या ।। ११ ।। गोपिका तारिल्या प्रेमाद्भुतें । गायी तारिल्या वेणुगीतें । गौळिये तारिले समस्तें । श्रीकृष्णनाथें निजयोगें ।। १२ ।। कंस तारिला दुष्टबुद्धी । व्याध तारिला अपराधी । ऐसा कृपाळु तूं त्रिशुद्धी । संसारअवधी श्रीकृष्णा ।।१३ ।। नुलंघवे श्रीकृष्णाच्या बोला । यम गुरुपुत्र आणूनि दिधला । तो श्रीकृष्ण निजतनू त्यागिता जाहला । जो नव्हे अंकिला कळिकाळा । ।। १४ ।। भागवतीं कळसाध्यावो । जेथ निजधामा जाईल देवो । तो अति गहन अभिप्रावो । सांगे शुकदेवो परीक्षितीसी ।। १५ ।। कळसावरतें न चढे काम । तेवीं देवें ठाकिल्या निजधाम । राहिला निरूपणाचा संभ्रम । कळसोपक्रम या हेतू ।। १६ ।। वेदशास्त्रार्थनिजनिर्वाहो । देहीं नुपजे अहंभावो । तो हा एकतिसावा अध्यावो । जेथ निजधामा देवो स्वेच्छा निघे ।। १७ ।। कृष्णाचें निजधामगमन । ब्रह्मादिकां अतर्क्य जाण । एका जनार्दनकृपा पूर्ण । विशद व्याख्यान सांगेल ।। १८ ।। दारुकें द्वारके प्रयाण । केलिया निजधामा निघे श्रीकृष्ण । तें निर्याणकाळींचें दर्शन । पाहों देवगण स्वयें आले ।। १९ ।। तेचि अर्थीचें निरूपण । श्रीशुक सांगे आपण । श्रोता परीक्षिति सावधान । कृष्णनिर्याणश्रवणार्थी ।। २० ।।

असतां तूं बालब्रह्मचारी म्हणून तुला सनत्कुमारादि वंदन करितात. ६ तुझ्या ब्रह्मचर्याची थोरवी इतकी आहे कीं, शुक-नारदादि तुला शिरसा वंदन करितात. हनुमान् तुझ्या पायांवर लोळतो. असा तूं नैष्ठिक ब्रह्मचारी आहेस. ७ तुझें उपनयन होण्याच्या आधींच तूं पेंधी गवळणीला भोगिलीस. असा तूं जितेंद्रिय आहेस. तुला भीष्माचार्यहि निरंतर वंदन करीत असे. ८ हे गोपालकृष्णा ! जो तूं नवलक्ष गायींच्या दाव्यांनीं बांधला गेला नाहींस, त्या तुला रासक्रीडेंत गोपिकांनीं बांधिलें. ९ त्यांच्या मनांत जसें जसें आहे तशी तशी तूं क्रीडा केलीस. सहा महिन्यांची रात्र करून तूं त्यांच्याशीं प्रेमयुक्त विहार केलास. १० तो तूं कामाला स्पर्शाहि न करितां स्त्रियांचा काम पूर्ण केलास. वेदाज्ञा बाजूला ठेवून सगळ्या गोपिकांना तारिलेंस. ११ श्रीकृष्णनाथानें निःसीम प्रेमानें गोपिकांना तारिलें. मुरलीच्या गीतानें गायी तारिल्या आणि आपल्या योगसामर्थ्यानें सगळ्या गवळ्यांना तारिलें. १२ दुष्टबुद्धि कंस व अपराधी व्याध यांनाहि तारिलें. हे श्रीकृष्णा ! असा तूं कृपाळु आहेस. तूं संसाराची सीमा आहेस. १३ श्रीकृष्णाच्या शब्दाचें उल्लंघन करवत नाहीं, म्हणून यमानें मृत गुरुपुत्र परत आणून दिला. कळिकाळाच्या स्वाधीन नसलेल्या अशा श्रीकृष्णानें आपल्या देहाचा त्याग केला. १४ हा अध्याय भागवताचा कळस आहे. त्यांत श्रीकृष्ण निजधामाला गेल्याचा प्रसंग वर्णिला आहे. तें अतिशय गंभीर कथानक श्रीशुकाचार्य परीक्षीति राजाला सांगेल. १५ कळस चढविल्यावर मग त्याच्यावरील कांहीं काम उरत नाहीं. श्रीकृष्ण निजधामाला गेल्यावर निरूपणाचाहि भाग उरत नाहीं. म्हणून या अध्यायाला कळस म्हटलें आहे. १६ वेद शास्त्रांचा अभिप्रायहि हाच आहे कीं, देहाभिमान उपजूं देऊं नये. तो हा एकतिसावा अध्याय आहे. यांत श्रीकृष्ण स्वेच्छेनें निजधामाला जाईल. १८ श्रीकृष्णाचें निजधामगमन ब्रह्मदेवादिकांसहि अतर्क्य आहे. परंतु जनार्दनाच्या कृपेनें एकनाथ त्यांचेंहि स्पष्ट व्याख्यान करील. १८ दारुक द्वारकेला गेल्यानंतर श्रीकृष्ण निजधामला जाण्यास निघाला. तेव्हां त्याचें निर्याणकाळचें दर्शन घेण्यासाठीं सगळे देव तेथें स्वतः आले. १९ त्याचेंच निरूपण श्रीशुक करीत आहे व श्रोता परीक्षिति राजा श्रीकृष्णाचें निर्याण ऐकण्यासाठीं सावधान चित्त होऊन बसला आहे. २०.

श्रीशु० उ० –अथ तत्रागमद्ब्रह्मा भवान्या च समं भवः । महेन्द्रप्रमुखा देवा मुनयः सप्रजेश्वराः ॥ १ ॥
पितरः सिद्धगन्धर्वा विद्याधरमहोरगाः । चारणा यक्षरक्षांसि किन्नराप्सरसो द्विजाः ॥ २ ॥
द्रष्टुकामा भगवतो निर्याणं परमोत्सुकाः । गायन्तश्च गृणन्तश्च शौरेः कर्माणि जन्म च ॥ ३ ॥

जो व्यासाचें निजजीवन । जो योगियांचें चूडारत्न । तो स्वयें श्रीशुक आपण । श्रीकृष्णनिर्याण निरूपी ॥ २१ ॥ शुक म्हणे परीक्षिती । निजधामा निघतां श्रीपती । देव दर्शनासी येती । विमानपंक्ती समवेत ॥ २२ ॥ ब्रह्मा सत्वर आला तेथ । भव भवानीसमवेत । इंद्रमुख्य देव समस्त । स्वगणीं युक्त ते आले ॥ २३ ॥ सनकादिक मुनिपंक्ती । आले दक्षादि प्रजापती । आर्यमादि पितर येती । कपिलादि धांवती महासिद्ध ॥ २४ ॥ आले गंधर्व विद्याधर । यक्ष चारण किन्नर । बिभीषणादि राक्षस थोर । वेगीं श्रीधर पाहों येती ॥ २५ ॥ पहावया श्रीरंग । आले पाताळींचे पन्नग । ज्यांते म्हणती महोरग । तेही सवेग पैं आले ॥ २६ ॥ द्विज आले दत्तात्रेयादिक । नारद पाहों आला कौतुक । द्विज पक्षी गरुड-प्रमुख । सत्वर देख ते आले ॥ २७ ॥ रंभा उर्वशी मेनका । अप्सरा ज्या अष्टनायिका । कृष्णदर्शना आवांका । धरोनि देखा त्या आल्या ॥ २८ ॥ कृष्णस्वरूप पहावया । नयनीं थोर घेतला थाया । यालागीं देवसमुदाया । येणें लवलाह्यां जाहलें एथें ॥ २९ ॥

कृष्ण पहावया आवडीं । दृष्टी धांवे लवडसवडीं । होत डोळ्यां आडाडी । अभिनव गोडी कृष्णाची ॥ ३० ॥ श्रीकृष्णाचें निर्याणदर्शन । पहावया उत्साहपूर्ण । सत्वर आले सुरगुण । पुढती कृष्ण-दर्शन आम्हां कैंचें ॥ ३१ ॥ सौंदर्याची निजसीमा । घनश्याम सुंदर प्रतिमा । तो कृष्ण गेलिया निज-

---

[या एकतिसाव्या अध्यायांत भगवान् येथून स्वधमाला गेला. त्यानंतर वसुदेवादिक प्रीतीनें त्यालाच अनुसरले. श्रीकृष्ण प्रथम देवांना यादव करून पुनः त्यांना देव करून स्वेच्छेनें स्वतःच स्वधामांत प्रविष्ट झाला असें वर्णन केलें आहे.]

श्रीशुकः उवाच–श्रीशुकाचार्य म्हणाले, अथ तत्र ब्रह्मा अगमत्–त्यानंतर तेथें ब्रह्मदेव आला, भवान्या च समं भवः–पार्वतीसह शंकर, महेन्द्रप्रमुखाः देवाः सप्रजेश्वराः मुनयः–महेंद्रादि देव, मरीच्यादिकांसह सनकादि मुनी, १ पितरः...द्विजाः–पितर, सिद्ध गंधर्व, विद्याधर महासर्प, चारण, यक्ष, राक्षस, किन्नर, अप्सरा, गरुडलोकवासी पक्षी किंवा मैत्रेयादि ब्राह्मण, २ परमोत्सुकाः भगवतः निर्याणं द्रष्टुकामाः शौरेः कर्माणि च जन्म च गायन्तः च गृणन्तः च–अत्यंत उत्सुक होऊन भगवानाचें स्वलोकीं गमन पहाण्याची इच्छा करणारे व स्तुति करणारे असें होत्साते त्या विष्णूची कर्में व जन्म यांचें गायन करणारे व स्तुति करणारे असे होत्साते तेथें आले. ३.

श्रीव्यासांचा केवल जीवच, योग्यांतील मुकुटमणि, असा श्रीशुकाचार्य स्वतः श्रीकृष्णनिर्याणाचें निरूपण करीत आहे. २१ श्रीशुक म्हणाले–हे परीक्षित राजा ! श्रीकृष्ण निजधामाला जाण्यास निघतांच विमानांच्या पंक्तीसह देव त्याच्या दर्शनाला आले. २२ ब्रह्मदेव त्वरित आला. पार्वतीसह शंकर दाखल झाले. इंद्रासह सगळे देव आपापल्या गणांसह आले. सनकादिक मुनींचा समुदाय, दक्षादि प्रजापति, अर्यमादि पितर, कपिलादि महासिद्ध, २३ विद्याधर, गंधर्व, यक्ष, चारण, किन्नर, बिभीषणादि थोर राक्षस हे सगळे श्रीहरीला पहावयास आले. २४ पाताळांतील सर्प, ज्यांना महा उरग म्हणजे नाग म्हणतात तेहि त्वरित आले. २६ दत्तात्रेयादि द्विज व नारद तें कौतुक पहावयास आले. गरुड ज्यांत प्रमुख आहे असे पक्षीहि आले. २७ रंभा, उर्वशी, मेनका इत्यादि अप्सरा, अष्टनायिका या सगळ्या श्रीकृष्णदर्शनाच्या उत्सुकतेनें आल्या. २८ नेत्रांनीं श्रीकृष्णाचें स्वरूप पहाण्याचा अतिशय छंद घेतला. त्यासाठीं देवांचा समुदाय तेथें जमला. २९.

श्रीकृष्णाला आवडीनें पहाण्यास दृष्टि मोठ्या गडबडीनें धांवली. नेत्रांची उत्कंठा वाढली. इतकी श्रीकृष्णाचा गोडी विलक्षण होती. ३० श्रीकृष्णाचे निर्याणदर्शन घेण्यास देवांचे समुदाय मोठ्या उल्हासानें सत्वर आले. ते देव म्हणाले 'पुढें आम्हांला श्रीकृष्णाचें दर्शन कोठचें ! ३१ घनश्याम श्रीकृष्णाची सुंदर मूर्ति निजधामाला गेल्यावर मग

धामा । दर्शन आम्हां मग कैंचें ॥ ३२ ॥ श्रीकृष्णदर्शनाची गोडी । सुरनरां लागलीसे गाढी । यालागीं अतितांतडी । आले आवडीं दर्शनार्थ ॥ ३३ ॥ कृष्णकर्मे स्वयें वर्णित । कृष्णचरित्रें गीतीं गात । मिळोनि सुरवर समस्त । आले दर्शनार्थ सत्वर ॥ ३४ ॥

ववर्षुः पुष्पवर्षाणि विमानावलिभिर्नभः । कुर्वन्तः सङ्कुलं राजन् भक्त्या परमया युताः ॥ ४ ॥

विमानश्रेणी आकाशीं । तेथ दाटलिया चौंपाशीं । संमुख देखोनि हृषीकेशी । जयजयकारासी तिंहीं केलें ॥ ३५ ॥ देखोनि श्रीकृष्णनाथ । भक्त्युद्रिक्त जाहलें चित्त । दिव्य सुमनांतें वर्षत । मिळूनि समस्त समकाळें ॥ ३६ ॥ दिव्य सुमनांचा रोळा । कृष्णा चौंपाशीं विखुरला । तेणें कृष्ण शोभला त्या काळां । घनश्यामलीला साजिरी ॥ ३७ ॥

भगवान् पितामहं वीक्ष्य विभूतीरात्मनो विभुः । संयोज्यात्मनि चात्मनं पद्मनेत्रे न्यमीलयत् ॥ ५ ॥

देव पावले शीघ्रगतीं । ब्रह्मा देखिला संमुखस्थिती । सदाशिव समविभूती । त्यातेंहीं श्रीपति देखता जाहला ॥ ३८ ॥ इंद्रादिक निजविभूती । त्यांतें देखोनि श्रीपती । स्वनेत्र पद्मदलाकृती । ते सहजस्थिती झांकिले ॥ ३९ ॥ झांकिले उघडे नयन । परी स्थिति नाहीं अधिकन्यून । तो आत्मा आत्मत्वें परिपूर्ण । तरी कां कृष्ण नयन झांकी ॥ ४० ॥ देखोनि देवसमुदावो । कांहीं न बोलतां देवो । नेत्र झांकावया कोण भावो । तो अभिप्रावो अवधारा ॥ ४१ ॥ द्वारके असतां श्रीकृष्णनाथ । सुरवर प्रार्थूं आले तेथ । तिंहीं विनविला देवकीसुत । कृष्णनाथ अत्यादरें ॥ ४२ ॥ मिळोनि देवांचा मेळ । प्रार्थना

आम्हांला तिचें दर्शन कोठचें !' ३२ श्रीकृष्णाच्या दर्शनाची देव-मानवांना अत्यंत गोडी लागली, म्हणून ते सगळे अतिशय लगबगीनें दर्शन घेण्यास आले. ३३ ते श्रेष्ठ देव श्रीकृष्णाचें चरित्र गात व वर्णन करीत त्याच्या दर्शनाला मोठ्या त्वरेनें आले. ३४.

राजन्—हे राजा ! **विमानावलिभिः नभः सङ्कुलं कुर्वन्तः परमया भक्त्या युताः पुष्पवर्षाणि ववर्षुः—** विमानांच्या पंक्तींनीं आकाशाला व्यापून टाकणारें व परम भक्तीनें युक्त असलेले ते ब्रह्मदेवादि पुष्पांची वृष्टि करिते झाले. ४.

आकाशांत चोहोंबाजूला विमानांच्या पंक्तीची गर्दी झाली. श्रीकृष्णाला समोर पाहून त्या सर्वांनीं जयजयकार केला. ३५ श्रीकृष्णनाथाला पाहून त्यांचें चित्त भक्तीनें आर्द्र झालें व त्या सर्वांनीं मिळून त्यावर एकाच वेळीं पुष्पवृष्टि केली. ३६ दिव्य पुष्पांच्या वर्षावानें श्रीकृष्णाच्या सभोंवार सडा पडला. त्यावेळीं श्रीकृष्णाची सुंदर सांवळी मूर्ति अतिशय शोभली. ३७.

भगवान् विभुः पितात्मनं आत्मनः विभूतीः वीक्ष्य आत्मनि च आत्मानं संयोज्य पद्मनेत्रे न्यमीलयत् तो पूज्य प्रभु पितामहाला व आपल्या इंद्रादि विभूतींना पाहून स्वतःला स्वरूपामध्यें योजून आपले कमलनयन मिटता झाला. [याचा भावार्थ असा पूर्वी त्या ब्रह्मदेवादिकांनीं 'आम्हां किंकरांचे रक्षण कर' अशीं प्रार्थना केलेली असल्यामुळें व आतां ते त्याला आपल्या लोकास नेण्यासाठीं आलेले असल्यामुळें व भगवानांना त्या इतक्या देवांचें मन मोडणें कठीण वाटलें व त्या सर्वांना जणूंकाय मनोविस्मथ असल्या प्रमाणें भगवान् नेत्र मिटता झाला.] ५.

ते देव मोठ्या वेगानें आले. श्रीकृष्णानें समोरच ब्रह्मदेवाला पाहिलें. शंकर आपल्या सर्व गणांसह आला. ३८ आपलेच अंश जे इंद्रादिक त्यांसहि त्यानें पाहिलें व आपले कमलासारखे नेत्र मिटून घेतले. ३९ त्यानें आपले नेत्र झांकले काय व उघडले काय, त्याच्या स्थितींत कांहींच अधिक-उणा बदल होत नाहीं. कारण तो आत्मा आत्मत्वानें परिपूर्ण होता. मग श्रीकृष्णानें नेत्र कां झांकिले ! ४० देवांचा समुदाय पाहून कांहीं न बोलतां नेत्र मिटून घेण्याचें कारण ऐका. ४१ श्रीकृष्णनाथ द्वारकेंत असतां सगळे देवश्रेष्ठ त्याची प्रार्थना करावयास तेथें आले होते. त्यांनीं श्रीकृष्णाला आदरानें विनंति केली होती. ४२ त्या सर्व देवांचा समुदाय मिळून त्यांनीं अशी प्रार्थना केली होती

करिती सकळ । आम्ही तुझे दास केवळ । आश्रम सकळ पुनीत किजे ॥ ४३ ॥ स्वर्लोकादि लोकपाळ । आम्ही तुझे दास सकळ । निजधामा जातां एक वेळ । आश्रम सकळ पुनीत कीजे ॥ ४४ ॥ त्या समस्त देवाप्रती । स्वमुखें बोलिला श्रीपती । यदुकुळक्षयाचे अंतीं । येईन निश्चितीं तेणें मार्गें ॥ ४५ ॥ ऐकोनि श्रीकृष्णवदंती । सुरतर संतोषले चित्तीं । आम्हांसी वश्य जाहला श्रीपती । नोक्ती वचनुल्लंघी ॥ ४६ ॥ ते संधीचा ठाकून ठावो । आला सुरवरसमुदावो । त्याचा छळावया अहंभावो । निजनेत्र पहा हो हरि झांकी ॥ ४७ ॥ देवांचा बहु समुदावो । तेथ मी कोठकोठें जावो । त्यासी ठकावया पहा हो । नेत्र झांकोनि देवो समाधि दावी ॥ ४८ ॥ नाहीं समाधि आणि व्युत्थान । कृष्ण परब्रह्म परिपूर्ण । तोही निजनेत्र झांकून । समाधिलक्षण मृषा दावी ॥ ४९ ॥ स्वच्छंदमृत्यु योगियांसी । ते स्थिती नाहीं श्रीकृष्णासी । अतर्क्यगति शिवादिकांसी । ते परीक्षितीसी शुक सांगे ॥ ५० ॥

लोकाभिरामां स्वतनुं धारणाध्यानमङ्गलाम् । योगधारणयाग्नेय्याऽदग्ध्वा धामाविशत्स्वकम् ॥ ६ ॥

घृत थिजलें विघुरलें । तैसें सगुण निर्गुणत्वा आलें । या नांव योगाग्निधारण बोले । कृष्णें देह दाहिलें हें कदा न घडे ॥ ५१ ॥ कळिकाळासीं जिणोनि जाण । स्वच्छंदमृत्यु योगिजन । ते अग्निधारणा करूनि पूर्ण । स्वदेह जाळून स्वरूप होती ॥ ५२ ॥ कृष्णरूप परिपूर्ण । तो कां करील योगधारण । त्याचा लीलाविग्रही देह जाण । करावें दहन काशाचें ॥ ५३ ॥ देखतां डोळां लागे ध्यान । संपूर्ण जेथें विगुंते मन । एवढें कृष्णसौंदर्य संपूर्ण । निजमोहन जगाचा ॥ ५४ ॥ ज्याचें देखतां बरवेपण । मदन

कीं, ' आम्ही सगळे तुझे केवल दास आहोंत. तरी आमचे सर्व आश्रम पावन करावे. ४३ आम्ही सगळे इंद्रादि लोकपाळ तुझे किंकर आहोंत. तरी निजधामाला जातेवेळीं एकदां आमच्या लोकीं येऊन ते पवित्र करावे.' ४४ त्या सगळ्या देवांना श्रीहरीनें स्वतः सांगितलें कीं, ' यादवकुळाचा नाश झाल्यावर शेवटीं त्या मार्गानें मी येईन.' ४५ हें कृष्णाचें वचन ऐकून देवांना अत्यंत संतोष झाला. ते म्हणाले श्रीहरि आम्हांला वश झाला म्हणून त्यानें आमचें वचन अमान्य केलें नाहीं. ४६ यास्तव आतां त्या संधीचा लाभ घेण्यासाठीं सगळ्या देवांचा समुदाय तेथें आला. त्यांचा अहंकार घालविण्यासाठीं श्रीकृष्णानें आपले नेत्र झांकून घेतले. ४७ देवांचा एवढा मोठा समुदाय आहे. त्यांतील कोठें कोठें म्हणून मीं जावें. असें म्हणून त्यानें त्यांस फसविण्यासाठीं नेत्र मिटून घेतले व समाधिस्थ असल्याचें दाखविलें. ४८ श्रीकृष्ण परिपूर्ण परब्रह्म आहे. त्यास समाधि आणि व्युत्थान नाहीं. पण त्यानेंहि नेत्र मिटून खोटेंच समाधीचें सोंग आणिलें. ४९ योगी इच्छामरणी असतात; पण श्रीकृष्णास तेंहि नाहीं, त्याची गति शंकरादिकांसहि अतर्क्य आहे. तेंच श्रीशुक परीक्षितिराजाला सांगत आहे. ५०.

—योग्यांप्रमाणें हा कदाचित् स्वच्छंदमृत्यु असेल, या भ्रमाचें निवारण करितात—

लोकाभिरामां धारणाध्यानमंगलं स्वतनुं आग्नेय्यां योगधारणया अदग्ध्वा स्वकं धाम आविशत्–लोकांची स्थिति ज्यामध्यें सर्वप्रकारें होते व जें धारणा व ध्यान यांचा विषय आहे, अशा आपल्या शरीराला आग्नेयी धारणेनें न जाळतांच आपल्या स्वरूपांत तो प्रविष्ट झाला [स्वच्छंदमृत्युयोगी आग्नेयी योगधारणेनें आपलें शरीर जाळून लोकान्तरांत प्रवेश करितात. पण भगवान् आग्नेयी योगधारणेनें आपलें शरीर न जाळतांच आपल्या वैकुंठाख्य धामांत प्रवेश झाला कारण त्याचें तें शरीर सर्व लोकांचा आधार होतें. यास्तव त्याचें शरीर जर जळलें असतें, तर त्याच्या आश्रयानें जगाचाहि दाह होण्याचा प्रसंग आला असता. शिवाय तें शरीर धारण व ध्यान यांचा सुंदर विषय आहे. त्यामुळें त्याचा दाह झाला, तर तीं दोन्ही निर्विषय होतील. उपासकांना तशाच प्रकारचा साक्षात्कार व फलप्राप्ति होत असलेली दिसते.] ६.

तूप जसें थिजतें व वितळतें, त्याप्रमाणें श्रीकृष्णाचें सगुणरूप निर्गुणाला प्राप्त झालें. यालाच योगाग्निधारणा म्हणतात. श्रीकृष्णानें आपल्या देहाचें दहन केलें, असें कदापि घडणार नाहीं. ५१ कलि-काळाला जिंकून इच्छा-मरणी योगी अग्निधारणा करून आपला देह जाळितात व आत्मस्वरूपांत मिळतात. ५२ परंतु श्रीकृष्ण पूर्ण अवतार होता; तो योगधारण कशाला करील ! त्याचें लीलाशरीर होतें, तेव्हां दहन कशाचें करणार ! ५३ त्याच्याकडे पाहतां पाहतां तेंच ध्यान लागतें. मन त्याच्याकडे गुंतून रहातें. इतकें श्रीकृष्णाचें सौंदर्य पूर्ण होते. तो सगळ्या जगाला

पोटा आला आपण । लक्ष्मी भुलली देखोन चरण । चैतन्यघन श्रीकृष्ण ॥ ५५ ॥ ज्याचें योगियां सदा ध्यान । शिवादिकां नित्य चिंतन । सकल मंगलांचें आयतन । चैतन्यघन श्रीकृष्ण ॥ ५६ ॥ कृष्ण स्वयें आत्माराम । यालागीं तो जगाचा आराम । लीलाविग्रही घनश्याम । ध्यानगम्य चिद्रूप ॥ ५७ ॥ जैशी घृताची पुतळी । थिजोनि जाहली एके काळीं । तैशी चैतन्याची मुसावली । स्वलीला जाहली कृष्णमूर्ती ॥ ५८ ॥ दावाग्नी प्राशिला प्रत्यक्ष । न चढेचि काळियाचें विख । तो देहचि नव्हे देख । मा मरणात्मक तेथ कैंचें ॥ ५९ ॥ कृष्ण प्रकटे ज्याचे हृदयीं । तो देहींच होय विदेही । मा त्या कृष्णाच्याचि ठायीं । देहत्व कायी असेल ॥ ६० ॥ कृष्णदेहो नाहीं निमाला । तो आभासचि सहजत्वा आला । जैसा दर्पणींचा लोपला । प्रतिबिंब आपला आपुले ठायीं ॥ ६१ ॥ ज्याचें करितां नामस्मरण । भक्तांचें निरसे जन्ममरण । तो कृष्ण पावे जैं मरण । तैं भक्तांसी कोण उद्धरी ॥ ६२ ॥ आत्ममायेचे स्वलीला । कृष्ण कृष्णरूपें प्रकट जाहला । तो लीला त्यागोनि संचला । निजरूपीं ठेला निजत्वें ॥ ६३ ॥ कृष्णें देहो नेला ना त्यागिला । तो लीलाविग्रहे संचला । भक्तध्यानीं प्रतिष्ठिला । स्वयें गेला निजधामा ॥ ६४ ॥ जैसजैसा भक्ताचा भावो । तैसतैसा होय देवो । तो भक्तध्यानीं स्थापूनि देहो । निजधामा पहा हो न वचोनि गेला ॥ ६५ ॥ हो कां कृष्णमूर्ति जरी सगुण । तरी देहदाह न लगे जाण । कृष्णाश्रयें जग संपूर्ण । तेव्हां होईल दहन जगाचें ॥ ६६ ॥ जेणें मायेसी निजपोटीं । दाविल्या ब्रह्मांडांच्या कोटी । त्या कृष्णदेहदाहापाठीं । जगाची गोठा नुरवावी ॥ ६७ ॥ ऐशियाही युक्ति विचारितां । अतिस्थूळ ते योग्यता । कृष्णदेहाची विदेहता । तेथ दाहकता ते कैंची ॥ ६८ ॥ कृष्णाचें असणें जाणें । हें श्रीकृष्णचि स्वयें जाणें । तेथ वेदांचेंही बोलणें । जाणपणें सरेना ॥ ६९ ॥

मोहित करणारा होता. ५४ त्याचें सौंदर्य पाहून स्वतः मदनानें त्याच्या पोटीं जन्म घेतला. आनंदमूर्ति श्रीकृष्णाचे चरण पाहूनच लक्ष्मी भाळली. ५५ योगी ज्याचें सदा ध्यान करितात, शिवादिक ज्याचें चिंतन करितात. जो सगळ्या मंगलाचें अधिष्ठान, तोच चैतन्यघन श्रीकृष्ण होय. ५६ श्रीकृष्ण स्वतः आत्माराम आहे, म्हणून तो जगाचें विश्रांतिस्थान आहे. लीलादेहधारण करणाऱ्या ज्ञानस्वरूप घनश्यामाचें ध्यान अगम्य आहे. ५७ ज्याप्रमाणें तूप थिजून त्याची पुतळी बनावी, त्याप्रमाणें चैतन्यरस ओतून त्याची स्वलीलेनें श्रीकृष्णमूर्ति बनली. ५८ त्यानें प्रत्यक्ष दावाग्नि प्राशन केला. कालियाचें विष त्याला बाधलें नाहीं. तो मर्त्य देहच जर नव्हे, तर त्याला मरण कोठचें ! ५९ ज्याच्या हृदयांत श्रीकृष्ण प्रकट होतो, तो या देहांत असूनहि विदेही होतो. मग त्या श्रीकृष्णाला देहत्व कसें असणार ! ६० श्रीकृष्णाचा देह नष्ट झाला नाहीं. आरशांतील प्रतिबिंब जसें जागच्याजागीं लोपतें तसा तो आभास लीन होऊन आपल्या मूळस्वरूपांत मिळाला. ६१ ज्याचें नामस्मरण केलें असतां भक्तांचें जन्म-मरण नाहींसें होतें, त्या कृष्णाला जर मरण आलें तर भक्तांचा उद्धार कोण करील ! ६२ आपल्या मायेच्या लीलेनें श्रीकृष्ण अवतारी देह घेऊन प्रकट झाला होता. तो लीला टाकून स्वस्वरूपीं आत्मरूपानें लीन झाला. ६३ कृष्णाचा देह कोणीं नेला नाहीं किंवा त्यानें टाकिला नाहीं. तो लीलाशरीरांत ओतप्रोत भरलेला होता. तो भक्तांच्या ध्यानांत ती मूर्ति ठसवून स्वतः निजधामाला गेला. ६४ भक्ताचा जसा भाव तसा देव झाला. त्यानें त्या देहाची प्रतिमा भक्ताच्या ध्यानांत स्थापन करून तो स्वतः न जातांच निजधामाला गेला. ६५ कृष्णाची जरी सगुण मूर्ति होती तरी तें शरीर जळणें शक्य नाहीं. कारण श्रीकृष्णाच्या आश्रयानें सगळें जगत् आहे, तेव्हां त्याच्या देहाबरोबर सगळ्या जगाचें दहन होणार ! ६६ ज्यानें यशोदामातेला आपल्या मुखांत कोट्यवधि ब्रह्माण्डें दाखविलीं, त्या कृष्णदेहाचें दहन झालें म्हणजे जगाचें नांवच संपलें. ६७ असा विचार केला असतां त्याची योग्यताच विलक्षण आहे. श्रीकृष्ण विदेही होता, त्याचें दहन कसें होणार ! ६८ कृष्णाचें रहाणें व जाणें त्याचें त्यालाच माहीत. त्याच्यापुढें वेदाचें बोलणेंहि खुंटतें. त्याचें ज्ञानहि पुरें पडत नाहीं. ६९ ही श्रीकृष्णाची अगम्य गति ब्रह्मदेव व शंकर यांनाहि कळत नाहीं. त्या सर्वांची

हे कृष्णाची अगम्य गती । शिवविरिंच्यादि नेणती । त्यांची कल्पना ऐशी चित्तीं । आम्हांसवें श्रीपति येईल ॥ ७० ॥ ऐसेनि अभिप्रायें पूर्ण । आनंदले सुरगण । अवघे होऊनि सावधान । उल्हासपूर्ण मांडिला ॥ ७१ ॥

दिवि दुन्दुभयो नेदुः पेतुः सुमनसश्च खात् । सत्यं धर्मो धृतिर्भूमेः कीर्तिः श्रीश्चानु तं ययुः ॥ ७ ॥

उल्हासले सुरगण । दिवि दुंदुभि त्राहाटिल्या जाण । दिव्य सुमनें गगनींहून । वर्षले पूर्ण कृष्णावरी ॥७२॥ वैकुंठादि दिव्य संपत्ती । भूलोका आणिल्या श्रीपतीं । तो येतां निजधामाप्रती । आमुच्या आम्हां हातीं देईल वेगीं ॥ ७३ ॥ ऐसे देव उल्हासोनी । पुनःपुनः वर्षती सुमनीं । शिवादि पाहती सावधानीं । अतर्क्यगमनीं हरि गेला ॥ ७४ ॥ आम्ही सकळ मायेचे नियंते । आम्ही सर्वद्रष्टे सर्वज्ञाते । ऐसा अभिमान होता देवांतें । त्यांसी श्रीकृष्णनाथें लाजविलें ॥ ७५ ॥ अलक्ष्य कृष्णाची निजगती । शंभुस्वयंभू नेणती । तेणें विस्मित होती । आश्चर्य मानिती सुरवर ॥ ७६ ॥ देव परमाश्चर्य मानिती । तंव सत्य धर्म धृति कीर्ती । श्रियेसमवेत निघती । सांडूनि क्षिती कृष्णलक्ष्मीं ॥ ७७ ॥ सत्य धर्म श्री धृति कीर्ती । यांची कृष्णचरणीं नित्य वस्ती । यालागीं कृष्णासवें त्या निघती । सांडोनि क्षिती तत्काळ ॥ ७८ ॥ तूं ऐसें मानिसी परीक्षिती । जे सत्य धर्म श्री धृति कीर्ती । निःशेष सांडूनि गेली क्षिती । ऐक ते अर्थीं विचार ॥ ७९ ॥ मज पाहतां श्रीकृष्णमूर्ती । स्थिरावली ज्याच्या चित्तीं । तेथ सत्य धर्म श्रीधृति कीर्ती । साम्राज्यें वसती कुरुराया ॥ ८० ॥ केवळ भक्तानुग्रही । कृष्ण स्वयें लीलाविग्रही । त्या कृष्णाची गती पाहीं । न पडे ठायीं ब्रह्मादिकां ॥ ८१ ॥

अशी कल्पना होती कीं, आमच्याबरोबर श्रीकृष्ण येईल, ७० अशा समजुतीनें तो सगळा देवांचा समुदाय संतुष्ट झाला व त्यांनीं मोठा उत्सव आरंभिला. ७१.

—तेव्हां ' भगवान् आतां आपल्या आपल्या लोकालाच येईल ' अशा भ्रमानें देवादिकांनीं केलेला दुंदुभिनाद, पुष्पवृष्टि इत्यादि महोत्सव झाला, असें सांगतात—

दिवि दुन्दुभयः नेदुः—अंतरिक्षांत दुन्दुभी वाजूं लागल्या, खात् सुमनसः च पेतुः—आकाशांतून पुष्पवृष्टि झाली. सत्यं धर्मः धृतिः कीर्तिः श्रीः च भूमेः तं अनुययुः—सत्य, धर्म, संतोष, कीर्ति व श्री भूमीपासून निघून त्याच्या मागोमाग गेली. ७.

देवांना मोठा आनंद झाला. त्यांनीं स्वर्गांतून दुंदुभी वाजविल्या व आकाशांतून श्रीकृष्णावर पुष्पवृष्टि केली. ७२ वैकुंठादि दिव्य संपत्ति श्रीकृष्णानें पृथ्वीवर आणिली होती, ती आतां स्वधामाला जातेवेळीं तो लगेंच आमच्या स्वाधीन करील ७३ असें समजून त्यांना मोठा हर्ष झाला व ते पुनः पुनः पुष्पवृष्टि करूं लागले; परंतु ते शिवादिक सावधान चित्तानें पहात असतांच अतर्क्य गतीनें हरि स्वधामाला गेला. ७४ आम्ही सगळ्या मायेचें नियमन करणारे, आम्ही सर्वद्रष्टे, सर्वज्ञ, असा देवांना मोठा अभिमान होता. त्यांना श्रीकृष्णानें लाजविलें. ७५ श्रीकृष्णाची अगम्य गति शंकर व ब्रह्मदेव यांसहि कळली नाहीं. त्यामुळें ते सगळे देव विस्मित होऊन आश्चर्यचकित झाले. देव अत्यंत आश्चर्यानें थक्क झाले. ७६ इतक्यांत सत्य, धर्म, धृति, कीर्ति या सगळ्या लक्ष्मीसह पृथ्वी सोडून कृष्णाच्या धामीं निघाल्या. ७७ सत्य, धर्म, श्री, धृति व कीर्ति यांची कृष्णाच्या चरणापाशीं नित्य वस्ती होती. म्हणून त्या पृथ्वी सोडून तत्काल कृष्णाबरोबर निघाल्या. ७८ हे कुरुश्रेष्ठ परीक्षिति राजा ! तूं कदाचित् असें समजशील कीं, सत्य, धर्म, श्री, धृति व कीर्ति पृथ्वींतून कायमच्या नाहींशा झाल्या, तर त्याचाहि विचार ऐक. ७९ श्रीकृष्णाची मूर्ति ज्याच्या अंतःकरणांत स्थिर होते, तेथें सत्य व धर्मादि यांचें सदैव साम्राज्य असतें. ८० श्रीकृष्णानें केवल भक्तांवर अनुग्रह करण्यासाठीं लीलादेह धारण केला होता. त्या श्रीकृष्णाची गति ब्रह्मादिकांस कळली नाहीं. ८१.

देवादयो ब्रह्ममुख्या न विशन्तं स्वधामनि । अविज्ञातगतिं कृष्णं ददृशुश्चातिविस्मिताः ॥ ८ ॥

इंद्र बृहस्पति मुख्यत्वें ब्रह्मा । पाडूनि देवां परम भ्रमां । कृष्ण प्रवेशला निजधामा । अतर्क्य महिमा हरीचा ॥ ८२ ॥ अतर्क्य श्रीकृष्णाची गती । देवांसी लक्षेना निजशक्तीं । अतिविस्मय पावोनि चित्तीं । स्वधामाप्रती निघाले ॥ ८३ ॥ देव जातां स्वधामाप्रती । क्षणक्षणां आश्चर्य करिती । अलक्ष्य लक्षेना कृष्णगती । अतर्क्य स्थिति शिवादिकां ॥ ८४ ॥ तेंचि कृष्णाची अतर्क्य गती । देवांसी लक्षेना दैवी शक्ती । तेंचि विशद दृष्टांतीं । परीक्षितीप्रती शुक सांगे ॥ ८५ ॥

सौदामिन्या यथाऽऽकाशे यान्त्या हित्वाऽभ्रमण्डलम् । गतिर्न लक्ष्यते मर्त्यैस्तथा कृष्णस्य दैवतैः ॥ ९ ॥
ब्रह्मरुद्रादयस्ते तु दृष्ट्वा योगगतिं हरेः । विस्मितास्तां प्रशंसंतः स्वं स्वं लोकं ययुस्तदा ॥ १० ॥

वीज तळपे अभ्रमंडळीं । ते कोठोनि आली कोठें गेली । गति नरां न लक्षे भूतळीं । तैशी कृष्णगती जाहली दुर्गम देवां ॥ ८६ ॥ वीज सकळ मनुष्यें देखती । परी न कळे येती जाती गती । तेवीं कृष्णाची अवतारशक्ती । न कळे निश्चितीं देवांसी ॥ ८७ ॥ तेथूनि येथें येणें । का तेथूनि तेथ जाणें । हें नाहीं कृष्णास करणें । तो सर्वत्र पूर्णपणें परिपूर्ण सदा ॥ ८८ ॥ द्यावया आकाशासी बिढार । सर्वथा रितें न मिळे घर । तेवीं कृष्ण परमात्मा सर्वत्र । गत्यंतर त्या नाहीं ॥ ८९ ॥ ऐसा श्रीकृष्ण गेला निजधामा । परमाद्भुत ज्याचा महिमा । अलक्ष्य लक्षेना कृष्णगरिमा । जाणोनि स्वाश्रमा निघाले देव ॥ ९० ॥

ब्रह्ममुख्याः देवादयः स्वधामनि विशन्तं कृष्णं न ददृशुः—श्रीकृष्ण अन्तर्धान पावला असतां 'हा कोठें बरें गेला' असा वितर्क करणारेहि ब्रह्मादि देव ज्याची गति अविज्ञात आहे, अशा आपल्या वैकुंठाख्य धामांत प्रवेश करणाऱ्या कृष्णाला पहाते झाले नाहींत. कचिन् (ददृशुः च) ततः अति विस्मिताः—कांहीं ठिकाणीं त्यांनीं त्याला पाहिलें व त्यामुळें ते विस्मित झाले. ८.

इंद्र, बृहस्पति आणि मुख्यत्वेंकरून ब्रह्मदेव यांस अत्यंत भ्रमांत टाकून श्रीकृष्णानें निजधामांत प्रवेश केला. असा हरीचा महिमा अतर्क्य आहे. ८२ श्रीकृष्णाची अतर्क्य गति देवांना त्यांच्या शक्तीनें कळेना; ८३ तेव्हां ते मनांत विस्मित होऊन आपापल्या लोकीं गेले. ते देव आपल्या लोकीं परत जातेवेळीं मनांत मोठें आश्चर्य मानूं लागले. श्रीकृष्णाची गति किती अतर्क्य आहे पहा ! ती शिवादिकांसहि कळली नाहीं. ८४ पण देवांनाहि त्यांच्या दैवी शक्तीनें जी गति कळली नाहीं. तीच श्रीकृष्णाची अतर्क्य गति श्रीशुक परीक्षितीला दृष्टान्तानें स्पष्ट करून सांगत आहे. ८५.

यथा आकाशे अभ्रमंडलं हित्वा यान्त्याः सौदामिन्याः गतिः मर्त्यैः न लक्ष्यते तथा दैवतैः कृष्णस्य—त्याप्रमाणें आकाशांत अभ्रमंडळाला सोडून जाणाऱ्या विजेची गति मर्त्यांना दिसत नाहीं, पण देवांना दिसते, त्याप्रमाणें भूमंडळ सोडून जाणाऱ्या कृष्णाची गति देवांना दिसली नाहीं, (पण त्याच्या पार्षदांना दिसली). ते तु ब्रह्मरुद्रादयः हरेः योगगतिं दृष्ट्वा विस्मिताः तां प्रशंसंतः तदा स्वं स्वं लोकं ययुः—पण ते ब्रह्मरुद्रादिक हरीची योगगति पाहून विस्मित झाले व तिची प्रशंसा करीत त्यावेळीं आपापल्या लोकीं गेले. ९–१०

मेघमंडळांत जेव्हां वीज चमकते, तेव्हां ती कोठून आली व कोठें गेली, हें जसें पृथ्वीवरील लोकांना कळत नाहीं. तसें श्रीकृष्णाचें गमन देवांना दुर्गम झालें. ८६ वीज सगळ्या लोकांना दिसते, पण ती कोठून येते व कोठें जाते हें कोणालाच कळत नाहीं. त्याप्रमाणें श्रीकृष्णाची अवतारशक्ति देवांना निश्चयानें कळेना. ८७ वैकुंठाहून मृत्युलोकीं येणें किंवा येथून तेथें जाणें हें श्रीकृष्णाविषयीं संभवतच नाहीं. कारण तो सर्वत्र परिपूर्ण भरलेला आहे. ८८ आकाशाला बिऱ्हाड देण्यास जसें कोठेंहि रिकामें घर सांपडत नाहीं, त्याप्रमाणें परमात्मा श्रीकृष्ण सर्वत्र आहे. त्याला अन्य गति नाहीं. ८९ असा श्रीकृष्ण निजधामाला गेला. त्याचा महिमा परम अद्भुत आहे. कृष्णाची थोरवी कोणाला आकलन करितां येत नाहीं, हें जाणून सगळे देव आपापल्या स्थानीं परत गेले. ९०

आम्ही मायानियंते निजशक्ती । आम्ही जाणों दुर्गमा योगगती । आम्ही सर्वद्रष्टे त्रिजगतीं । हा अभिमान चित्तीं देवांचे ॥ ९१ ॥ तिंहीं देखोनि कृष्णगती । गळाली जाणिवेची धृती । लाजे पळाली अभिमानस्थिती । तिंहीं मांडिली स्तुति कृष्णाची ॥ ९२ ॥ रुद्र पंचमुखीं करी स्तुती । ब्रह्मा चहूं मुखीं वर्णी कीर्ती । देव विस्मयातें पावती । अगम्य गती कृष्णाची ॥ ९३ ॥ करितां श्रीकृष्णाची स्तुती । देवांसी न बाणे तृप्ती । वर्णित श्रीकृष्णकीर्ती । स्वलोकाप्रती सुर गेले ॥ ९४ ॥ पूर्वीं सांगितली कृष्णगती । तेचि सांगावया विशद स्थिती । परतोनि परीक्षितीप्रतीं । अतिप्रीती शुक सांगे ॥ ९५ ॥

राजन्परस्य तनुभृज्जननाप्ययेहा मायाविडम्बनमवेहि यथा नटस्य ।
सृष्ट्वाऽऽत्मनेदमनुविश्य विहृत्य चान्ते संहृत्य चात्ममहिनोपरतः स आस्ते ॥ ११ ॥

ऐक राया परीक्षिती । सकळ कारणां कारण श्रीपती । मायेचीहि चेतनाशक्ती । जाण निश्चितीं श्रीकृष्ण ॥ ९६ ॥ ज्यासी नाहीं व्यक्ति वर्ण । ज्यासी नाहीं रूप गुण । तो स्वलीला श्रीकृष्ण । यदुवंशीं जाण अवतरला ॥ ९७ ॥ जो सकळवंशीं वंशज जाण । जो सकळ गोत्रीं गोत्रज पूर्ण । जो सकळ यातींची याती जाण । स्वयें श्रीकृष्ण सर्वादि ॥ ९८ ॥ त्यासी यदुवंशीं जें जन्म । गोवर्धनोद्धारणादि कर्म । कुलक्षयो निधनधर्म । हें स्वलीलाकर्म योगमाया ॥ ९९ ॥ योगमायेचिया सत्ता । मत्स्यकूर्मादि अवतारता । शेखीं धरी श्वेतवराहता । ते अतर्क्य योगता श्रीकृष्णाची ॥ १०० ॥ श्रीकृष्ण नव्हे अवतार । हा अवतारी चिन्मात्र । त्याचें अति अतर्क्य चरित्र । ब्रह्मादि रुद्र नेणती ॥ १ ॥

आम्हीं आपल्या शक्तीनें मायेचें नियमन करणारे, आम्हीं दुर्गम योगगति जाणणारे, आम्हीं त्रिभुवनांत सर्वज्ञ असा देवांच्या मनांत अभिमान होता. ९१ त्यांनीं श्रीकृष्णाचें गमन पहातांच त्यांचा सर्वज्ञतेचा गर्व उतरला. अभिमान लाजून पळून गेला व ते श्रीकृष्णाची स्तुति करूं लागले ९२ रुद्र आपल्या पांच मुखांनीं स्तुति करूं लागला. ब्रह्मदेव चार मुखांनीं त्याचीं कीर्ति वर्णूं लागला. श्रीकृष्णाची अगम्यगति पाहून देव विस्मित झाले. ९३ श्रीकृष्णाची स्तुति करीत असतां देवांची तृप्ति होईना. ते श्रीकृष्णाची कीर्ति वर्णन करीत आपापल्या लोकीं परत गेले. ९४ पूर्वीं श्रीकृष्णाची गति सांगितली आहेच ती स्पष्ट करण्यासाठीं शुकाचार्य अतिशय प्रीतीनें परिक्षितीला पुनः सांगत आहे. ९५.

—अभिप्राय न कळल्यामुळें प्रथम अतिशय खिन्न व मागून हृष्ट झालेल्या त्या राजाला पाहून शुकाचार्य पुढील तीन श्लोकांनीं त्याच अर्थाचा अधिक विस्तार करितात—

राजन् परस्य तनुभृज्जननाप्ययेहा मायाविडंम्बनं अवेहि यथा नटस्य—हे राजा ! सर्व कारण जो परमात्मा त्याचें यादवादि शरीरधारण करणारांमध्यें प्रकट होणें, गुप्त होणें इत्यादि चेष्टा हें केवल नटाप्रमाणें मायेचें अनुकरण आहे, असें तूं समज. (नट जसा स्वतः निर्विकारच असून जन्मादिकांचें अनुकरण करितो, त्याप्रमाणें यादवादिकांतील जन्मादिकांविषयींची शंका तर राहूं देच, पण उत्पत्ति-लयादि प्रसंगींहि हा परमात्मा अविकृतच असतो, असें सांगतात—) सः आत्मनः इदं सृष्ट्वा अनुप्रविश्य विहृत्य च अंते संहृत्य च आत्ममहिना उपरतः आस्ते—तो स्वतः हें जगत् उत्पन्न करून, त्यांत अंतर्यामित्वानें प्रवेश करून, शेवटीं त्याचा संहार करून स्वतःच्या महिम्यानें शांत होऊन रहातो. ११.

हे परीक्षिति राजा ! ऐक. सगळ्या कारणांचें कारण आणि मायेची चेतनाशक्ति श्रीकृष्णच आहे, हें निश्चयानें जाण. ९६ ज्याला जाति, वर्ण, रूप, गुण नाहींत त्या श्रीकृष्णानें आपल्या लीलेनें यादवकुलांत अवतार घेतला. ९७ सगळ्या वंशांत जन्म घेणारा मूळ पुरुष, सर्व गोत्रांचा गोत्रज, सगळ्या जातींची जाति, तोच सर्वांचा आदि स्वतः श्रीकृष्ण आहे. ९८ त्याचा यदुवंशांतील जन्म, गोवर्धनउद्धारादि कर्म, स्वकुलाचा क्षय व स्वतःचें निर्याण हें सर्व त्यानें योगमायेनें केलेली त्याची लीला आहे. ९९ योगमायेच्या सत्तेनें त्यानें मत्स्य-कूर्मादि अवतार घेतले. शेवटीं त्यानें श्वेतवराहरूप धारण केलें. हा श्रीकृष्णाचा अतर्क्य योगच होय. १०० श्रीकृष्ण हा अवतार नव्हे तर साक्षात् चित्स्वरूप ब्रह्मच अवतरलें होतें. त्याचें अत्यंत अतर्क्य चरित्र ब्रह्मदेवादिकांस कळत नाहीं. १ आरशांत

जैसें आरिसां प्रतिबिंब बिंबलें । तैसें यदुवंशीं कृष्णजन्म जाहलें । आरिसां हावभाव दाविले । तैसें कर्म केलें श्रीकृष्णें ॥ २ ॥ तो आरिसा हातींचा टाकितां । हारपे पुढील प्रतिबिंबता । त्या नांव कृष्णनिधनता । मिथ्या वार्ता मायिक ॥ ३ ॥ जैसा नट धरी नाना वेष । सर्वेचि सांडी त्या वेषांस । परी नटासी नाहीं नाश । तैसा पैं हृषीकेश अवतारी ॥ ४ ॥ यदुवंशीं कृष्णनाथ । सर्व कर्मीं सदा अलिप्त । सृष्टि-स्थित्यंतीं नित्यमुक्त । त्यासी परमाद्भुत तें कायी ॥ ५ ॥ न मेळवितां साह्य संगें । कृष्ण सृष्टी स्रजी निजांगें । ते प्रतिपाळूनि यथाभागें । संहारूनि वेगें स्वयें उरे ॥ ६ ॥ कृष्ण स्रजी पाळी संहारी । हे जगीं प्रत्यक्ष दिसे थोरी । कर्में करूनि अविकारी । कदा विकारी नव्हे कृष्ण ॥ ७ ॥ कृष्ण अंतर्यामी सर्व भूतां । जगत्कर्मांचा कृष्ण कर्ता । कर्म करूनि तो अकर्ता । विदेहता निजरूपें ॥ ८ ॥ ऐसा अगाध श्रीकृष्णमहिमा । मर्यादा न पावे शिव शक्र ब्रह्मा । याचा देहचि विदेहात्मा । गेला निजधामा तेणें योगें ॥ ९ ॥ येचि अवतारीं कृष्णनाथें । देहीं दाविलें विदेहकर्मातें । तें मागें परिसविलें तूतें । ऐक मागुतें सांगेन ॥ ११० ॥ सात दिवस गोवर्धन । निजकरीं धरूनि जाण । इंद्राचा हरिला मान । विदेही पूर्ण श्रीकृष्ण ॥ ११ ॥ दावाग्नि प्राशूनि आपण । लाजविला हुताशन । रासक्रीडा करूनि जाण । हरिला मान मदनाचा ॥ १२ ॥ समुद्र सारूनि मावारां । वसविलें निजनगरा । निद्रा न मोडितां मथुरा । द्वारकापुरा आणिली ॥ १३ ॥ सेवूनि भाजीचें पान । तृप्त केले ऋषिजन । कृष्ण अंतर्यामी आपण । हें निजलक्षण दाविलें ॥ १४ ॥ येणेंचि देहें श्रीकृष्णनाथ । जाहला वत्सें वत्सप समस्त । ब्रह्मा लाजवूनि तेथ । गर्वहत तो केला ॥ १५ ॥

जसें प्रतिबिंब पडावें तसा यदुवंशांत श्रीकृष्णाचा जन्म झाला. आरशांत जसे हावभाव दिसतात, तसें श्रीकृष्णानें कर्म केलें. २ तो आरसा हातांतून टाकतांच प्रतिबिंब जसें जागच्याजागीं नाहींसें होतें तसें श्रीकृष्णाचें निधन मिथ्या मायिक होय. ३ नट नाना प्रकारचे वेष घेतो व लगेच तो वेष टाकून देतो, पण त्या बरोबर नट जसा नाहींसा होत नाहीं, त्याप्रमाणें श्रीकृष्णाचा अवतार होता. ४ यदुवंशांत श्रीकृष्ण सर्व कर्मांपासून सर्वदा अलिप्त होता. उत्पत्ति-स्थिति-लय या तीन्ही अवस्थांत नित्यमुक्त होता. त्याला परम अद्भुत असें काय असणार ! ५ कोणाचेंहि साह्य न घेतां श्रीकृष्णानें स्वतःच सृष्टि उत्पन्न केली, तिचा यथायोग्य प्रतिपाळ केला आणि शेवटीं सर्वांचा संहार करून तो एकटाच उरला. ६ कृष्ण सृष्टि उत्पन्न करितो, तिचा सांभाळ करितो व संहार करितो. ही त्याची प्रत्यक्ष थोरवी जगांत दिसत आहे. यावरून तो कर्म करून सदा अविकारीच आहे. विकारी केव्हांहि होत नाहीं. ७ श्रीकृष्ण सर्व भूतांचा अंतर्यामी, जगांतील सर्व कर्मांचा कर्ता व कर्म करूनहि तो अकर्ता आहे. आत्मस्वरूपानें तो विदेही आहे. ८ असा श्रीकृष्णाचा महिमा अगाध आहे. शंकर, इंद्र, ब्रह्मदेव, यांनाहि त्याचा अंत लागला नाहीं. त्याचा देहच विदेहरूप असल्यामुळें त्यायोगें तो निजधामाला गेला. ९ श्रीकृष्णानें याच अवतारांत देहांत असून विदेही कर्म दाखविलें. मी मागें एकदां तें तुला ऐकविलें होतें; पुनः तेंच सांगतों, ऐक. ११० श्रीकृष्णानें सात दिवस गोवर्धन पर्वत हातावर झेलून धरिला व इंद्राचें गर्वहरण केलें. असा श्रीकृष्ण पूर्ण विदेही आहे. ११ त्यानें स्वतः दावाग्नि प्राशन केला व अग्नीला लाजविलें. रासक्रीडा करून मदनाची मानखंडना केली. १२ त्यानें समुद्राला मागें हटवून तेथें द्वारका नगरी स्थापन केली; लोकांची झोंप न मोडितां मथुरा द्वारकेंत आणिली. १३ द्रौपदीच्या स्थालींतील भाजीचें पान खाऊन दुर्वासादि सगळे ऋषीश्वर तृप्त केले व श्रीकृष्ण सर्वांचा अंतर्यामी आहे, हें दाखविलें. १४ याच देहानें तो सर्व गायींचीं वासरें व गवळी झाला आणि ब्रह्मदेवाला लाजवून त्याचा गर्व घालविला. ११५.

मर्त्येन यो गुरुसुतं यमलोकनीतं त्वां चानयच्छरणदः परमास्त्रदग्धम् ।
जिग्येऽन्तकान्तकमपीशमसावनीशः किं स्वावने स्वरनयन्मृगयुं सदेहम् ॥ १२ ॥

श्रीकृष्णें येणेंचि देहेंसीं । जाऊनियां यमलोकासी । निग्रहूनि यमकाळांसी । निमाल्या गुरुसुतासी आणिलें ॥ १६ ॥ उत्तरेचिये गर्भस्थितीं । जळतां ब्रह्मास्त्रमहाशक्ती । तुज राखिलें आक्रांतीं । स्वचक्र श्रीपति प्रेरोनी ॥ १७ ॥ तुज राखावया हेंचि कारण । तुझी माता रिघाली शरण । कृष्ण शरणागतां शरण्य । संकटहरण निजभक्तां ॥ १८ ॥ यादवांदेखतां द्वारकापुरीं । द्विजपुत्र राखितां सटीचे रात्रीं । अर्जुन नेमेंसीं प्रतिज्ञा करी । तंव तो शरीरीं हारपला ॥ १९ ॥ ब्राह्मणें निर्भर्त्सिलें त्यासी । थोर लाज जाहली अर्जुनासी । तेणें कळवळला हृषीकेशी । भक्तसाह्यासी पावला ॥ १२० ॥ अर्जुनासहित हृषीकेशी । रथेंसीं निघे क्षीरसागरासी । द्विजसुत होते नारायणापाशीं । द्वारकेसी आणिले ॥२१॥ एवं भक्तसंकटानिवारण। निजांगें करी श्रीकृष्ण । श्रीकृष्णप्रतापाचें महिमान । ऐक सांगेन अलौलिक ॥२२॥ बाणासुराचा कैवारू । करूं आला महारुद्रू । सवें नंदी भृंगी वीरभद्रू । स्वामिकार्तिकेंसीं हरू जिंतला कृष्णें ॥ २३ ॥ उग्रासिही अतिउग्र । भयंकरासी भयंकर । तो जिणोनि काळाग्निरुद्र । बाणभुजाभार छेदिला ॥ २४ ॥ कृष्णवचन अतिअगाध । जेणें केला महापराध । तो स्वदेहेंसी जराव्याध । स्वर्गासि प्रसिद्ध धाडिला ॥ २५ ॥ एवढें सामर्थ्य श्रीकृष्णापाशीं । तो काय राखूं न शके स्वदेहासी । देहीं देहत्व नाहीं त्यासी । गेला निजधामासी निजात्मता ॥ २६ ॥ एवढें सामर्थ्य श्रीकृष्णापाशीं । तरी

—ही गोष्ट अन्यथा मानूं नये, कारण याच अवतारांत त्याचा निरतिशय प्रभाव अनुभवास आला आहे—

यः यमलोकनीतं गुरुसुतं मर्त्येन आनयत्—जो यमानें आपल्या लोकीं नेलेल्या गुरुसुताला त्याच मनुष्यशरीरानें परत आणिता आला. यः शरणदः परमास्त्रदग्धं त्वां च (रक्षितवान्)—जो शरणागताचा रक्षक भगवान् ब्रह्मास्त्रानें दग्ध झालेल्या तुझें रक्षण करिता झाला; यः अन्तकान्तं अपि ईशं जिग्ये—जो अंतकाचा अंतक अशा शंकराला बाणसंग्रामांत जिंकता झाला, यः मृगयुं सदेहं स्वर् अनयत्—जो व्याधाला देहासह स्वर्गाला पोंचविता झाला; असौ स्वावने अनीशः किं—तो स्वतःचें रक्षण करण्यास असमर्थ होता काय ! १२.

श्रीकृष्णानें याच देहानें यमलोकीं जाऊन यम-काळांचा निग्रह केला आणि तेथून मृत गुरुपुत्राला परत आणिलें म्ह० जिवंत केलें. १६ उत्तरेच्या गर्भांत ब्रह्मास्त्राच्या महाशक्तीनें तुला होरपळून टाकिलें असतां हे परीक्षिति राजा ! श्रीकृष्णानें आपल्या सुदर्शन चक्रानें तुझें रक्षण केलें. १७ तुझें रक्षण करण्याचें कारण तुझी माता त्याला शरण गेली होती आणि श्रीकृष्ण शरण आलेल्या आपल्या भक्तांवरील संकट तत्काल नाहींसें करीत असतो. १८ ब्राह्मणपुत्राच्या षष्ठीपूजनाच्या दिवशीं अर्जुनानें यादवांच्या समोर ' मी त्याचें रक्षण करीन ' अशी प्रतिज्ञा केली असतां तें बालक मृत झालें. १९ त्या वेळीं ब्राह्मणानें त्याची अतिशय निर्भत्सना केली. त्यामुळें अर्जुनाला लाज वाटली. तेव्हां श्रीकृष्ण कळवळला आणि भक्ताला साह्य करावयास धांवला. १२० श्रीकृष्ण अर्जुनासह रथांत बसून निघाला व क्षीरसागरांत गेला. तेथें तें मृतबालक नारायणापाशीं होतें. त्याला त्यांनीं द्वारकेंत आणिलें. २१ असा श्रीकृष्ण भक्तावरील संकट निवारण्यासाठीं स्वतः अंगानें खपत असतो. श्रीकृष्णाच्या प्रतापाचा अलौकिक महिमा सांगतो, तो ऐक. २२ महारुद्र शंकर जेव्हां बाणासुराचा कैवार घेऊन युद्धाला आला तेव्हां श्रीकृष्णानें त्यास नंदी, भृंगी, वीरभद्र, कार्तिकस्वामी या सर्वांसह जिंकिलें. २३ उग्रांतीलहि अति उग्र, भयंकरांतीलहि भयंकर अशा काळाग्नि रुद्राला जिंकून त्यानें बाणासुराच्या भुजांचा भार छेदिला. २४ श्रीकृष्णाचें वचन अत्यंत अगाध आहे. ज्यानें महान् अपराध केला, त्या जराव्याधाला त्यानें देहासह स्वर्गाला पाठविलें. २५ इतकें ज्याचें सामर्थ्य, तो काय स्वतःचा देह राखूं शकत नव्हता ! परंतु त्याच्या देहांत देहत्वच नाहीं. त्यामुळें तो आपल्या आत्मस्वरूपानें निजधामास गेला. २६ श्रीकृष्णाचें एवढें जर सामर्थ्य होतें तर तो निजधामाला कां गेला ! या लोकीं त्याच देहानें

कां गेला निजधामासी । या लोकीं तेणें देहेंसीं । राहतां त्यासी भय काय ॥ २७ ॥ ऐसा पोटींचा आवांका । धरून करिशी आशंका । लोकाभिमान नाहीं यदुनायका । स्वेच्छा देखा स्थिति त्याची ॥ २८ ॥

तथाऽप्यशेषस्थितिसम्भवाप्ययेष्वनन्यहेतुर्यदि शेषशक्तिधृक् ।
नैच्छत्प्रणेतुं वपुरत्र शेषितं मर्त्येन किं स्वस्थगतिं प्रदर्शयन् ॥ १३ ॥

मायादि तिन्ही गुण । इत्यादि कारणां कारण । निजांगें श्रीकृष्ण आपण । स्वयें कारण अनादित्वें ॥ २९ ॥ ब्रह्मांडें कोटी अनंत । उत्पत्तिस्थितिप्रलयावर्त । करूनि श्रीकृष्ण अलिप्त । सामर्थ्यें अद्भुत श्रीकृष्ण ॥ १३० ॥ अशेषाही परम शक्ती । श्रीकृष्णलेशें सामर्थ्यवंती । कृष्णदेह तो विदेहस्थिती । स्वेच्छाशक्तीं स्वधामा गेला ॥ ३१ ॥ इहलोकींची आसक्ती । श्रीकृष्णासी नाहीं चित्तीं । निजधामाची अतिप्रीती । तेही निश्चितीं असेना ॥ ३२ ॥ निजदेहें इहलोकीं वस्ती । स्वेच्छा न मानीच श्रीपती । माझ्या देहाची अगम्य गती । तेणें साधकस्थिति भ्रंशेल ॥ ३३ ॥ माझा देह चैतन्यघन । तेथें बाधीना विषयसेवन । हें देखोनि साधक जन । देहसाधन मांडिती ॥ ३४ ॥ वायो साधूनियां पूर्ण । दृढ करूनि देहधारण । माझ्या ऐसें विषयसेवन । कराया अभिमान वाढेल ॥ ३५ ॥ ऐसा वाढल्या देहाभिमान । माझें मावळेल निजात्मज्ञान । यालागीं विदेहेंसीं श्रीकृष्ण । गेला निघोन निजधामा ॥ ३६ ॥ माझें न कळतां निजात्मज्ञान । परी माझ्याऐसें विषयसेवन । करूं लागती योगी जन । यालागीं श्रीकृष्ण

रहाण्यास त्याला भीति कसली ! २७ अशी जर मनांत शंका घेशील, तर ऐक. यदुनायक श्रीकृष्णाला लोकाभिमान नाहीं. त्याची स्वेच्छावृत्ति आहे. १२८.

—तो जर समर्थ होता तर कांहीं काल त्याच शरीरानें येथें कां राहिला नाहीं ! उत्तर—

यद्यपि अशेषस्थिति-संभवाप्ययेषु अनन्यहेतुः यत् अशेषशक्तिधृक् तथा अपि वपुः अत्र शेषितं प्रणेतुं न ऐच्छत्—यद्यपि भगवान् पूर्वोक्त प्रकारें सर्व चराचर जगाच्या उत्पत्ति-स्थिति-लयांचें निरपेक्ष कारण आहे, कारण कीं, तो सर्वशक्तींना धारण करितो; तथापि त्यानें यादवत्वामुळें आपलें शरीर या लोकीं मागें शिल्लक ठेवण्याची इच्छा केली नाहीं, तर तें आपल्या लोकींच नेलें. (त्यानें तें आपल्या लोकींच नेलें त्याविषयीं हेतु—) मर्त्येन किं स्वस्थगतिं प्रदर्शयन्—या मर्त्य शरीराला घेऊन काय करावयाचें आहे ! त्याचें काय प्रयोजन ! अशी आत्मनिष्ठांची दिव्य गतीच प्रदर्शित करणारा असा होत्साता आपल्या शरीराला स्वलोकीं नेता झाला. [नाहीं तर इतर आत्मनिष्ठहि दिव्य गतीचा अनादर करून योगबलानें देहसिद्धि प्राप्त करून घेऊन येथेंच रहणार होण्याची इच्छा करतील, तसें होऊं नये, म्हणून भगवानानें स्वधामीं गमन केलें, असा याचा भावार्थ] १३.

माया व सत्त्वादि तीन गुण या सर्व कारणांचें श्रीकृष्णच स्वतः अनादित्वानें कारण आहे. २९ अनंत कोटि ब्रह्माण्डें व उत्पत्ति-स्थिति-लयादि करून श्रीकृष्ण अलिप्तच आहे. असें त्याचें सामर्थ्य अद्भुत आहे. निःशेष परम-शक्ति श्रीकृष्णाच्या अंशानें सामर्थ्यवान् आहे. १३० श्रीकृष्णाचा देह विदेहावस्थेंत असल्यामुळें आपल्या इच्छा-शक्तीनें तो स्वधामाला गेला. ३१ श्रीकृष्णाच्या मनांत इहलोकाची आसक्ति नव्हती. निजधामाचीहि अतिशय आवड म्हणावी तर तीहि निश्चयानें नव्हती. ३२. आत्मदेहानें या लोकीं रहाणें श्रीकृष्णाला इष्ट नव्हतें. कारण ' माझ्या देहाची अगम्यगति पाहून साधक आपल्या स्थितीपासून च्युत होतील. ३३ माझा देह चैतन्यघन आहे. त्याला विषयसेवन बाधत नाहीं. परंतु तें पाहून साधकांचा बुद्धिभ्रंश होईल व तेहि योगबलानें देहसिद्धि मिळविण्याचा प्रयत्न करतील ३४ वायूचा पूर्ण निरोध करून तेहि माझ्यासारखे विषयसेवन करूं लागतील व त्यांची देहावरील आसक्ति वाढेल. ३५ असा देहाभिमान वाढला म्हणजे माझ्या आत्मज्ञानाचा मार्ग बंद होईल. ' या विचारानें श्रीकृष्ण विदेहानें निजधामाला निघून गेला. ३६ माझें आत्मज्ञान न जाणतां योगी माझें अनुकरण करतील व विषयसेवन करूं लाग-

निजधामा गेला ॥ ३७ ॥ माझ्या देहाची स्थिति गती । शंभु स्वयंभू कदा नेणती । मा इतरासी ते गती । कैशा रीतीं कळेल ॥ ३८ ॥ परी माझ्या ऐसा देहाभिमान । वाढविती योगी जन । हे जाणोनियां श्रीकृष्ण । विदेह आपण निजधामा गेला ॥३९॥ ज्याचे देहाचें दर्शन । देखतां सबाह्य निवे मन त्याही देहाचें मिथ्यात्व पूर्ण । दावूनि कृष्ण निजधामा गेला ॥ १४० ॥ एवं त्यागवावया देहाभिमान । कृष्ण निजधामा करी गमन । तारावया साधक जन । कृपाळु पूर्ण दीक्षा दावी ॥ ४१ ॥ एथवरी वैराग्यदृढस्थिती । देहाभिमानाची विरक्ती । साधावी निजात्मप्राप्ती । हे दीक्षा श्रीपति दावूनि गेला ॥ ४२ ॥ जेणें देहें स्वयें श्रीकृष्ण । आचरला अनेक विंदान । परी ज्ञात्यासी न लगे दूषण । हें पूर्णत्व पूर्ण प्रकाशलें ॥ ४३ ॥ जैत अथवा आल्या हारी । ज्ञान मैळेना दोहीं परी । ज्यासी मिथ्या भास नरनारी । तो सदा ब्रह्मचारी व्यभिचारामाजीं ॥ ४४ ॥ स्त्रीपुत्रादि गृहवासी । असोनि नित्य संन्यासी हेंही लक्षण हृषीकेशी । येणें अवतारेंसीं दाविलें ॥ ४५ ॥ अंगीं दाविलें गोवळेपण । सर्वेचि स्वामित्व आलें पूर्ण । शेखीं सेवक जाहला आपण । तरी पूर्णत्वपण मैळेना ॥ ४६ ॥ एकाचे घरीं उच्छिष्टें काढी । एकाचीं अंगें धूतसे घोडीं । तरी पूर्णत्वाचिये जोडी । उणी कवडी नव्हेचि ॥ ४७ ॥ एकाचीं निमालीं आणिलीं बाळें । एकाचीं समूळ निर्दळिलीं कुळें । इंहीं दोहीं परी ज्ञान न मैळे । हेंही प्रांजळें प्रकाशिलें ॥ ४८ ॥ एकाचा जाहला कैवारी । एकाचा जाहला पूर्ण वैरी । परी एकात्मता चराचरीं । अणुभरी ढळेना ॥ ४९ ॥ एकीं उद्धरिलीं चरणीं लागतां । तोही एकाचे चरणीं ठेवी माथा । बाप ज्ञानाची उदारता । न्यूनपूर्णता तरी न घडे ॥ १५० ॥ इतर ज्ञाते ज्ञानस्थिती । बोल बोलोनि दाविती । तैशी नव्हे ही कृष्णमूर्ती । आचरोनि रीति दावी अंगें ॥ ५१ ॥ अतिगुह्य ज्ञानलक्षणें । आचरोनि दाविलीं श्रीकृष्णें । परी अणुमात्रही उणें । नेदीच पूर्णपणें अंगीं लागों ॥ ५२ ॥ एवढी ज्या देहाची ख्याती ।

तील. म्हणून श्रीकृष्ण निजधामाला गेला. ३७ माझ्या देहाची स्थिति व गमन स्वयंभू शंकरालाहि जर कळत नाहीं, तर मग इतरांना ती गति कशी कळणार! ३८ परंतु हे योगीलोक माझ्यासारखा देहाभिमान मात्र वाढवितील, हें जाणून श्रीकृष्ण विदेहानें निजधामाला गेला. ३९ ज्या देहाच्या दर्शनानें मन अंतर्बाह्य तृप्त होतें, तो देहहि मिथ्या आहे. हें दाखवून श्रीकृष्ण निजधामाला गेला. १४० याप्रमाणें देहाभिमान टाकण्यासाठीं श्रीकृष्णानें स्वधामाला गमन केलें. या साधकांना तारण्यासाठीं त्या कृपाळु भगवानानें देहासक्ति टाकण्याचा स्वतः कित्ता घालून दिला. ४१ वैराग्यासाठीं एवढ्या दृढ स्थितीला पोंचून देहाभिमानाविषयीं विरक्त होऊन आत्मप्राप्ति करून घ्यावी, याचें श्रीहरि स्वतः उदाहरण घालून गेला. ४२ श्रीकृष्णानें स्वतः ज्या देहानें अनेक लीला केल्या त्या देहाचा दोष आत्मज्ञान्याला लागत नाहीं, हें त्यानें पूर्णपणें दाखवून दिलें. ४३ जय किंवा पराजय या दोहोंनीं ज्ञान मलिन होत नाहीं. ज्याला स्त्री-पुरुष दोन्ही मिथ्याच भासतात, तो व्यभिचार करीत असतांहि ब्रह्मचारीच आहे. ४४ स्त्री-पुत्रादि युक्त गृहस्थाश्रमांत राहून नित्य संन्यासी होण्याचें लक्षणहि श्रीकृष्णानें याच अवतारांत दाखविलें. ४५ त्यानें स्वतः गवळीपणा दाखविला व लगेच त्याला पूर्ण स्वामित्वहि आलें. शेवटीं आपण सेवक झाला, तरी त्याचा पूर्णपणा कमी झाला नाहीं. ४६ त्यानें पांडवांच्या घरीं उष्टीं काढिलीं, अर्जुनाचीं घोडीं धुतलीं, तरी त्याचा पूर्णपणा रेंसभरहि कमी झाला नाहीं. ४७ कोणाचीं मृत बालकें परत आणिलीं, तर कोणाच्या कुलाचा समूळ नाश केला. या दोन्ही प्रकारानें त्याचें ज्ञान मुळींच मलिन झालें नाहीं हेंहि त्यानें स्पष्ट दाखविलें. ४८ तो एकाचा पूर्ण कैवारी झाला तर दुसऱ्याचा कट्टा शत्रु बनला, तरी त्याचें चराचरांमधील ऐक्य अणुभरहि ढळलें नाहीं. ४९ चरणस्पर्शानें अहल्येचा उद्धार केला तर कोणाच्या चरणांवर मस्तक ठेविलें. त्याच्या ज्ञानाचें औदार्य इतकें थोर आहे कीं, त्यांत कांहीं अधिक-उणें घडत नाहीं. १५० इतर विद्वान् आपलें ज्ञान बोलून दाखवितात, पण श्रीकृष्णाची रीत तशी नाहीं, हें त्यानें स्वतः आचरून दाखविलें. ५१ अतिशय गहन ज्ञानलक्षणें श्रीकृष्णानें आचरणांत आणून दाखविलीं; परंतु त्यानें आपल्या पूर्णपणांत अणुभरहि कमीपणा येऊं दिला नाहीं. ५२ एवढा ज्या देहाचा महिमा, ज्या देहानें दीनजनांचा उद्धार केला, ज्या

जेणें देहीं दीन उद्धरती। ज्या देहातें सुरनर वंदिती। ज्या देहाची कीर्ति त्रैलोक्य वर्णी ॥ ५३ ॥ त्या देहाची अहंकृती। निःशेष सांडूनी श्रीपती। गेला निजधामाप्रती। ठेवूनि निजमूर्ति स्वभक्तध्यानीं ॥ ५४ ॥ कृष्णें देह नेला ना त्यागिला। तो लीलाविग्रहें संचला। निजभक्तध्यानीं प्रतिष्ठिला। स्वयें निजधामा गेला निजात्मयोगें ॥ ५५ ॥

य एतां प्रातरुत्थाय कृष्णस्य पदवीं पराम्। प्रयतः कीर्तयेद्भक्त्या तामेवाप्नोत्यनुत्तमाम् ॥ १४ ॥

श्रीकृष्णअवताराचे अंतीं। कृष्णाची जे परम गती। अतिउत्कृष्ट योगस्थिती। अतर्क्य निश्चितीं सुरश्रेष्ठां ॥ ५६ ॥ जे गतीहूनि वरती। चढेना अधिक गती। तीतें परा पदवी म्हणती। वेदशास्त्रोक्तीं सज्ञान ॥ ५७ हे कृष्णपरमपदवी। जो कोणी भक्तियुक्त सद्भावी। नित्य नियमस्थ धरूनि जीवीं। पठे निजभावीं प्रातःकाळीं ॥ ५८ ॥ भक्तियुक्तसुहृदयकमळीं। या चौदा श्लोकांची जपमाळी। जिव्हाग्रें अनुदिनीं चाळी। नित्य प्रातःकाळीं नियमस्थ ॥ ५९ ॥ केलिया या नेमासी। सांडणें नाहीं प्राणांतेंसीं। ऐशी निष्ठा जयापाशीं। उत्तमत्वासी तो पावे ॥ १६० ॥ कृष्णपदवी गातां गीतीं। पायां लागती चारी मुक्ती। त्यांचीही उपेक्षूनि स्थिती। कृष्णपदवी निश्चितीं स्वयें पावे ॥ ६१ ॥ हे चौदा श्लोक जाण। चौदा भुवनांचें निजजीवन। कृष्णपदवी पाविजे पूर्ण। नियमस्थ पठण केलिया ॥ ६२ ॥ हे चौदाही श्लोक जाण। चौदा पदें गयावर्जन। पदीं पिंडा समाधान। नियमस्थ पठण केलिया ॥ ६३ ॥ हे चौदाही श्लोक जाण। चौदा इंद्रांच्या जीवां जीवन। इंद्रांचा इंद्र होईजे आपण। नियमस्थ पठण केलिया ॥ ६४ ॥ हे चौदा श्लोक जाण। चौदा विद्यांचें जन्मस्थान। जो प्रातःकाळीं करी पठण। कृष्णपदवी पूर्ण तो पावे ॥ ६५ ॥ हे चौदाही श्लोक जाण। चौदा कांडें वेद सपूर्ण।

देहाला देव-मानव वंदन करितात, ज्या देहाची कीर्ति त्रिभुवनांत वर्णितात ५३ त्या देहावरील निःशेष अभिमान टाकून आपली मूर्ति भक्तांच्या ध्यानांत ठेवून श्रीहरि निजधामाला गेला. ५४ श्रीकृष्णानें देह नेला नाहीं, किंवा त्यागिला नाहीं. त्यानें तो आपल्या लीलेनें भक्तांच्या ध्यानांत ठेवून तो स्वतः आत्मस्वरूपानें निजधामाला गेला. १५५.

यः प्रातः उत्थाय प्रयतः भक्त्या कृष्णस्य एतां परां पदवीं कीर्तयेत् सः अनुत्तमां तां एव प्राप्नोति—जो प्रातःकाळीं उठून शुचि होऊन मोठ्या भक्तीनें कृष्णाच्या या परम गतीचें संकीर्तन करितो, तो त्याच अनुत्तम गतीला प्राप्त होतो. १४.

श्रीकृष्णावताराच्या अंतीं त्याची जी परम गति झाली ती अत्यंत उत्कृष्ट योगस्थिति देवश्रेष्ठांनाहि अतर्क्य आहे. ५६ ज्या गतीच्यावर दुसरी गतीच नाहीं, तिला वेद-शास्त्रवेत्ते परा गति म्हणतात. ('सा काष्ठा सा परा गतिः' अशी श्रुति आहे. का. भा. १-३-११ पृ. ६३) ५७ जो कोणी भक्त नित्य प्रातःकाळीं नियमानें ही श्रीकृष्णाची परम पदवी भक्तिभावानें पठण करील, ५८ भक्तियुक्त शुद्ध हृदयकमलांत या चौदा श्लोकांचा रात्रंदिवस जप करील, नित्य नियमानें प्रातःकाळीं म्हणेल, ५९ एकदां केलेला नियम प्राणान्तींहि सोडावयाचा नाहीं अशी ज्याची निष्ठा असेल, तो उत्तम गतीला प्राप्त होईल. ६० कृष्णपदवीचें गायन केलें असतां चारी मुक्ति पायां पडत येतात. त्यांचीहि उपेक्षा करून भक्त स्वतःच कृष्णपदवीला प्राप्त होतो. ६१ हे चवदा श्लोक चौदा भुवनांचें जीवनच आहे. याचें नित्य नियमानें पठण केलें असतां पूर्ण कृष्णपदवी लाधते. ६२ या चौदाव्या श्लोकाच्या चौदा पदांचें नियमानें पठण केलें असतां चौदा पावलांचें गयावर्जन घडतें व प्रत्येक पदानें जीवाला समाधान होतें. ६३ हे चौदा श्लोक चौदा इंद्रांच्या प्राणांचें जीवनच आहेत. त्यांचें नियमानें पठण करणारा इंद्रांचाहि इंद्र होतो. ६४ हे चौदा श्लोक चौदा विद्यांचें जन्मस्थान आहेत. जो त्यांचें प्रातःकाळीं पठण करितो, तो पूर्ण श्रीकृष्णपदवीला प्राप्त होतो. ६५ हे चौदा

वेद्वादां समाधान । नियमस्थ पठण केलिया ।। ६६ ।। हे चौदाही श्लोक जाण । संसाराचें गुणकर्मवर्ण । मोडूनि करी ब्रह्म पूर्ण । नेमें पठण केलिया ।। ६७ ।। प्रातःकाळीं नेमस्त पठण । करितां पाविजे ब्रह्म पूर्ण । मा त्रिकाळीं जो करी पठण । तो स्वदेहें श्रीकृष्ण स्वयें होय ।। ६८ ।। एथ पढोनि जो अर्थ पाहे । तो स्वयें श्रीकृष्ण होये। कृष्णाची पूर्ण पदवी पाहे । आंद्णी होये तयाची ।। ६९ ।। कृष्णपद्वी निजानिर्वाण । श्रवणें पठणें अर्थे जाण । साधकां करी ब्रह्म पूर्ण । हें गुह्य निरूपण परमार्थसिद्धी ।। १७० ।। एथ न करितां अतिसाधन । अनायासें ब्रह्मज्ञान । कृष्णपदवी पाविजे पूर्ण। श्रद्धायुक्त पठण नेमें करितां ।। ७१ ।। तक्षकभयाचे निवृत्ती । देहीं पावावया विदेहप्राप्ती । हे सुगमोपायस्थिती । कृपेनें परीक्षितीप्रति शुक सांगे ।। ७२ ।। हे कृष्णपदवी निजनिर्वाण। श्रद्धायुक्त नियमस्थ पठण। करितां पाविजे पूर्ण । प्रतिज्ञा पूर्ण श्रीशुकाची ।। ७३ ।। ऐशी हे सुगम परी । असतां जो श्रद्धा न करी । तो बुडाला संसारीं । अविद्येघरीं घरजांवयी ।। ७४ ।। तो अविद्येचा पोसणा । विषयीं प्रतिपाळिला सुणा। अहंथारोळां बैसणा । सर्वदा वसवसित ।। ७५ ।। असोत या मूढ गोष्टी । रचल्या सुखा पडेल तुटी । या श्लोकपठणासाठीं । होय भेटी परब्रह्मीं ।।७६।। कृष्णनिजपद्वीव्याख्यान । करावया मी अपुरतें दीन । जनार्दनें कृपा करून । हें निरूपण बोलविलें ।। ७७ ।। एका जनार्दना शरण । श्रीकृष्णपदवी निरूपण । तो हा एकादशाचा कळस पूर्ण । व्यासें जाण निर्वाळिला ।। ७८ ।। कृष्णपदवीपरतें । निरूपण न चढे एथें । तो हा एकादश कळसातें । व्यासें निश्चितें निर्वाळिलें ।। ७९ ।। निर्वाळिलें निरूपण । हे जनार्दनाकृपा पूर्ण । एका जनार्दना शरण । यापरी श्रीकृष्ण निजधामा गेला ।। १८० ।। येरीकडे द्वारकेशी । दारुक पावला विव्हळतेशीं । तेथील वर्तले कथेसी । परीक्षितीसी शुक सांगे ।। ८१ ।।

श्लोक म्हणजे चौदा कांडांचा संपूर्ण वेदच आहे. त्यांचें नियमानें पठण केल्यास वेदपाठकांचेंहि समाधान होतें. ६६ हे चौदा श्लोक नियमानें पठण करणारांस संसारांतील गुण, कर्म व वर्ण यांचा नाश करून पूर्ण ब्रह्म करितात. प्रातःकालीं जो नियमानें यांचें पठण करितो तो पूर्ण ब्रह्मपदाला प्राप्त होतो. ६७ मग जो त्रिकाल पठण करितो, तो स्वदेहानें स्वतः श्रीकृष्ण होतो. ६८ त्याचें पठण करून जो अर्थ जाणतो, तो तर स्वतःच श्रीकृष्ण होतो, कृष्णाची पूर्णपदवी त्याची आंदण दिलेली दासी होऊन रहाते. ६९ श्रीकृष्णपदवी हें मोक्षस्थान आहे. श्रवण, पठण, व अर्थ यांच्या योगानें साधक पूर्ण ब्रह्म होतो. परमार्थसिद्धीचें हें गुह्य निरूपण आहे. १७० यांत कोणतेंहि साधन न करितां अनायासें ब्रह्मज्ञान होतें. नियमानें श्रद्धायुक्त पठण केलें असतां पूर्ण कृष्णपदवी प्राप्त होते. ७१ श्रीशुकाचार्यांनें परीक्षितीला तक्षकाच्या भयाची निवृत्ति होण्यासाठीं आणि याच देहांत विदेहावस्था प्राप्त होण्यासाठीं कृपा करून हा सोपा उपाय सांगितला. ७२ श्रीकृष्णाच्या या निर्वाणपदवीचें नित्य नियमानें श्रद्धायुक्त पठण केलें असतां पूर्णब्रह्माची प्राप्ति होते, अशी श्रीशुकाची पूर्ण प्रतिज्ञा आहे. ७३ असा हा सोपा उपाय असतां जो त्यावर श्रद्धा ठेवीत नाहीं, तो या संसारांत बुडतो आणि अविद्येचा घरजांवई होतो. ७४ तो अविद्येचा आश्रित, अहंकाररूपी शेगडीजवळ बसणारा, सतत वसवस करणारा, विषयांचा पाळीव कुत्राच होय. ७५ या मूर्खांच्या गोष्टी राहोत. त्यानें आतापर्यंतच्या सुखांत व्यत्यय येणार ! या श्लोकांच्या पठणानें परब्रह्माची भेट होते. ७६ श्रीकृष्णाच्या पदवीचें वर्णन करण्यास मी दीन असमर्थ आहें; पण जनार्दनानें कृपा करून हें निरूपण मजकडून करविलें. ७७ एकनाथ जनार्दनाला शरण आहे. एकादशस्कंधाचा पूर्ण कळसच अशा या श्रीकृष्णपदवीचें निरूपण श्रीव्यासांनीं शेवटास नेलें. ७८ कृष्णपदवीच्या पुढें निरूपण करणेंच शक्य नाहीं, म्हणून या अध्यायाला एकादशस्कंधाचा कळस म्हटलें आहे. ७९ तें व्यासांनीं पूर्ण केलें. निरूपण शेवटास गेलें ही जनार्दनाची पूर्ण कृपा होय. एकनाथ जनार्दनाला शरण आहे. याप्रमाणें श्रीकृष्ण निजधामाला गेला. १८० आतां दुसरीकडे दारुक अत्यंत विव्हल होऊन द्वारकेंत जाऊन पोंचला. तेथें घडलेला वृत्तान्त श्रीशुक परीक्षितीला सांगत आहे. १८१.

दारुको द्वारकामेत्य वसुदेवोग्रसेनयोः । पतित्वा चरणावस्रैर्न्यषिञ्चत्कृष्णविच्युतः ॥ १५ ॥

दारुक द्वारका देखत । जैसें प्राणेंवीण प्रेत । कां राजा जैसा दैवहत । तैशी दिसत कलाहीन ॥ ८२ ॥ जेवीं कां वनिता पतिवीण । सर्वार्थी दिसे अतिदीन । तैशी द्वारावती जाण । कलाहीन आभासे ॥ ८३ ॥ रस पिळिल्या जैसा ऊंस । कणेंवीण फळकट भूस । तैशी कृष्णेंवीण उदास । दिसे चौपास द्वारका ॥ ८४ ॥ दारुक प्रवेशे राजभवन । देखोनि वसुदेव उग्रसेन । अश्रुधारा स्रवती नयन। आक्रंदें चरण धरी त्यांचे ॥ ८५ ॥ कृष्णवियोगें तापला पूर्ण । जैसें अतिसंतप्त जीवन । तैसे अश्रु स्रवती नयन। तेणें पोळती चरण वसुदेवाचे ॥ ८६ ॥ उकसाबुकसीं फुंदे पोट। दुःखें होऊं पाहे हृदयस्फोट। जिव्हेसीं बोबडी वाळले ओंठ । सद्गदें कंठ दाटला ॥ ८७ ॥ बोल न बोलवे सर्वथा । देखोनि दारुकाची व्यथा । द्वारकेच्या जनां समस्तां । अतिव्याकुलता वोढवली ॥ ८८ ॥ देवकी आणि रोहिणी। आल्या अत्यंत हडबडोनी । अतिव्याकुलता देखोनी । कृष्णपत्नी तेथें आल्या ॥ ८९ ॥ राणिवसाचिया नरनारी । धांवल्या सभामंडपाभीतरीं । तंव दारुकाची अवस्था भारी । देखोनि जिव्हारीं द्चकल्या ॥ १९० ॥ स्फुंदतां उकसाबुकसीं । श्वास परतेना दारुकासी । सांगतां कृष्ण वियोगासी । मूर्च्छा त्यासी पैं आली ॥ ९१ ॥ तेथें वसुदेव उग्रसेन । करुनि त्याचें सांतवन । वृत्तांत पुसतां सावधान । काय तो वचन बोलिला ॥ ९२ ॥

कथयामास निधनं वृष्णीनां कृत्स्नशो नृप । तच्छ्रुत्वोद्विग्नहृदया जनाः शोकविमूर्च्छिताः ॥ १६ ॥

—आत्मलोकाला जाणाऱ्या भगवानानें वसुदेवादिकांनाहि त्याची प्राप्ति व्हावी म्हणून तोच उपाय योजिला होता, तोच उपाय शुकाचार्य आतां सांगतात—

कृष्णविच्युतः दारुकः द्वारकां एत्य वसुदेवोग्रसेनयोः चरणौ पतित्वा अस्रैः न्यषिञ्चत्—कृष्णचरणांपासून वियुक्त झालेला दारुक द्वारकेस येऊन वसुदेव व उग्रसेन यांच्या चरणांवर स्वतःला घालवून घेऊन ते अश्रूंनीं भिजविता झाला. १५.

दारुकानें द्वारका पाहिली. ती त्याला प्राणावांचून जसें प्रेत असावें किंवा पदच्युत राजा जसा म्लान दिसावा, तशी कलाहीन दिसली. ८२ पतिवांचून स्त्री जशी अत्यंत दीन दिसावी, तशी द्वारकानगरी कलाहीन दिसली. ८३ रस पिळून काढिलेला ऊंस किंवा कणावांचून असलेलें फळकट-भूस जसें असावें तशी श्रीकृष्णावांचून द्वारका चोहोंबाजूंनीं उदास दिसत होती. ८४ दारुकानें राजवाड्यांत प्रवेश केला. तेथें वसुदेव व उग्रसेन यांना पाहून त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या व त्यानें आक्रोश करून त्यांचे चरण धरिले. ८५ तो श्रीकृष्णवियोगानें इतका क्षुब्ध झाला होता कीं, त्याच्या डोळ्यांतून कढत अश्रु वाहूं लागले, त्यांनीं वसुदेवाचे पाय पोळले. ८६ तो ओकसाबोकशीं स्फुंदून रडूं लागला. दुःखानें त्याचा हृदयस्फोट होतोसे वाटलें. त्याची बोबडी वळली. ओंठ वाळून गेले. कंठ सद्गदित झाला. ८७ त्याच्या तोंडांतून शब्द उमटेना. दारुकाची ही अवस्था पाहून द्वारकेंतील सगळ्या लोकांना मोठी चिंता उत्पन्न झाली व ते अत्यंत व्याकुळ झाले ८८ देवकी आणि रोहिणी घाबऱ्या होऊन तेथें आल्या. त्यांची दुःखानें व्याकुळ झालेली स्थिति पाहून कृष्णाच्या स्त्रियाहि तेथें आल्या. ८९ कृष्णाच्या राणीवशांतील सगळ्या स्त्रिया व पुरुष राजसभेंत धांवत आले. तेथें दारुकाची ती शोचनीय दशा पाहून तीं सर्वजण मनांत दचकलीं. १९० दारुक इतका ओकसाबोकशीं स्फुंदत होता कीं, त्याला श्वास घेववेना. तो कृष्णवियोगाचा वृत्तांत सांगत असतां त्याला मूर्च्छा आली. ९१ तेव्हां वसुदेव व उग्रसेन यांनीं त्याला सावध करून स्वस्थ चित्तानें वृत्तान्त विचारिला. तेव्हां तो काय बोलला, तें ऐका. १९२.

नृप— हे राजा, **वृष्णीनां निधनं कृत्स्नशः कथयामास**—तो यादवांचा नाश पूर्णपणें सांगता झाला, **तत् श्रुत्वा उद्विग्नहृदयाः जनाः शोकविमूर्च्छिताः**—तें ऐकून ज्यांचें हृदय उद्विग्न झालें आहे, असे लोक शोकानें व्याकुल झाले. १६.

दारुक म्हणे तुम्ही समस्त । पळापळा अर्जुनासमवेत । अर्ध क्षण न रहावें एथ । यादव समस्त निमाले ॥ ९३ ॥ यादवीं जाऊनि प्रभासासी । केला तीर्थविधि विधानेंसीं । दान भोजनें देऊनि द्विजांसी । मद्यपानासी मांडिलें ॥ ॥ ९४ ॥ चढला मद्याचा उन्माद । यादव सखे सगोत्र बंधू । परस्परें युद्धसंबंधू । गोत्रवधू तेथ घडला ॥ ९५ ॥ शस्त्रेंकरूनि स्वयमेव । कोणी न मरतीच यादव । तेथ घडलें एक अपूर्व । एरिकेनें सर्व निमाले ॥ ९६ ॥ बळिभद्रें त्यागिलें देहासी । श्रीकृष्ण गेला निजधामासी । मज धाडिलें तुम्हांपासीं । क्षण द्वारकेसी न राहावें ॥ ९७ ॥ हरीनें त्यागिलें द्वारकेसी । समुद्र बुडवील शीघ्रगतींशीं । हें कृष्णें सांगितलें तुम्हांसी । एथूनि त्वरेंसीं निघावें ॥ ९८ ॥ ऐकूनि दारुकाची गोठी । द्वारकेसी एक बोंब उठी । उग्रसेन कपाळ पिटी । मस्तक आपटी वसुदेव ॥ ९९ ॥ एक कुस्करिती दोनी हात । एक अत्यंत चरफडत । एक अक्रोशें आक्रंदत । एक मूर्च्छित पैं पडलीं ॥ २०० ॥ एकां रडतां शोषले कंठ । एकाचे दोनी फुटले ओंठ । एकाचा होऊं पाहे हृदयस्फोट । दुःख अचाट सर्वांसीं ॥ १ ॥ एक स्फुंदती उकसाबुकशीं । एक पिटिती हृदयासी । एक तोडिती कान-केशीं । एक दुःखें पिशीं पैं जाहलीं ॥ २ ॥ एक दती दीर्घ हाका । एक पडलीं अधोमुखा । एक मीनापरी देखा । अत्यंतिका तळमळती ॥ ३ ॥ बोंब सुटली नरनारी । शंख करिती घरोघरीं । कोण कोणाते निवारी । समस्तां सरी समदुःख ॥ ४ ॥ देवकी आणि रोहिणी । मूर्च्छित पडल्या धरणीं । सर्वेचि उठती आक्रंदोनी । दीर्घध्वनीं बिलपती ॥ ५ ॥ कृष्णा निजाच्या विसाविया । भेटी दे कां रे कान्हया । कां रुसलासी तान्हया । तुझिया पायां लागेन ॥ ६ ॥ कृष्णा तूं माझा कैवारी । कृष्णा तूं माझा सहाकारी । शेखीं मज सांडोनि अंधारीं । तूं दूरचे दुरी गेलास ॥ ७ ॥ जिणोनि कंसकेशियांतें ।

दारुक म्हणाला कीं, तुम्ही सगळे अर्जुनाला बरोबर घेऊन अगोदर येथून निघा. अर्धाक्षणहि येथें राहूं नका. सगळे यादव मरण पावले. ९३ यादवांनीं प्रभासक्षेत्रीं जाऊन तेथें यथाशास्त्र तीर्थविधि केला. ब्राह्मणांना भोजन व दान दिलें आणि आपण मद्यपान आरंभिलें. ९४ त्यांना मद्याचा उन्माद चढला. त्या धुंदींत त्या यादवांनीं सखे, गोत्रज, बांधव यांच्यांत परस्पर युद्ध मांडिलें. त्यांत सगळ्या कुलाचा संहार झाला. ९५ शस्त्रांनीं कोणी यादव मरेनात, तेव्हां तेथें एक अपूर्वच चमत्कार घडला व लव्हाळ्यांनीं सगळ्यांचा घात झाला. नंतर बलिरामानें देह सोडला व श्रीकृष्ण निजधामाला गेला. त्यानें मला तुमच्यापाशीं निरोप घेऊन पाठविलें आहे. तुम्ही आतां क्षणभरहि द्वारकेंत राहूं नका. ९७ श्रीकृष्णानें द्वारका सोडली, हें कळतांच समुद्र द्वारका त्वरित बुडवून टाकील. म्हणून श्रीकृष्णानें तुम्हांला सांगितलें आहे कीं, तुम्ही सत्वर येथून निघा. ९८ हें दारुकाचें वचन ऐकतांच द्वारकेंत एकच हाहाकार उडाला. उग्रसेन कपाळ फोडूं लागला. वसुदेव मस्तक बडवूं लागला. ९९ कोणी दोन्ही हात पिळूं लागले. कोणी तडफडूं लागले. कोणी आक्रोश करूं लागले. तर कोणी मूर्च्छित पडले. २०० कोणाच्या घशाला रडून-रडून कोरड पडली. कोणाचे दोन्ही ओंठ फुटले. कोणाला हृदयस्फोट होतोसा वाटलें. असें सगळ्यांना दुःसह दुःख झालें. १ कोणी ओकसा-बोकशीं रडूं लागले. कोणी ऊर बडवून घेऊं लागले; तर कोणी कान व केस उपटूं लागले. असे ते दुःखानें वेडे झाले. २ कोणी मोठ्यानें हांका मारूं लागले. कोणी खालीं मान घालून पडले. कोणी माशासारखे तळमळूं लागले. ३ स्त्री-पुरुषांनीं घरोघर आकान्त मांडला. सगळ्यांना सारखेंच दुःख झालें होतें, ४ तेथें कोण कोणाचें निवारण करणार व कोण कोणाचें सांत्वन करणार! देवकी आणि रोहिणी भूमीवर मूर्च्छित होऊन पडल्या होत्या. त्या सावध होऊन गडबडीनें उठल्या व दीर्घस्वरानें विलाप करूं लागल्या, ५–'हे कृष्णा! आमच्या जीवाच्या विसाव्या, हे कन्हया! आम्हांला भेट दे रे! माझ्या तान्ह्या! कां बाबा रुसलास! मी तुझ्या पायां पडतें; पण आम्हांला सोडून नको रे जाऊं! ६ कृष्णा तूं माझा कैवारी, माझा साहाकर्ता असतां शेवटीं मला अंधारांत टाकून बाहेरच्या बाहेर दूर कसा रे गेलास! ७ कंस-केशीयांचा पराभव करून तूं आम्हांला बंदींतून सोडविलेंस आणि आतां येथें सोडून

बंदीं सोडविले आमुतें । शेखीं तुवां सांडिलें एथें । अंतीं ठकिलें मातें श्रीकृष्णा ॥ ८ ॥ आणूनि निमाल्या पुत्रांतें । तुवां मज सुखी केलें एथें । शेखीं तुवां सांडिलें एथें । निष्ठुर चित्तें जाहलासी ॥ ९ ॥ कृष्णा निरसूनि माझें दुःख । तुवां दिधलें परम सुख । तो तुं निष्ठुर जाहलासी देख । अंतीं निःशंक सांडिलें ॥२१०॥ माझिया पुत्रा कृष्णराया । वेगीं ये कां रे कान्हया । माझ्या नाहीं प्राशिलें पान्हया । म्हणोनि तान्हया रुसलासी ॥ ११ ॥ जिचें केलें स्तनपान । ते यशोदाही जाहली दीन । तुझें न देखतां वदन । कैसेनि प्राण राहतील ॥ १२ ॥ कृष्णा येरे येरे धांवोन । चौभुजीं मज दे आलिंगन । तुझें चुंबीन रे वदन । मी अति दीन तुजलागीं ॥ १३ ॥ कृष्णा माझिया श्यामसुंदरा । राजीवलोचना सुकुमारा । चतुर्भुजा शार्ङ्गधरा । ये कां रे उदारा श्रीकृष्णा ॥ १४ ॥ तुझे पद्मांकित पाये । मज आठवती पाहें । तेणें हृदय फुटताहे । करूं मी काये श्रीकृष्णा ॥ १५ ॥ कृष्णा तुजहूनि वेगळी । मी जाहलें रे आंधळी । माझी धरावया आंगोळी । धांव वनमाळी श्रीकृष्णा ॥ १६ ॥ मज अंधेची कृष्ण काठी । कोणें घातली वैकुंठीं । आतां मी मार्ग केउता कंठीं । पाव जगजेठी श्रीकृष्णा ॥ १७ ॥ पुत्र नातू वंशावळी । एके वेळीं जाहली होळी । कोणी नुरेचि यदुकुळीं । वक्षस्थळीं पिटिती ॥ १८ ॥ यादव पडले रे केउते । तुज कोठूनि धाडिलें कृष्णनाथें । वेगीं न्यारे मज तेथें । पाहीन समस्तें तानुलीं ॥ १९ ॥ ऐकोनि देवकीचें वचन । वसुदेवादि उग्रसेन । आक्रंदोनि सकळ जन । प्रभासासी जाण निघाले ॥ २२० ॥

तत्र स्म त्वरिता जग्मुः कृष्णविश्लेषविह्वलाः । व्यसवः शेरते यत्र ज्ञातयोघ्नन्त आननम् ॥ १७ ॥

स्त्रिया पुरुष सुहृदजन । मिळोनि स्वगोत्रजन । शीघ्र प्रभासा गमन । करीत रुदन निघाली

चाललास ! मला शेवटीं असें फसविलेंस ना ! ८ हे श्रीकृष्णा ! माझ्या मृत पुत्रांना तूं आणून दिलेंस व मला सुखी केलेंस. ९ ज्या तूं मला परम सुख दिलेंस तोच तूं आतां कसा रे निष्ठुर झालास ! शेवटीं आम्हांला सोडून कसा रे गेलास ! २१० माझ्या बाळा श्रीकृष्णा ! कन्हया ! लवकर ये कीं रे ! मीं तुला बालपणीं पाजिलें नाहीं म्हणून का रुसलास ! ११ मग तूं जिचें दूध प्यालास ती यशोदाहि तुझ्यावांचून दीन झाली आहे ना ! तुझें मुख दृष्टीस पडलें नाहीं तर आमचे प्राण तरी कसे रहातील ! १२ कृष्णा ! ये रे बाबा, धांवत ये आणि आपल्या हातांनीं मला आलिंगन दे. मला तुझ्या मुखाचें चुंबन घेऊं दे. मी तुझ्यासाठीं अगदीं दीन झालें आहें रे ! १३ अरे माझ्या श्रीकृष्णा ! श्यामसुंदरा ! राजीवनयना ! सुकुमारा ! चतुर्भुज उदार श्रीकृष्णा ! ये कीं रे ! १४ तुझ्या कमलांकित पायांची आठवण होऊन माझें हृदय फुटत आहे. अरे श्रीकृष्णा ! आतां मी काय रे करूं ! १५ कृष्णा ! तुझ्यापासून वेगळी पडलेली मी आंधळी झालें आहें. त्या मला हात धरून नेण्यासाठीं तरी हे वनमाळी श्रीकृष्णा ! धांव ! १६ कृष्ण मज आंधळीची काठी होता. त्याला वैकुंठाला कोणीं हो नेलें ! आतां मी आयुष्याची वाट कशी कंठूं ! अरे जगजेठी श्रीकृष्णा ! पाव रे बाबा ! १७ पुत्र, नातु, व सगळें कुल यांची एकाच वेळीं होळी झाली. आमच्या यदुकुलांत आतां कोणीच उरलें नाहीं, असें म्हणून त्या ऊर बडवून घेऊं लागल्या १८ व कित्येक यादव पडले. शेवटीं दारुका ! तुला श्रीकृष्णानें कोठून पाठविलें. मला सत्वर तेथें न्यारे, म्हणजे मी माझी सगळीं बाळें पाहीन.' १९ हे देवकीचे शब्द ऐकून वसुदेव, उग्रसेन व सगळे लोक आक्रोश करीत प्रभासाला जावयास निघाले. २२०.

कृष्णविश्लेषविह्वलाः ते त्वरिताः यत्र व्यसवः ज्ञातयः शेरते तत्र आननं घ्नन्तः जग्मुः स्म—आणि कृष्णवियोगानें विह्वल झालेले ते सर्व आपल्या ज्ञातीचे लोक जेथें गतप्राण होऊन पडले होते तेथें आपापल्या मुखांवर ताडन करीत गेले. १७.

स्त्रिया, पुरुष, सुहृद्, व इतर सर्व आप्त-इष्ट मिळून रडत रडत प्रभासाला जावयास निघाले. २१ स्त्रियांनीं

॥ २१ ॥ हाकाबोंबांचा बंबाळ । स्त्रिया करिती कोल्हाळ । कृष्णवियोगें सकळ । दुःखविव्हळ निघालीं ॥ २२ ॥ रणीं पडिले यादव । प्राणरहित निर्जीव । तेथ पावलीं सर्व । बोंबा खंती करिती ॥ २३ ॥

देवकी रोहिणी चैव वसुदेवस्तथा सुतौ । कृष्णरामावपश्यन्तः शोकार्ता विजहुः स्मृतिम् ॥ १८ ॥
प्राणांश्च विजहुस्तत्र भगवद्विरहातुराः । उपगुह्य पतींस्तात चितामारुरुहुः स्त्रियः ॥ १९ ॥

देवकी आणि रोहिणी । वसुदेव उग्रसेन दोनी । यादव निमाले रणांगणीं । तयें स्थानीं पाहों येती ॥ २४ ॥ दीर्घशयनें युद्धधरणी । पडिल्या यादववीरश्रेणी । तेथें रामकृष्ण पुत्र दोनी । पाहतां नयनीं न देखती ॥ २५ ॥ कृष्णविरहें शोकाकुलित । दुःख न संठेचि अतिअद्भुत । चौघें जणें आक्रंदत । पडिलीं मूर्च्छित अतिदुःखें ॥ २६ ॥ निमाल्या रामकृष्णांचें मुख । आम्ही न देखोंचि निःशेख । तेणें उथळे परम दुःख । दुःखासवें देख निमालीं ॥ २७ ॥ प्राणें करावें उत्क्रमण । त्यांसीही कृष्णदुःखें दारुण । दुःखें निमाले स्वयें प्राण । वांचवी कोण तयांतें ॥ २८ ॥ न देखतां राम कृष्ण । ते मूर्च्छेसवेंचि प्राण । चौघीं जणीं त्यजिले जाण । अर्ध क्षण न लागतां ॥ २९ ॥ समस्त यादवांच्या स्त्रिया । आपुलाले धरूनि प्रिया । अग्निप्रवेश करावया । चढल्या लवलाह्यां चितेमाजीं ॥ २३० ॥ यादवांचिया स्त्रिया बहुतीं । कोण प्रवेशल्या कैशा रीतीं । ते अग्निप्रवेशाची स्थिती । परीक्षितीप्रती शुक सांगे ॥ ३१ ॥

रामपत्न्यश्च तद्देहमुपगुह्याग्निमाविशन् । वसुदेवपत्न्यस्तद्गात्रं प्रद्युम्नादीन् हरेः स्नुषाः ।
कृष्णपत्न्योऽविशन्नग्निं रुक्मिण्याद्यास्तदात्मिकाः ॥ २० ॥

विलाप करीत हांका मारून आकांत मांडिला. कृष्णाच्या वियोगानें सगळे दुःखानें विव्हल होऊन निघाले. २२ जेथें यादव युद्धांत मरून निर्जीव होऊन पडले होते, तेथें ते सर्व आले व शोकानें आक्रोश करूं लागले. २२३.

देवकी रोहिणी तथा एव वसुदेवः कृष्ण-रामौ सुतौ अपश्यन्तः शोकार्ता स्मृतिं विजहुः—देवकी, रोहिणी व त्याचप्रमाणें वसुदेव हीं राम व कृष्ण या आपल्या दोघां पुत्रांना न पाहिल्यामुळें शोकानें व्याकुळ होऊन भान विसरलीं. तत्र भगवद्विरहातुराः प्राणान् च विजहुः—तेथें भगवानांच्या विरहानें आतुर झालेले ते प्राण सोडिते झाले. हे तात स्त्रियः पतीन् उपगुह्य चितां आरुरुहुः—हे राजा, स्त्रिया आपल्या पतींना आलिंगन देऊन चितेवर आरोहण करित्या झाल्या. १८-१९.

देवकी, रोहिणी, वसुदेव व उग्रसेन हीं चौघे रणांगणांत जेथें यादव मरण पावले, त्या जागीं पहावयास आलीं. २४ त्या युद्धभूमीवर यादववीरांच्या मृत देहांची रास पडली होती. परंतु तेथें त्यांत बलराम व श्रीकृष्ण यांचे देह दिसेनात. २५ कृष्णाच्या विरहानें तीं शोकाकुल झालीं. त्यांस दुःखावेग आवरेना. तेव्हां तीं चौघेंहि आक्रोश करीत तेथेंच मूर्च्छित होऊन पडलीं. २६ गेलेल्या राम-कृष्णांचें शेवटचें मुख सुद्धां दृष्टीस पडलें नाहीं, म्हणून त्यांना पराकाष्ठेचें दुःख झालें व त्या शोकाबरोबर त्यांचे प्राण निघून गेले. २७ प्राणांनीं देह सोडून जावें तर त्यांना श्रीकृष्णाचें दारुण दुःख झालें होतें. तेव्हां दुःखानें स्वतः प्राणच निघून गेल्यावर त्यांना वांचवणार कोण ! २८ राम-कृष्णांचे देह तेथें नाहींत, हें पहातांच त्या चौघांनीं तत्काळ प्राण सोडिला. २९ नंतर सगळ्या यादवस्त्रिया आपापल्या पतींचे मृतदेह घेऊन सती जाण्यास त्यांच्याबरोबर चितेवर चढल्या. ३० यादवांच्या असंख्य स्त्रिया होत्या. त्यांतील कोणीं कशाप्रकारें अग्निप्रवेश केला, तो वृत्तान्त शुकाचार्य परीक्षिति राजाला सांगत आहे. २३१.

रामपत्न्यः च तद्देहं उपगुह्य अग्निं आविशन्—बलरामाच्या स्त्रिया त्याच्या देहाला आलिंगन देऊन अग्नींत प्रवेश करित्या झाल्या. वसुदेवपत्न्यः तत् गात्रं—वसुदेवाच्या स्त्रिया त्याच्या शरीराला, हरेः स्नुषाः प्रद्युम्नादीन्—हरीच्या सुना प्रद्युम्नादिकांच्या शरीरांना आलिंगन देऊन आणि रुक्मिण्याद्याः कृष्णपत्न्यः तदात्मिकाः अग्निं आविशन्—रुक्मिणी आदिकरून तद्रूप झालेल्या कृष्णस्त्रिया अग्नींत प्रवेश करित्या झाल्या. २०.

बळरामाचिया पत्नी । रेवत्यादि मुख्य करूनी । स्वपतीचा देह धरूनी । प्रवेशल्या अग्नीं तद्ध्यानयुक्त ॥ ३२ ॥ निघाल्या देवकी रोहिणी । इतरा ज्या वसुदेवपत्नी । त्याही प्रवेशल्या अग्नीं । देह धरूनी स्वपतीचा ॥ ३३ ॥ प्रद्युम्नासवें रती । प्रवेशली महासती । सांबासवें रूपवती । प्रवेशे निश्चितीं दुर्योधनकन्या ॥ ३४ ॥ अनिरुद्धासवें देखा । प्रवेशे रोचना आणि उखा । एवं कृष्णसुना सकळिका । यादवनायिका प्रवेशल्या अग्नीं ॥ ३५ ॥ अग्निप्रवेशीं श्रीकृष्णपत्नी । त्यांची अलोलिक करणी । त्यांमाजीं मुख्य रुक्मिणी । सतीशिरोमणी जगन्माता ॥ ३६ कृष्णनिर्याणें रुक्मिणी । तद्रूप जाहली तत्क्षणीं । जेवीं ज्वाळा मिळे वन्हीं । तेवीं कृष्णपत्नी तदात्मिका ॥ ३७ ॥ रुक्मिणीचा देह दहन । करावया नुरेचि प्रेतपण । कृष्णपूर्णत्वें स्वयंभ पूर्ण । गती समान दोहींची ॥ ३८ ॥ कृष्ण गेला जाणोनि रुक्मिणी । तटस्थ ठेली तत्क्षणीं । सांडूनि देहाची गवसणी । कृष्णस्वरूपमिळणीं तदात्मिका जाली ॥ ३९ ॥ जैसी गती रुक्मिणी । तैशाचि मुख्य सात जणी । आणीक सोळासहस्र कामिनी । प्रवेशल्या अग्नी तादात्म्यभावें ॥ २४० ॥ जिहीं भोगलें कृष्णसुरतसुख । त्यांसी गति न्यूनाधिक । बोलतां वाचेसी लागे दोख । जाहल्या चिदात्मक कृष्णांगसंगें ॥ ४१ ॥ जो वाचे स्मरे कृष्ण कृष्ण । तो तदात्मता पावे पूर्ण । मा जिहीं भोगिला श्रीकृष्ण । त्यांशी दशा न्यून कदा न घडे ॥ ४२ ॥ ज्यासी लागे कृष्णाचा अंगसंग । त्याच्या लिंगदेहा होय भंग । त्यासी पूर्ण पदवी अभंग । भोगितां भोग तादात्म्य नित्य ॥ ४३ ॥ ज्याच्या ध्यानासी ये कृष्णमूर्ती । त्यांसी चारी मुक्ति वंदिती । मा जिहीं स्वयें भोगिला श्रीपती । त्यांसी अन्य गति असेना ॥ ४४ ॥ ज्यांसी इहलोकीं कृष्णसंगती । त्यांसी परलोकीं अन्य गती । बोलतां सज्ञान कोपती । त्यांसी पूर्ण प्राप्ती पूर्णत्वें ॥ ४५ ॥ जो अडखळोनि गंगेसी पडे । त्याचें पातक तत्काळ उडे । मा ज्यासी विध्युक्त स्नान घडे । त्याचें पाप न झडे मग कैसेनि ॥ ४६ ॥

बळरामाच्या रेवती व इतर भार्या यांनीं पतीच्या देहाबरोबर अग्निप्रवेश केला. ३२ देवकी व रोहिणी यांचें प्राणोत्क्रमण झालेंच होतें. वसुदेवाच्या इतर स्त्रियांनींहि पतीच्या देहाबरोबर अग्निप्रवेश केला. ३३ प्रद्युम्नाबरोबर महासाध्वी रती, सांबाबरोबर दुर्योधनाची कन्या रूपवती, ३४ अनिरुद्धाबरोबर रोचना व उषा याप्रमाणें श्रीकृष्णाच्या सुना व सर्व यादवांच्या श्रेष्ठ स्त्रिया आपापल्या पतीबरोबर सति गेल्या. ३५ श्रीकृष्णाच्या सर्व स्त्रियांनीं अग्निप्रवेश केला. त्यांत श्रीकृष्णाची पट्टराणी, जगन्माता, श्रेष्ठ पतिव्रता जी रुक्मिणी तिची करणी अलौकिक होती. ३६ ज्याप्रमाणें ज्वाला अग्नीला जाऊन मिळते, त्याप्रमाणें श्रीकृष्णाच्या निर्याणाबरोबर ती श्रीकृष्णाची पत्नी तद्रूप झाली. ३७ रुक्मिणीचा देह दहन होण्यास प्रेतरूपानें मागें राहिलाच नाहीं. श्रीकृष्णाच्या पूर्णत्वानें ती स्वतः पूर्ण होती. त्यामुळें त्या दोघांची गति एकसारखीच झाली. ३८ श्रीकृष्ण गेला हें जाणून रुक्मिणी देहाचें कवच टाकून तत्क्षणीं अचेतन झाली. ती श्रीकृष्णस्वरूपाशीं तद्रूप झाली. ३९ जी रुक्मिणीची गति झाली, तीच स्थिति दुसऱ्या सातजणींची झाली. इतर ज्या त्याच्या सोळा हजार स्त्रिया होत्या, त्यांनीं तादात्म्य भावानें अग्निप्रवेश केला. २४० ज्यांना श्रीकृष्णाचें स्पर्शसुख लाभलें होतें, त्यांना न्यूनाधिक गति मिळाली, असें बोललें असतां वाणीलाच दोष लागेल. श्रीकृष्णाच्या अंगस्पर्शानें त्या सर्वत्र श्रीकृष्णस्त्रिया चित्स्वरूप झाल्या. ४१ जो वाणीनें नुसतें 'कृष्ण कृष्ण' बोलतो, त्यालाहि जर सायुज्यमुक्ति मिळते, तर मग ज्यांनीं श्रीकृष्णाबरोबर विलास भोगिले त्यांना अधिक-उणी गति कशी मिळेल ! ४२ ज्याला श्रीकृष्णाचा स्पर्श घडतो त्याच्या वासनात्मक सूक्ष्म देहाचा नाश होतो व तो अखंड तत्त्वरूपाला नित्य अनुभवितो. ४३. जे श्रीकृष्णमूर्तीचें ध्यान करितात, त्यांस चारी मुक्ति वंदन करितात. मग ज्यांनीं स्वतः श्रीकृष्णाबरोबर विषयोपभोग घेतले, त्यांना अन्य गति कशी प्राप्त होईल ! ४४ ज्यांना या लोकीं श्रीकृष्णाचा सहवास घडला, त्यांना परलोकीं अन्य गति मिळेल असें बोलल्यास ज्ञात्यांना मोठा क्रोध येईल. वास्तव त्यांना पूर्णत्वानें पूर्ण प्राप्तीच झाली. ४५ एखादा मनुष्य सहज अडखळून जर गंगेंत पडला तर त्याचें सर्व पातक तत्काल नाहींसें होतें, मग जे गंगेंत मुद्दाम विधियुक्त स्नान करितात, त्यांच्या पापाचा नाश कां होणार नाहीं ! ४६ त्याचप्रमाणें श्रीकृष्णाबरोबर व्यभि-

तेवीं कृष्णव्यभिचारसंगतीं । गोपी उद्धरल्या नेणों किती । त्याच्या निजपत्न्यांसी अन्य गती । कैशा रीतीं घडेल ॥ ४७ ॥ तृण वल्ली मृग पाषाण । गायी गोपिका गौळीजन । कृष्णसंगें तरले पूर्ण । त्याचिया स्त्रियांसी अन्य गति कैशी ॥ ४८ ॥ यालागीं कृष्णसंगती । ज्यांसी घडली भलत्या रीतीं । ते उद्धरले गा निश्चितीं । जाण परीक्षिति कुरुराया ॥ ४९ ॥

अर्जुनः प्रेयसः सख्युः कृष्णस्य विरहातुरः । आत्मानं सान्त्वयामास कृष्णगीतैः सदुक्तिभिः ॥ २१ ॥

ज्याचा रथ वागवी आपण । ज्याचा सारथी श्रीकृष्ण । ऐसा प्रियसखा अर्जुन । कृष्णविरहें पूर्ण उद्विग्न जाहला ॥ २५० ॥ तंव कृष्णगीता सदुक्ती । आवठली त्याचिये चित्तीं । मग आपण आपण्याप्रती । बोलिला उपपत्ती त्या ऐका ॥ ५१ ॥ कृष्ण माझ्या मनाचें मन । कृष्ण बुद्धीचें आयतन । कृष्णप्रभा हे प्रकाशे ज्ञान । तेथ भिन्नपण मज कैसें ॥ ५२ ॥ कृष्णप्रभा दृष्टी देखे । कृष्णअवधानें श्रवण ऐके । कृष्णानुवादें बोल बोलके । तेथ मी वेगळिके वृथा मानीं ॥ ५३ ॥ कृष्ण हृदयस्थ आत्मा अव्यंग । कृष्ण माझ्या अंगाचें अंग । त्या कृष्णासी मज वियोग । हा मिथ्या प्रयोग मायिक ॥ ५४ ॥ कृष्ण माझ्या जीवाचें जीवन । कृष्ण सबाह्य परिपूर्ण । कृष्णें वियोग मानिजे मीपण । तेंही निमग्न श्रीकृष्णा ॥ ५५ ॥ भिन्न भिन्न भूताकृती । त्यांमाजीं अभिन्न कृष्णस्थिती । विषमीं समान श्रीपती । त्यासी वियोगप्राप्ति कदा न घडे ॥ ५६ ॥ घट मृत्तिकेसी नव्हे भिन्न । पट नव्हे तंतु त्यागून । तैसा श्रीकृष्णावेगळा अर्जुन । माझें मीपण निवडेना ॥ ५७ ॥ कृष्णवियोग मी मानीं जेथ । तेथही असे श्रीकृष्णनाथ । वियोग मानिजे सत्य । ते केवळ भ्रांत अतिमूर्ख ॥ ५८ ॥ नित्य सर्वगत परिपूर्ण । कृष्ण अखंडदंडायमान । त्यासीं मजसीं वेगळेपण । सर्वथा जाण असेना

चार संबंध ठेवूनहि किती गोपींचा उद्धार झाला, याची गणति नाहीं. मग त्याच्या विवाहित स्त्रियांना अन्य गति कशी प्राप्त होईल ! ४७ तृण, वेली, मृग, पाषाण, गायी, गोपिका व गवळी हे सगळे जग श्रीकृष्णाच्या संगतीनें तरून गेले; तर मग त्यांच्या स्त्रिया अन्य गतीला कशा जातील ! ४८ यास्तव हे कुरुराजा परीक्षिति राजा ! श्रीकृष्णाचा सहवास कोणत्या कां प्रकारे होईना, ज्यांना ज्यांना तो घडला ते सगळे निश्चयानें उद्धरून गेले. २४९.

प्रेयसः सख्युः कृष्णस्य विरहातुरः अर्जुनः कृष्णगीतैः सदुक्तिभिः आत्मानं सान्त्वयामास–प्रियसखा जो कृष्ण त्याच्या विरहानें आतुर झालेला अर्जुन ज्यांतील उक्ति अक्षरशः खऱ्या आहेत, अशा 'नाहं प्रकाशः सर्वस्य०' सु.गी. ७–२५ पृ. १५६. इत्यादि कृष्णानें केलेल्या उपदेशानें स्वतःचें सांत्वन करिता झाला. २१.

श्रीकृष्णानें स्वतः ज्याचा रथ चालविला, ज्याचा तो सारथी झाला, तो त्याचा प्रिय सखा अर्जुन श्रीकृष्णाच्या विरहानें अत्यंत दुःखी झाला. २५० तेव्हां त्याला श्रीकृष्णानें उपदेशिलेल्या भगवद्गीतेची आठवण झाली. त्यावेळीं त्यानें स्वतःचें समाधान कसें केलें, तें ऐका. ५१ श्रीकृष्ण माझ्या मनाचें मन, बुद्धीचें अधिष्ठान व श्रीकृष्णाची प्रभाच ज्ञानालाहि प्रकाशविणारी आहे. तेव्हां माझ्यांत व श्रीकृष्णांत भेद कोठचा ! ५२ श्रीकृष्णाच्या प्रकाशानेंच डोळे पहातात, कान ऐकतात, त्याच्याच अनुवादानें शब्द बोलतात, तेव्हां मी स्वतःला त्याच्याहून भिन्न व्यर्थ समजतो. ५३ श्रीकृष्ण हृदयांत रहाणारा अव्यंग आत्मा आहे. तोच माझ्या शरीराचे अवयव आहे. अशा श्रीकृष्णाचा वियोग झाला, हें म्हणणेंहि मिथ्या मायिक आहे. ५४ श्रीकृष्ण माझ्या जीवाचें जीवन आहे. श्रीकृष्ण सबाह्य भरलेला आहे. जो 'मीपणा' श्रीकृष्णाचा वियोग मानितो, तोहि श्रीकृष्णांत बुडून जातो. ५५ जीं भिन्न भिन्न प्राणिशरीरें आहेत. त्यांत श्रीकृष्ण ऐक्यरूपानें राहिला आहे. विषमांतहि सम असलेला जो श्रीहरि त्याचा वियोग कदापि घडत नाहीं. ५६ घट जसा मातीहून भिन्न नाहीं, किंवा वस्त्र जसें तंतूहून भिन्न नाहीं, तसा मी अर्जुन श्रीकृष्णाहून भिन्न नाहीं कारण माझें मीपण त्याच्याहून भिन्न नाहीं. ५७ मी जेथें श्रीकृष्णवियोग मानितों, तेथेंहि श्रीकृष्ण आहेच. जे वियोग सत्य मानितात, ते अत्यंत भ्रांत व अतिमूर्ख होत. ५८ जो नित्य, सर्वगत, परिपूर्ण, अखंड-एकरूप, त्या श्रीकृष्णांत व माझ्यात मुळींच भेद नाहीं. ५९ श्रीकृष्णानें स्वतःच 'न जायते म्रियते०' म्ह० आत्मा जन्मत नाहीं व मरत नाहीं, असें भगवद्गीतेंत

॥ ५९ ॥ 'न जायते म्रियते' हें वचन । स्वमुखें बोलिला पुरुषोत्तम । त्या कृष्णासी जन्ममरण । मूर्खजन मानिती ॥ २६० ॥ 'अक्षरं ब्रह्म परम' । स्वयें बोलिला पुरुषोत्तम । त्या कृष्णासी जन्ममरण । मूर्ख मनोधर्म कल्पिती ॥ ६१ ॥ 'क्षराक्षरातीत । उत्तम पुरुष' श्रीकृष्णनाथ । त्यासी जन्ममरणादि आवर्त । कल्पिती भ्रांत मनोधर्में ॥ ६२ ॥ त्या कृष्णासीं मज वेगळेपण । कल्पांतींही नाहीं जाण । करितां गीतार्थाचें स्मरण । आपुलें आपण पूर्णत्व देखे ॥ ६३ ॥ मी अज आद्य अचळ । मी नित्य निज निर्मळ । माझ्या स्वरूपा नाहीं चळ । त्रैलोक्य खेळ पैं माझा ॥ ६४ ॥ जगातें नेमिता वेद । तो निःश्वसित माझा बोध । मी आनंदासी परमानंद । स्वानंदकंद निजांगें ॥ ६५ ॥ मी आपरूपें आप । मी प्रकृतिपुरुषांचा बाप । मी अवतारी अवतरें कृष्णरूप । हा सत्य संकल्प पैं माझा ॥ ६६ ॥ धरोनि माझ्या स्वरूपाचा आधार । मीचि कृष्णरूप अवतार । करूनि स्वलीला नानाचरित्र । अंतीं सामावें साचार मजमाजीं मीच ॥ ६७ ॥ माझ्या निजस्वरूपाचेनि बळें । मीच कृष्णरूपें खेळ खेळें । अंतीं मजमाजीं मीच मिळें । निजात्ममेळें निजनिष्ठा ॥ ६८ ॥ एक नर एक नारायण । परस्परें ते अभिन्न । यालागीं पूर्णत्वें अर्जुन । आपण्या आपण स्वयें देखे ॥ ६९ ॥ बाप कृपाळू कृपानिधि । उपदेशिला युद्धसंधीं । परी लाविली जे समाधी । ते न मोडे त्रिशुद्धी कल्पांतकाळीं ॥ २७० ॥ नाहीं स्थानशुद्धि चखोट । सैंघ रथांचे घडघडाट । सुटतां शस्त्रांचे कडकडाट । लाविली निर्दुष्ट परमात्मनिष्ठा ॥ ७१ ॥ कैशी लाविली समाधी । जी न मोडेच महायुद्धीं । शेखीं कृष्णावसानअवधी । तोचि बोध उद्बोधी परिपूर्णत्वें ॥ ७२ ॥ ज्यासी गीता उपदेशी कृष्ण । त्यासी न बाणे पूर्णपण । ऐसें बोलतांचि वचन । परम दूषण वाचेसी ॥ ७३ ॥ ते वाचा गलितकुष्ठीं झडे । तीस विकल्पें पडती किडे । ते वाचाचि समूळ झडे । कृष्णोक्तीं न घडे बोध

सांगितलें आहे. (सु. गी. २-२० पृ. २८) त्या श्रीकृष्णाचें जन्म-मरण मूर्ख लोकानींच मानावें. २६० 'अक्षरं ब्रह्म परमं' (सु. गी. ८-३ पृ. १६१) असें स्वतः पुरुषोत्तमानें म्हटलेलें आहे. त्याचें जन्म-मरण ही मूर्खांची मनःकल्पना आहे. ६१ 'यस्मात् क्षरमतीतोऽहम्०' म्ह० क्षर आणि अक्षर यांच्याहि पलीकडे असणारा उत्तम पुरुष मी आहें. (सु. गी. १५-१८ पृ. २८७) असें श्रीकृष्णनाथानें म्हटलेलें असतांना त्याला जन्म-मरणाचे फेरे आहेत, ही भ्रांत लोकांच्या मनाची कल्पना आहे. ६२ तो श्रीकृष्ण माझ्याहून कल्पांतींहि भिन्न नाहीं. याप्रमाणें गीतार्थ आठवितांच स्वतःचा पूर्णपणा त्याचा त्यालाच कळून आला. ६३ मी अज, आद्य, अचल, नित्य, निर्मल, आहे, माझें स्वरूप चंचल नाहीं. हें त्रैलोक्य माझाच खेळ आहे. ६४ जगाला नियम घालून देणारा जो वेद, तोच माझा श्वासरूप बोध आहे. मी आनंदाचा परमानंद, स्वतःच आत्मस्वरूप आहें. ६५ मी उदकरूपानें असलेलें जल, प्रकृति-पुरुषांचा जनक व कृष्णरूपानें अवतार घेणारा आहे. हाच माझा दृढ निश्चय आहे. ६६ माझ्या रूपाचा आधार घेऊन मीच श्रीकृष्णवतार घेतला. आपल्या लीलेनें अनेक प्रकारचें चरित्र आचरिलें व शेवटीं स्वस्वरूपांतच लीन झालों. ६७ माझ्या आत्मस्वरूपाच्या सामर्थ्यानें मीच श्रीकृष्णरूपानीं खेळ खेळलों व शेवटीं आत्मनिष्ठेनें एकरूप होऊन स्वरूपांत मिळून गेलों. ६८ अर्जुन नर व श्रीकृष्ण नारायण, हे दोघे परस्परांहून भिन्न नव्हते. म्हणून अर्जुन आपणच स्वतःला परिपूर्णत्वानें पाहूं लागला. ६९ तो कृपासागर मोठा दयाळु ! त्यानें युद्धप्रसंगीं गीतेचा उपदेश ऐकून जी समाधि लाविली, ती कल्पांतींहि ढळली नाहीं. २७० तें स्थलहि निर्जन व पवित्र नव्हतें. त्या युद्धभूमीवर असंख्य रथांच्या खडखडाटांत व शस्त्रांच्या खणखणाटांत त्यानें परमात्मनिष्ठेकडे चित्त लाविलें. ७१ त्यानें कशी समाधि लाविली पहा ! महायुद्धांत तिचा भंग झाला नाहीं. शेवटीं श्रीकृष्णनिर्याणप्रसंगीं तें आत्मज्ञान पूर्णपणें प्रकट झालें. ७२ ज्याला श्रीकृष्णानें गीतेचा उपदेश केला, त्याच्या अंगीं पूर्णपणा बाणला नाहीं, असें म्हटलें असतां वाणीला दूषण लागेल. ७३ श्रीकृष्णाच्या वचनानें आत्मज्ञान झालें नाहीं, असें म्हणणारी वाणी कुष्ठरोगानें गळून जाईल. विकल्पाचे किडे पडतील. जीभ झडून जाईल. ७४ गीतेच्या उपदेशानें पूर्ण-

म्हणतां ॥ ७४ ॥ गीताउपदेशें पूर्णपण । नव्हे ऐसें म्हणतां जाण । वाग्देवता कोपे आपण । इतरांचा कोण पडिपाडू ॥ ७५ ॥ गीता ऐके पाहे पढे । ज्यासी गीतास्मरण घडे । त्यासी पूर्णत्व स्वयें जोडे । मा उपदेशें नातुडे पूर्णत्व कैसें ॥ ७६ ॥ गीतार्थाचें पूर्णपण । वक्ता जाणे श्रीकृष्ण । कां श्रोता जाणे अर्जुन । ज्यासी ते खूण बाणली ॥ ७७ ॥ सारांश काढूनि वेदार्थी । श्रीकृष्णें प्रकट केली गीता । तेथील अभिप्राय पाहतां । जोडे अक्षयता निजमोक्ष ॥ ७८ ॥ परदेशी जाहला होता वेदांत । त्यासी सहाय जाहला गीतार्थ । तेणें बळें मतें समस्त । जिणोनि समर्थ ती जाहली ॥ ७९ ॥ कृष्णानिःश्वासें जन्मले वेद । गीता स्वमुखें प्रकटली शुद्ध । यालागीं गीतार्थ अगाध । घडौते वेद तेणें जाहले ॥ २८० ॥ वेदें आप्त केले तिनी वर्ण । दुराविले स्त्रीशूद्रजन । न शिवे त्यांचे कान । हें वेदांसी न्यून पैं आलें ॥ ८१ ॥ तें वेदाचें फेडावया उणें । गीता प्रकटिली श्रीकृष्णें । गीतेचे श्रवणें पठणें । उद्धरणें समस्तां ॥ ८२ ॥ अर्जुनाचे प्रीतीकारणें । गीतार्थ प्रकाशिला श्रीकृष्णें । गीतेचेनि श्रवणें पठणें । उद्धरणें जडजीवां ॥ ८३ ॥ असो अगाध गीतामहिमान । तेणें गीतार्थें तो अर्जुन । करूनि आपलें सांत्वन । जाहला सावधान प्रकृतिस्थ ॥ ८४ ॥

बन्धूनां नष्टगोत्राणामर्जुनः सांपरायिकम् । हतानां कारयामास यथावदनुपूर्वशः ॥ २२ ॥

यादव निमाले कूलवंशेंसीं । गोत्रज नाहीं कर्मांतरासीं । वज्र राहिला द्वारकेसी । तो विधी अर्जुनासी करणें पडला ॥ ८५ ॥ मी पावलों निष्कर्म ब्रह्म । तो मी न करीं अंत्यकर्म । ऐसा ज्ञानगर्वोपक्रम । तोही सूक्ष्म भ्रम अर्जुनीं नाहीं ॥ ८६ ॥ 'कर्मण्यकर्म यः पश्येत्' । हा अर्जुनीं बाणला पूर्णांश । तेणें तो अंत्यकर्मास । स्वयें सावकाश करिता जाहला ॥ ८७ ॥ प्रथम ज्येष्ठांचें दहन । पाठीं

पणा येत नाहीं असें म्हटलें असतां वाग्देवी सरस्वतीच कोपेल; मग इतरांची काय कथा ! ७५ जो गीता ऐकितो, किंवा तिचें पठण करितो किंवा गीतेचें स्मरण करितो त्यालाहि जर पूर्णपणा सहज प्राप्त होतो, तर मग तिचा प्रत्यक्ष ज्याला उपदेश केला, तो परिपूर्ण कसा होणार नाहीं ! ७६ गीतेचा पूर्ण अर्थ तिचा वक्ता एक श्रीकृष्ण जाणे ! किंवा श्रोता एक अर्जुन जाणे ! त्यालाच त्याची खूण पटली होती. ७७ वेदार्थाचें सार काढून श्रीकृष्णानें गीता रचिली आहे. यास्तव तिचें रहस्य जाणिलें असतां अक्षय मोक्ष प्राप्त होतो. ७८ वेद निराश्रित झाले होते. त्यांना गीतेनें साह्य केलें व त्यांच्याच बळावर ती इतर सगळीं मतें जिंकून समर्थ झाली. ७९ श्रीकृष्णाच्या श्वासोच्छ्वासापासून वेद झाले; पण गीता त्याच्या मुखानें प्रकट झाली. म्हणून गीतेचा अर्थ गहन आहे. गीतेमुळेंच वेदांना पूर्णत्व आलें. २८० वेदानें ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य या तीन वर्णांना जवळ ओढिलें आणि स्त्रीशूद्र यांना दूर लोटिलें होतें. तो वेद त्या बिचाऱ्यांच्या श्रवणालाहि स्पर्श करीना ! हे त्याच्या अंगीं मोठेंच वैगुण्य होतें. ८१ तें गौणत्व दूर करण्यासाठीं श्रीकृष्णानें गीता प्रकट केली व तिच्या श्रवण-पठणानें सर्वांचा उद्धार केला. ८२ अर्जुनावरील प्रीतीमुळें श्रीकृष्णानें गीतार्थ प्रकट केला. गीतेच्या श्रवण-पठणांनीं जड जीवांचा उद्धार होतो. ८३ गीतेचा महिमा असा अगाध आहे. त्या गीतार्थानेंच अर्जुनानें स्वतःचें सांत्वन केलें व देहभानावर येऊन शांत झाला. २८४.

अर्जुनः नष्टगोत्राणां हतानां बन्धूनां सांपरायिकं यथावत् अनुपूर्वशः कारयामास—अर्जुन मृत झालेल्या व संततिहीन अशा बांधवांचे पिंडोदकादि और्ध्वदेहिक यथाशास्त्र क्रमानें करविता झाला. २२.

यादव आपल्या सर्व वंशासह मरण पावले. त्यांची और्ध्वदेहिक क्रिया करण्यास कोणी गोत्रज उरला नाहीं. वज्र हा एक श्रीकृष्णाचा पणतु होता; पण तो द्वारकेंत राहिला. तेव्हां अर्जुनाला ती सर्व क्रिया करणें भाग पडलें. ८५ 'मी आतां निष्कर्म ब्रह्म झालों आहें, मग मीं हें अंत्य कर्म कशाला करावें' असा ज्ञानगर्वाचा ताठा अर्जुनांत लवमात्र नव्हता. ८६ 'कर्मण्यकर्म यः पश्येत्०' म्ह० कर्ममध्यें जो अकर्म पहातो तोच खरा योगी होय. (सु. गी. ४–१८ पृ. ८५) हें गीतावचन त्याच्या मनावर पूर्णपणें ठसलें होतें. म्हणून त्यानें स्वतःच सर्वांची उत्तरक्रिया शांतपणानें केली. ८७ प्रथम वडील माणसांचें व नंतर कनिष्ठांचें दहन केलें. तसेंच त्यांना पिंडदान दिलें व सर्वांचें

कनिष्ठांचें जाण । तैसेंच करी पिंडदान । तिळतर्पण सर्वांचें ।। ८८ ।। उत्तरक्रिया करूनि संपूर्ण । द्वारकेसी आला अर्जुन । तेथेंही वर्तलें आन । समुद्र दारुण क्षोभला ।। ८९ ।।

द्वारकां हरिणा त्यक्तां समुद्रोऽप्लावयत्क्षणात् । वर्जयित्वा महाराज श्रीमद्भगवदालयम् ।। २३ ।।

नित्यं सन्निहितस्तत्र भगवान् मधुसूदनः । स्मृत्याऽशेषाशुभहरं सर्वमङ्गलमङ्गलम् ।। २४ ।।

द्वारका सांडूनि गेला कृष्ण । तेथ समुद्र आला आपण । बुडविली न लागतां क्षण । पळाले जन हाहाभूत ।। २९० ।। द्वारका बुडविली पूर्ण । राखिलें भगवंताचें स्थान । जो आला पाताळींहून । कुळनिर्दळण करावया ।। ९१ ।। तें भगवंताचें स्थान । समुद्र न करीचि निमग्न । जेथ हरीचें सन्निधान । नित्य नूतन स्फुरद्रूप ।। ९२ ।। ज्याचें करितांचि स्मरण । महापातकां निर्दळण । सकळ मंगळांचें आयतन । तें हरीचें स्थान उरलें असे ।। ९३ ।। द्वारकेमाजीं नित्यपूजा । अद्यापि होतसे गरुडध्वजा । ऐक परीक्षिति महाराजा । तें अधोक्षजाचें स्थान ।। ९४ ।।

स्त्रीबालवृद्धानादाय हतशेषान् धनञ्जयः । इन्द्रप्रस्थं समावेश्य वज्रं तत्राभ्यषेचयत् ।। २५ ।।

एवं द्वारका जाहलिया निमग्न । उरले बाल वृद्ध स्त्रीजन । त्यांसी घेऊनियां अर्जुन । निघाला आपण इंद्रप्रस्था ।। ९५ ।। यादव प्रभासापर्यंत । गेले ते निमाले समस्त । उरले जे द्वारकेआंत । वज्रादिकांसमवेत अर्जुन निघे ।। ९६ ।। एवं घेऊनियां समस्तांसी । पार्थ आला इंद्रप्रस्थासी । राज्यधर यादववंशीं । तेथ वज्रासी अभिषेकीं ।। ९७ ।। अनिरुद्धाचा पुत्र वज्र । यादववंशीं राज्यधर । अभिषेकूनि अर्जुनवीर । निघे सत्वर धर्माप्रती ।। ९८ ।।

तिळतर्पण केलं. ८८ याप्रमाणें सर्वांची उत्तरक्रिया करून अर्जुन द्वारकेला गेला. तर तेथेंहि निराळाच अनर्थ उद्भवला होता. समुद्र भयंकर खवळला होता. २८९.

महाराज–हे परीक्षित् राजा ! समुद्रः हरिणा त्यक्तां द्वारकां श्रीमद्भगवदालयं वर्जयित्वा क्षणात् अप्लावयत्–समुद्र हरीनें सोडिलेल्या द्वारकेला श्रीमान् भगवानाचें मंदिर वर्ज्य करून एका क्षणांत बुडविता झाला, भगवान् मधुसूदनः तत्र नित्यं सान्निहितः–कारण भगवान् मधुसूदन त्या मंदिरांत नित्य स्थित आहे. त्यामुळें तें मंदिर, स्मृत्या अशेषाशुभहरं सर्वमङ्गलमङ्गलम्–स्मरणानें सर्व अशुभांचें हरण करणारें व सर्व मंगलाचें मंगल आहे. २३-२४.

श्रीकृष्ण द्वारका सोडून जातांच तेथें समुद्र आपणच आला व त्यानें एक क्षणहि न लावितां सगळी नगरी बुडविली. तेव्हां सगळे लोक हाहाकार करीत पळाले. २९० सगळी द्वारका बुडाली, परंतु भगवंताचें स्थान मात्र कायम राहिलें. पातळांतून जो कुलाचा नाश करावयास आला, ९१ त्या भगवंताचें स्थान समुद्रानें बुडविलें नाहीं. कारण हरीचें जेथें सान्निध्य असतें, तें स्थान नित्य प्रकाशरूप असतें. ९२ ज्याचें स्मरण केलें असतां महापातकांचा नाश होतो, जें सगळ्या मंगलांचें अधिष्ठान तें श्रीहरीचें स्थान तेवढें उरलें. ९३ द्वारकेंत अजूनहि त्या जागीं श्रीकृष्णाची पूजा होत असते. हे परीक्षिति राजा ! तें श्रीहरीचें ध्यान कसें आहे, तें सांगतों ऐक. २९४.

धनञ्जयः हतशेषान् स्त्री-बाल-वृद्धान् आदाय–धनंजय अवशिष्ट राहिलेल्या स्त्री, बालक व वृद्ध यांना घेऊन, इन्द्रप्रस्थं समावेश्य–आपल्या इंद्रप्रस्थ राजधानीस प्राप्त होऊन, तत्र वज्रं अभ्यषेचयत्–यादवांच्या राज्यावर वज्र या नांवाच्या यादवबालकास राज्याभिषेक करविता झाला. २५.

याप्रमाणें द्वारका बुडाल्यावर उरलेल्या वृद्ध, बालक व स्त्रिया यांना घेऊन अर्जुन इंद्रप्रस्थास निघाला. ९५ प्रभासाला जे यादव गेले होते ते सगळे मरण पावले. द्वारकेमध्यें जे वज्रादिक उरले होते त्यांना घेऊन अर्जुन निघाला. ९६ याप्रमाणें त्या सर्वांना घेऊन अर्जुन इंद्रप्रस्थास आला व त्यानें वज्राला यादववंशाचा राज्यकर्ता म्हणून राज्याभिषेक केला. ९७ यादवकुळातील राज्याचा वारस म्हणून अनिरुद्धाचा पुत्र वज्र राज्यावर बसवून वीर अर्जुन त्वरेनें धर्मराजाकडे जाण्यास निघाला. २९८.

श्रुत्वा सुहृद्वधं राजन्नर्जुनात्ते पितामहाः । त्वां तु वंशधरं कृत्वा जग्मुः सर्वे महापथम् ॥ २६ ॥

निजधामा गेला श्रीपती । अर्जुनें सांगतां धर्मांप्रती । तुज राज्य देऊनि परीक्षिती । लागलें महापंथीं तत्काळचि ॥ ९९ ॥ निजधामा गेला श्रीपति कृष्ण । ऐकतां कुंत्या सांडिला प्राण । द्रौपदीसहित पांचही जण । महापंथीं जाण निघाले ॥ ३०० ॥

य एतद्देवदेवस्य विष्णोः कर्माणि जन्म च । कीर्तयेत् श्रद्धया मर्त्यः सर्वपापैः प्रमुच्यते ॥ २७ ॥

देवाधिदेव सर्वेश्वर । त्याचे मत्स्यकूर्मादि अवतार । जन्मकर्मादि नाना चरित्र । गाती ते पवित्र पुण्यराशी ॥ १ ॥ तेंचि चरित्र तत्त्वतां । श्रद्धायुक्त गीतीं गातां । प्रयागादि समस्त तीर्थां । होय पवित्रता त्याचेनी ॥ २ ॥ श्रद्धायुक्त हरिकीर्तन । त्याचे पवित्रते समान । आन नाहीं गा पावन । तुझी आण गा परीक्षिति ॥ ३ ॥ ते तूं श्रद्धा कोण म्हणसी । जेवीं धनलोभी धनापासीं । गुळीं आवडी माकोड्यांसी । तैसी कीर्तनासी आवडी ॥ ४ ॥ जेवीं शिणतां काळें बहुतें । वंध्या प्रसवे एकोलतें । ते कळवळी जैशी त्यातें । तेवीं कीर्तनातें अतिप्रीती ॥ ५ ॥ जो कीर्तनाचेनि वैभवें । हरिचरित्र गावया सद्भावें । पतंगाचा ऐसा धावे । श्रद्धा त्या नांवें कुरुराया ॥ ६ ॥ ऐशिया श्रद्धासंपत्ती । वर्णितां भगद्गुणकीर्ती । श्रद्धाळुवा परम प्राप्ती । जाण निश्चितीं नृपनाथा ॥ ७ ॥ जरी आपण परमेश्वर । स्वलीला धरी नानावतार । तरी श्रीरामकृष्णचरित्र । अतिगंभीर पावनत्वें ॥ ८ ॥ कृष्णाची चोरी गीतीं गातां । सुवर्णस्तेया पावनता । कृष्णव्यभिचार वर्णितां । गुरुतल्पगता हरी दोष ॥ ९ ॥ पूतनापयःपानशोषण । तें चरित्र करितां पठण । सुरापानादि दोष दारुण । हरी संपूर्ण विश्वासकां ॥३१०॥ राक्षस-

---

राजन्—हे परीक्षित् राजा ! ते सर्वे पितामहाः अर्जुनात् सुहृद्वधं श्रुत्वा—तुझे सर्व पितामह अर्जुनाच्या तोंडून आपल्या सुहृदाचा वध ऐकून, त्वां तु वंशधरं कृत्वा महापथं जग्मुः—तुला आपल्या वंशाचा आधारस्तंभ करून महायानास गेले. २६.

हे परीक्षिति राजा ! श्रीकृष्ण निजधामाला गेल्याचा वृत्तान्त अर्जुनानें धर्मराजाला सांगतांच, ते पांडव तुला राज्य देऊन तत्काल आपल्या निर्याणाच्या मार्गाला लागले. ९९ श्रीकृष्ण निजधामाला गेल्याचें कळतांच कुंतीनें प्राण सोडिला आणि पांचहि पांडव द्रौपदीला घेऊन महापंथानें निघाले. ३००.

—आरंभापासून श्रीकृष्णाच्या चरित्राचें श्रवण करणाराला कोणतें फळ मिळतें तें पुढील दोन श्लोकांनीं सांगतात—

यः मर्त्यः देवदेवस्य विष्णोः एतत् कर्माणि जन्म च श्रद्धया कीर्तयेत् सः सर्वपापैः प्रमुच्यते—जो मानव देवाधिदेव विष्णूचीं हीं कर्मे व जन्म यांचें मोठ्या श्रद्धेनें संकीर्तन करितो तो सर्व पापांपासून मुक्त होतो. २७.

जो देवाधिदेव, सर्वेश्वर, ज्यानें मत्स्य-कूर्मादि अवतार धारण केले, त्याचीं जन्मकर्मादि नाना चरित्रें गाणारे पवित्र व पुण्यवान् होते. १ त्याचें चरित्र श्रद्धेनें गाइलें असतां प्रयागादि तीर्थेंहि त्याच्यायोगें पावन होतात. २ हे परीक्षिति राजा ! श्रद्धेनें हरिकीर्तन केलें असतां त्याच्यासारखें दुसरें पवित्र कांहींच नाहीं. ३ ती श्रद्धा कशी म्हणून जर विचारशील तर धनलोभ्याला जसा धनाचा सोस, मुंगळ्याला जशी गुळाची आवड ४ किंवा वांझेनें पुष्कळ काळ अनेक कष्ट सोशिल्यावर तिला झालेल्या एकुलत्या एक पुत्रावर तिची जशी अत्यंत प्रीति असते, ५ तशी हरिकीर्तनाची आवड असावी. हे कुरुराया ! पतंग जसा दिव्यावर झडप घालितो तसा जो कीर्तनाच्या आवडीनें, भक्तिभावानें हरिचरित्र गावयास धांवतो, त्याची ती भावनाच श्रद्धा होय. ६ अशा श्रद्धेनें भगवंताची गुणकीर्ति वर्णिली असतां त्या श्रद्धावानास परम प्राप्ति होते, असें हे नृपनाथा ! तूं खात्रीनें समज. ७ ईश्वर जरी आपल्या लीलेनें नानाप्रकारचे अवतार धारण करितो, तरी श्रीराम-कृष्णचरित्र पावन असल्यामुळें अति गंभीर आहे. ८ श्रीकृष्णाच्या चोरीचें जरी गायन केलें तरी सोनें चोरणाराहि पावन होतो. कृष्णाच्या व्यभिचाराचें वर्णन केलें असतां गुरुपत्नीगमनाच्या पातकाचा नाश

कुळींचा रावण । परी तो जातीचा शुद्ध ब्राह्मण । नित्य करी वेदपठण । ब्रह्मयाचा जाण तो नातू ॥ ११ ॥ त्याचें सकुळ निर्दळण । श्रीराम करी आपण । तें करितां पठण । ब्रह्महत्या जाण नासती ॥ १२ ॥ धर्मसाह्यकारी श्रीकृष्ण । केलें पांडवांचें रक्षण । त्या भारताचेनि श्रवणें जाण । निमाले ब्राह्मण वांचविले ॥ १३ ॥ अठरा ब्रह्महत्या जनमेजयासी । अठरा पर्वें सांगोनि त्यासी । निमाल्या उठविलें द्विजांसी । कृष्णकीर्ति ऐसी पावन ॥ १४ ॥ ऐकतां कृष्णरामकीर्ती । महापातकें बापुडीं किती । पायां लागती चारी मुक्ती । श्रद्धासंपत्ती कीर्ती गातां ॥ १५ ॥ श्रद्धेचिया अतिप्रीतीं । आवडीं गातां कृष्णकीर्ती । सहजें सायुज्यता पावती । देहस्थिती असतांही ॥ १६ ॥ हरिकीर्तिकीर्तन ज्याच्या ठायीं । तोही वर्ततां दिसे देहीं । परी देहीं ना तो हरीच्या ठायीं । हरि त्याचे ठायीं अवघाचि ॥ १७ ॥ तोही अवघा हरीभीतरीं । हरि त्या सबाह्य अभ्यंतरीं । परीक्षिति ऐशियापरी । कीर्तिमंत संसारी नांदती ॥ १८ ॥ यालागीं हरिकीर्तनापरतें । सुगम साधन नाहीं एथें । जे विनटले हरिकीर्तनातें । ते देह बंधनातें नाकळती ॥ १९ ॥ कृष्णकीर्तनीं उजळली स्थिति । ती मैळेना कदा कल्पांतीं । जरी ते देहकर्में करिती । तरी जाहली स्थिति मैळेना ॥ ३२० ॥ आकाश पर्जन्यें नव्हे वोलें । कां रविबिंब थिल्लरजळें । असोनियां तेणें मेळें । कदाकाळें तिंबेना ॥ २१ ॥ तेवीं हरिकीर्तनकल्लोळें । जयांची निष्कामदशा उजळे । ते वर्ततां देहकर्ममेळें । देहविटाळें अलिप्त ॥ २२ ॥ निजभक्तांचें शरीरकर्म । स्वयें चालवी पुरुषोत्तम । यालागीं भक्तांसी कर्मभ्रम । अधमोत्तम बाधीना ॥ २३ ॥ भक्तांअभक्तांची कर्मगती । भगवंत चालवी निश्चितीं । तेथ भक्तांची कां अलिप्तस्थिती । अभक्त कां होती अतिबद्ध ॥ २४ ॥ करितां कृष्ण कीर्तिकीर्तन । भक्तांचा निरसे देहाभिमान । यालागीं ते अलिप्त जाण । अभक्तां बंधन अहंभावें ॥ २५ ॥ हे दशा मागितल्या पावती । ऐसें न घडे गा परीक्षिती ।

होतो. पूतनेच्या दुग्धप्राशनाचा वृत्तान्त पठण केला असतां, श्रद्धावानाच्या मद्यपानादि सर्व भयंकर दोषांची निवृत्ति होते. ३१० रावण, राक्षसकुलांत जन्मलेला परंतु तो जातीनें शुद्ध ब्राह्मण होता. तो ब्रह्मदेवाचा नातु. ११ तो नित्य वेदपठन करीत असे. त्याच्या सगळ्या कुलाचा श्रीरामानें स्वतः नाश केला. तें रामायणांतील चरित्र पठण केलें असतां ब्रह्महत्येचें पापहि जळून जातें. १२ धर्माच्या साह्यकर्त्या श्रीकृष्णानें पांडवांचें रक्षण केलें. त्या भारताच्या श्रवणानें मृतब्राह्मण जिवंत झाले. १३ जनमेजयाला अठरा ब्रह्महत्यांचा दोष लागला होता. तो भारताची अठरा पर्वें सांगून घालविला व मृत ब्राह्मणांना उठविलें. अशी श्रीकृष्णाची कीर्ति पावन आहे. १४ श्रीराम-कृष्णाची कीर्ति ऐकली असतां तिच्यापुढें बापडीं पातकें ती कितीशीं! श्रद्धेनें त्यांची कीर्ति गाइली असतां चारी मुक्ति पायां पडतात. १५ अत्यंत श्रद्धेनें श्रीकृष्णाची कीर्ति गाइली असतां याच देहांत सायुज्य प्राप्त होतें. १६ जो हरीच्या कीर्तीचें कीर्तन करितो तो जरी देहांत वागत असला तरी तो देहांत नसतो, तर हरीच्या ठिकाणीं असतो. १७ हरी त्याच्या ठिकाणीं परिपूर्ण असतो. तो पूर्णपणें हरीच्या आंत असतो आणि हरि त्याला सबाह्य व्यापितो. हे परीक्षिति राजा! ते कीर्तिमान् याप्रमाणें संसारांत नांदत असतात. १८ यास्तव हरिकीर्तनासारखें दुसरें सुलभ साधन येथें नाहीं. जे हरिकीर्तनांत रंगले, ते देहबंधनानें बांधले जात नाहींत. १९ कृष्णकीर्तनानें एकदा चित्ताला उजळा चढविला कीं, मग तें कल्पान्तींहि मलिन होत नाहीं. त्यांनीं देहानें जरी कर्में आचरिलीं तरी त्यांची वृत्ति मळत नाहीं. ३२० आकाश जसें पावसानें ओलें होत नाहीं, किंवा सूर्याचें प्रतिबिंब डबक्यांतील पाण्यांत राहूनहि त्यानें भिजत नाहीं, २१ त्याप्रमाणें हरिकीर्तनाच्या गजरानें वृत्तीला निष्कामतेचा उजळा एकदां दिला कीं, मग देहकर्मानुसार वागत असतांहि ती देहकर्मांच्या बंधनापासून अलिप्तच रहाते. २२ पुरुषोत्तम स्वतःच आपल्या भक्तांचें शरीरकर्म चालवीत असतो. त्यामुळें भक्ताला बरें-वाईट कर्मबंधन बाधत नाहीं. २३ भक्त व अभक्त या दोघांचीहि कर्मगति भगवंत जर चालवीत असतो, तर मग भक्त तेवढे अलिप्त रहातात व अभक्त त्या कर्मानें बद्ध कां होतात! २४ (असें जर म्हणशील तर, ऐक.) श्रीकृष्णकीर्तीचें कीर्तन केलें असतां भक्तांचा देहाभिमान नाहींसा होतो. त्यामुळें

आवडी गातां कृष्णकीर्ती। सहज स्थिती ठसावे ॥ २६ ॥ श्रीकृष्णकीर्तिकीर्तनें। बहुतांचें संसारधरणें। उठविलें स्वयें श्रीकृष्णें। चरित्रपठणें तुष्टोनी ॥ २७ ॥ कृष्णकीर्तिकीर्तनगोडी। अहंकाराची बांदवडी फोडी। जीवाचें जीवबंधन तोडी। निःसीम आवडी कीर्ति गातां ॥ २८ ॥ एवं कृष्णकीर्तिकीर्तनें। भक्तीं कृष्णपद स्वयें घेणें। जग उद्धरावयाकारणें। कीर्ति श्रीकृष्णें विस्तारिली ॥ २९ ॥ जन्मापासूनि अंतपर्यंत। कृष्णचरित्र अत्यद्भुत। तुज म्यां सांगितलें साद्यंत। परामृत निजसार ॥ ३३० ॥

इत्थं हरेर्भगवतो रुचिरावतारवीर्याणि बालचरितानि च शंतमानि।
अन्यत्र चेह च श्रुतानि गृणन्मनुष्यो भक्तिं परां परमहंसगतौ लभेत ॥ २८ ॥

॥ इति एकादशस्कंधः समाप्तः ॥

जन्मापासूनि ज्ञानघन। श्रीकृष्णचरित्र अतिपावन। ज्याचे संगतीं गोंवळे जाण। अज्ञान जन उद्धरिले ॥ ३१ ॥ ज्याचिया व्यभिचारासंगतीं। गोपी उद्धरल्या नेणों किती। कृष्णश्यामसुंदरमूर्ती। अभिलाषीं चित्तीं दृढ धरिला ॥ ३२ ॥ देखोनि सुंदर कृष्ण मूर्ती। गायी वेधल्या तटस्थ ठाती। पशु उद्धरले कृष्णसंगतीं। मा गोपी नुद्धरती कैसेनी ॥ ३३ ॥ गायीगोपिकांचें नवल कोण। वृंदावनींचे तृण पाषाण। कृष्णसंगें तरले जाण। ऐसा ज्ञानघन श्रीकृष्ण ॥ ३४ ॥ विषें भरोनियां निजस्तना। पूतना घेऊं आली प्राणा। तेही कृष्णसंगें जाणा। त्याच क्षणा उद्धरली ॥ ३५ ॥ कंसशिशुपाळादिकांसी। द्वेषेंचि तारी हृषीकेशी। चंदन लावितां अंगासी। अंगसंगें कुब्जेसी तारिलें ॥ ३६ ॥ उन्मत्त मदें अतिमूढ। मारूं आला कुवलयापीड। त्यासी मोक्षाचा सुरवाड। उद्धरिला सदृढ कृष्णाभिघातें ॥ ३७ ॥ अरिष्ट करूं आला श्रीकृष्णालागीं। तो अरिष्ट तारिला

ते कर्मांपासून अलिप्त रहातात व अभक्त अहंकारामुळें बद्ध होतात. २५ हे परीक्षिति राजा! ही स्थिति मागितली असतां प्राप्त होते, असें समजूं नकोस. आवडीनें कृष्णकीर्ति गाइली असतां ती स्थिति सहज ठसते. २६ आपल्या चरित्रपठणानें संतुष्ट होऊन श्रीकृष्णानें हरिकीर्तन करणाऱ्या पुष्कळांचें संसाराचें धरणें उठविलें आहे. २७ निःसीम प्रेमानें कीर्तन केलें असतां हरिकीर्तनाची गोडी अहंकाराचें कारागृह फोडिते व जीवाचें जीवबंधन तोडिते. २८ याप्रमाणें श्रीकृष्णकीर्तनानें भक्त स्वतः श्रीकृष्णाचें पद घेतात. जगाचा उद्धार करावयासाठीं श्रीकृष्णानें आपली कीर्ति पसरविली. २९ असें हें परामृत आत्मज्ञानाचें सार, अत्यंत अद्भुत श्रीकृष्णचरित्र जन्मापासून आतापर्यंत मीं तुला सविस्तर सांगितलें. ३३०.

इत्थं हरेः भगवतः अन्यत्र च इह च श्रुतानि शंतमानि रुचिरावतारवीर्याणि बालचरितानि गृणन् मनुष्यः परमहंसगतौ परां भक्तिं लभेत—याप्रमाणें भगवान् हरीचें या ग्रंथांत व इतर ग्रंथांत पठित असलेले व परम मंगल असें रमणीय अवतारांतील पराक्रम व बालचरित्रें यांचें पठन करणारा मनुष्य श्रीकृष्णाविषयींच्या परम भक्तीला प्राप्त होतो. २८.

ज्ञानस्वरूप श्रीकृष्णाचें चरित्र जन्मापासूनच अत्यंत पावन आहे. ज्याच्या संगतीनें अज्ञान गवळी उद्धरून गेले, ३१ ज्या श्रीकृष्णाची श्यामसुंदर मूर्ति पाहून गोपींच्या मनांत दृढ अभिलाष उद्भवला व ज्याच्या व्यभिचारानें कितीजणी उद्धरल्या त्यांची गणति नाहीं, ३२ त्या श्रीकृष्णाची सुंदर मूर्ति पाहून गायी जागच्याजागीं तटस्थ होऊन रहात. पशूंहि जर त्याच्या संगतीनें उद्धरून जातात तर मग गोपी कां उद्धरणार नाहींत! ३३ गायी-गोपिकांचें आश्चर्य कसलें! पण वृंदावनांतील गवत व दगडहि श्रीकृष्णाच्या संगतीनें तरून गेले. असा तो श्रीकृष्ण ज्ञानस्वरूप आहे. ३४ पूतना श्रीकृष्णाला पाजण्यासाठीं विष भरून आली असतां तिचा देखील श्रीकृष्णाच्या संगतीनें तत्काळ उद्धार झाला. ३५ कंसशिशुपालादिकांस श्रीकृष्णानें द्वेषानें तारिलें. कुब्जेनें अंगाला चंदन लाविलें असतां स्पर्शानें तिला तारिलें. ३६ अतिमूढ कुवलयापीड मदानें उन्मत्त होऊन मारावयास आला असतां श्रीकृष्णानें आपल्या आघातानें त्याला मोक्षाची सहज प्राप्ति करून दिली. ३७ अरिष्टनांवाचा राक्षस श्रीकृष्णाला मारावयास

धरूनि शिंगीं । अघासुरें गिळितां वेगीं । चिरोनि दों भागीं उद्धरी कृष्ण ॥३८॥ कृष्णलक्षें लावूनि टाळी । बक ध्यानस्थ यमुनाजळीं । तो कृष्णातें सवेग गिळी । करूनि दोन फाळी तारिला ॥३९॥ उडवूं आला तृणावर्त । त्यासी कृष्णें उडविला आवर्त । अंगसंगें कृष्णनाथ । कृपावंत वैरियां ॥ ३४० ॥ गोपाळ नेलें चोरचोरू । ठकून आला योमासुरू । त्याचाहि केला उद्धारू । मोक्षें उदारू श्रीकृष्ण ॥ ४१ ॥ केशिया कंसाचा घोडा । कृष्णें मारूनि तारिला पुढां । मल्ल मर्दूनि मालखंडा । मोक्षाचा उघडा सुकाळ केला ॥ ४२ ॥ कालिया नाथिला विखारू । वृक्षीं उपाडिला वत्सासुरू । भवाब्धीमाजीं श्रीकृष्ण तारूं । सवेग उद्धारू जडमूढां ॥ ४३ ॥ जिहीं खेळविला चक्रपाणी । ज्यांचे घरीं प्याला पाणी । ज्यांचें चोरूनि खादलें लोणीं । त्याही गौळणी उद्धरिल्या ॥ ४४ ॥ रुक्मिया तारिला विटंबोनी । बाण तारिला भुजा छेदोनी । कंस तारिला निर्दळूनी । मोक्षदानी श्रीकृष्ण ॥ ४५ ॥ जे जे मिनले सोयरिकें । जे कां पाहूं आले कौतुकें । ते ते तारियेले यदुनायकें । दर्शनसुखें निववूनी ॥ ४६ ॥ पांडव तारिले पक्षपातें । वैरी तारिले शस्त्रघातें । यापरी श्रीकृष्ण नाथें । उद्धरिलीं बहुतें निजसंगें ॥ ४७ ॥ वैरी तारिले द्वेषवैभवें । भक्त पावले भजनभावें । गोपी तारिल्या संगानुभवें । ज्या जीवें भावें अनुसरल्या ॥ ४८ ॥ गायी तारिल्या संरक्षणेंसीं । मयूर तारिले मोरपिशीं । वृक्ष तारिले तुरंबोनी केसीं । तारक हृषीकेशी पूर्णत्वें ॥ ४९ ॥ पूर्ण ब्रह्म कृष्णावतार । ज्ञानप्राधान्य लीला विचित्र । त्यांत परम पावन बाळचरित्र । वंद्य सर्वत्र सज्ञानां ॥ ३५० ॥ घेऊनि षड्गुणैश्वर्यसंपत्ती । अवतरली श्रीकृष्णमूर्ती । यश श्री औदार्य ज्ञान शांती । वैराग्यस्थिति अभंग ॥ ५१ ॥ इतर अवतारीं अवतरण । तेथें गुप्त केले साही गुण । कृष्णावतार ब्रह्म पूर्ण । पूर्ण षड्गुण प्रकाशिले ॥ ५२ ॥ यालागीं कृष्णावतार जाण । अनवच्छिन्न साही गुण ।

आला असतां त्याचीं शिंगें धरून त्याला तारिलें. अघासुरानें वेगानें गिळलें असतां श्रीकृष्णानें त्याला उभा फाडून त्याचीं दोन शकलें केलीं व त्याचा उद्धार केला. ३८ कृष्णाकडे लक्ष लावून यमुनेमध्यें ध्यानस्थ बसलेल्या बकानें कृष्णाला गिळिलें असतां त्याचे दोन भाग करून त्याला तारिलें. ३९ तृणावर्तराक्षस श्रीकृष्णाला उडवावयास आला असतां त्यानें त्यालाच उडविलें आणि त्या कृपाळु श्रीकृष्णनाथानें त्या वैऱ्यालाहि आपल्या अंगसंगानें तारिलें. ३४० गोपाळांना चोरांनीं चोरून नेलें. व्योमासुर ठकविण्यास आला असतां त्याचाहि उद्धार केला. असा श्रीकृष्ण उदार मोक्षदाता आहे. ३४१ कंसाच्या केशि नांवाच्या घोड्याला मारून त्याचा अगोदर उद्धार केला. मालखंड मल्लाला मारून मोक्षाचा सुकाळ केला. ४२ विषारी सर्प जो कालिया त्याचा नाश केला. वत्सासुराला वृक्षानें ठेचलें. असा श्रीकृष्ण भवसागरांतील नौका आहे. म्हणून जड-जीवांना तो तत्काळ तारितो. ४३ ज्यांनीं बाळकृष्णाला खेळविलें, ज्यांच्या घरीं तो पाणी प्याला, ज्यांचें लोणीं चोरून खाल्लें त्या गवळणींचाहि त्यानें उद्धार केला. ४४ रुक्मिणीचा भाऊ जो रुक्मी त्याची विटंबना करून त्याला तारिलें. बाणासुराच्या भुजा तोडून त्याला तारिलें कंसाचा नाश करून त्याला तारिलें. असा श्रीकृष्ण मोक्षदाता आहे. ४५ ज्यांनीं श्रीकृष्णाशीं आप्तसंबंध जोडिला किंवा जे त्याला कौतुकानें पहावयास आले, त्या सर्वांना यदुनायकानें दर्शनसुखानें तृप्त करून तारिलें. ४६ पांडवांचा पक्ष घेऊन त्यांना तारिलें. वैऱ्यांना शस्त्राच्या आघातानें तारिलें. याप्रमाणें श्रीकृष्णनाथानें आपल्या संगतीनें अनेकांना तारिलें. ४७ अतिशय द्वेषानें शत्रु तारिले. भक्तिभावानें भक्त तारिलें. जीवाभावानें त्यांजवर लोलुप झालेल्या गोपी आपल्या सहवासानें तारिल्या. ४८ गायींचें संरक्षण करून त्यांना तारिलें. आपण स्वतः मोरांचीं पिसें धारण करून मयूरांना तारिलें. वृक्षांना त्यांचीं पुष्पें केसांत गुंफून तारिलें. असा श्रीकृष्ण पूर्णपणें तारणारा आहे. ४९ कृष्ण पूर्णावतार आहे. त्याचें लीलाचरित्र ज्ञानप्रधान आहे. त्यांतहि त्याचें बालपणांतील चरित्र परमपावन आहे. तें सगळ्या ज्ञात्यांना वंद्य आहे. ३५० त्याच्यापाशीं यश, श्री, औदार्य, ज्ञान, शांति व वैराग्य षड्गुणैश्वर्यसंपत्ति आहे. ती घेऊन श्रीकृष्णाची मूर्ति अवतरली होती. ती अभंग होती. ५१ इतर अवतारांत त्यानें हे सहाहि गुण गुप्त ठेविले होते. कृष्णावतार पूर्ण परब्रह्म असल्यामुळें त्यांत हे सहाहि गुण प्रकट झाले. ५२ यास्तव कृष्णावतार पूर्ण

त्याचेनि अंगसंगें उद्धरण । सर्वांसी जाण सर्वदा ॥ ५३ ॥ उद्धरले कृष्णसंगतीं । अथवा कृष्णाचिया अतिप्रीतीं । तरले देखतां कृष्णमूर्ती । हें नवल निश्चितीं नव्हे एथें ॥ ५४ ॥ हेंचि पैं गा कृष्णकीर्ती । अत्यावडीं गातां गीतीं । उद्धरले नेणों किती । अद्यापि उद्धरती श्रद्धाळू ॥ ५५ ॥ आवडीं गातां कृष्णकीर्ती । कीर्तिमंतां लाभे परम गती । जीतें परा ऐसें म्हणती । ते चौथी भक्ती घरीं रिघे । ॥ ५६ ॥ आर्त जिज्ञासु अर्थार्थी । त्यांची सहजें राहे स्थिती । अखंड प्रकटे चौथी भक्ती । श्रीकृष्णकीर्ती स्वयें गातां ॥ ५७ ॥ आवडीं गातां श्रीकृष्णकीर्ती । सहजें होय विषयीं विरक्ती । शमदमादि संपत्ती । पायां लागती सहजेंचि ॥ ५८ ॥ कृष्णकीर्तीची जपमाळी । जो अखंड जपे जिव्हामूळीं । श्रीकृष्ण त्याजवळीं । सर्व काळीं सर्वदा ॥ ५९ ॥ आदरें जपतां श्रीकृष्णकीर्ती । श्रीकृष्ण प्रकटे सर्व भूतीं । सहजें ठसावे चौथी भक्ती । परमात्मस्थितीसमवेत ॥ ३६० ॥ जे भक्तीमाजीं जाण । पूज्य पूजक होय श्रीकृष्ण । मग पूजाविधिविधान । देवोचि आपण स्वयें होये ॥ ६१ ॥ अथ गंध धूप दीप जाण । अवघेंचि होय श्रीकृष्ण । हें चौथे भक्तीचें लक्षण । आपणां आपण स्वयें भजे ॥ ६२ ॥ चौथे भक्तीचें विंदान । भोग्य भोक्ता स्वयें श्रीकृष्ण । कृष्णेंसीं वेगळेपण । भक्तां अर्ध क्षण असेना ॥ ६३ ॥ ते काळीं भक्तांसी जाण । देह गेह होय श्रीकृष्ण । जात गोत श्रीकृष्णचि आपण । संसारही पूर्ण कृष्ण होये ॥ ६४ ॥ ऐशी लाहोनि पराभक्ती । परमहंसाची कृष्ण गती । ते कृष्णरूप स्वयें होती । श्रीकृष्णकीर्ती वर्णितां ॥ ६५ ॥ जे स्वरूपीं नाहीं च्युती । ते कृष्णस्वरूप निश्चितीं । भक्त तद्रूप स्वयें होतीं । कृष्णकीर्ती वर्णितां ॥ ६६ ॥ कृष्णकीर्तीचें एक अक्षर । चहूं वेदांचें निजजिव्हार । सकळ शास्त्रांचें परम सार । कृष्णचरित्र कुरुराया ॥ ६७ ॥ जें वेदांचें जन्मस्थान । जें षट्शास्त्रां समाधान । षड्दर्शनां बुजावण । तो आठवा श्रीकृष्ण पूर्णावतार ॥ ६८ ॥ अनंत अवतार झाले जाण । परी कृष्णावतार ज्ञानघन । त्याचें चरित्र अतिपावन । भवबंधनच्छेदक ॥ ६९ ॥ त्या कृष्णाची कृष्ण-

---

आहे. त्यांत हे सहाहि गुण अखंड आहेत. त्याच्या संगतीनें सर्वांचा उद्धार झाला. ५३ श्रीकृष्णाच्या संगतीनें उद्धार झाला व अति प्रीतीनें कृष्ण मूर्तीला पाहून कित्येक तरले, तर त्यांत आश्चर्य नाहीं. ५४ परंतु श्रीकृष्णकीर्ति आवडीनें गात असतां किती उद्धरून गेले त्यांची गणति नाहीं व अद्यापि कित्येक श्रद्धावान उद्धरून् जात आहेत ! श्रीकृष्णकीर्ति आवडीनें गाइली असतां त्या कीर्तनकाराला परम गति प्राप्त होते. जिला 'परा' म्हणतात ती चवथी भक्ति त्याच्या घरीं चालून येते. ५६ श्रीकृष्णकीर्ति स्वतः गाइली असतां आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी या अवस्था सहजच जातात व चवथी भक्ति हृदयांत प्रकट होते. ५७ आवडीनें श्रीकृष्णकीर्तीचें गायन केलें असतां विषयांची सहज विरक्ति येते आणि शमदमादि संपत्ति अनायासें पायीं लागते. ५८ ज्यांची जीभ कृष्णकीर्तीचा अखंड जप करिते, त्यांच्याजवळ श्रीकृष्ण निरंतर रहातो. ५९ कृष्णकीर्तीचा आदरानें जप केला असतां सर्व प्राण्यांमध्यें श्रीकृष्ण प्रकट होतो व परमात्मस्थितीसह चौथी भक्ति त्याच्या मनांत सहज ठसते. ३६० त्या भक्तीमध्यें पूज्य व पूजक दोन्ही श्रीकृष्णच होतो, आणि पूजेचें विधिविधान देव आपण स्वतःच होतो. ६१ गंध, धूप, दीप, हें सर्व श्रीकृष्णच होतो. आपण स्वतः आपली भक्ति करणें हें चवथ्या भक्तीचें लक्षण आहे. ६२ भोग्य व भोक्ता हीं दोन्हीं स्वतः श्रीकृष्णच असल्यामुळें भक्त व श्रीकृष्ण क्षणभरहि एकमेकांना विसंबत नाहींत. ६३ हेंच चवथ्या भक्तीचें स्वरूप आहे. त्या वेळीं श्रीकृष्णच भक्ताचा देह, गृह, जात, गोत व सगळा संसारहि होतो. ६४ श्रीकृष्णकीर्तीचें वर्णन केलें असतां अशी परा भक्ति प्राप्त होते व भक्त परमहंसांची गति जो श्रीकृष्ण तद्रूप होतात. ६५ ज्या स्वरूपापासून च्युत होण्याची कधीं भीति नाहीं, त्या श्रीकृष्णस्वरूपाला भक्त श्रीकृष्णकीर्तीच्या योगानें प्राप्त होतात. ६६ श्रीकृष्णकीर्तीचें एक अक्षर हेंच वेदाचें रहस्य आहे. हे परीक्षिति राजा ! श्रीकृष्णचरित्र सगळ्या शास्त्रांचें परमसार आहे. ६७ जें वेदांचें जन्मस्थान, सहा शास्त्रांचें समाधान, सहा दर्शनांचें ज्ञान तो हा आठवा श्रीकृष्णाचा पूर्णावतार आहे. ६८ अनंत अवतार झाले; पण त्या सर्वांत श्रीकृष्णावतार ज्ञानपूर्ण झाला. त्याचें चरित्र अतिशय पावन व भवबंधाचा छेद करणारें आहे. ६९ हे राजा, त्या कृष्णाच्या

कीर्ती । आदरें आठवितां चित्तीं । भवबंधनाची समाप्ती । जाण निश्चितीं नृपनाथा ॥ ३७० ॥ वैभव श्रीकृष्णकीर्तीसीं । वैराग्य श्रीकृष्णकीर्तीपासीं । श्रीकृष्णकीर्ती वसे ज्यांचे मानसीं । ते कळिकाळासी नागवती ॥ ७१ ॥ आळसें स्मरतां कृष्णमूर्ती । अखिल पातकें भस्म होती । जे कृष्णकीर्ति सदा गाती । त्यासी चारी मुक्ती आंदण ॥ ७२ ॥ श्रीकृष्णकीर्तीचें एकेक अक्षर । निर्दळी महापातकसंभार । मोक्ष देऊनि अतिउदार । जगदुद्धारकारक ॥ ७३ ॥ बहु अवतारीं अवतरे देवो । परी ये अवतारींचा नवलावो । ज्ञानप्राधान्य लीला पहा हो । अगम्य अभिप्रावो ब्रह्मादि देवां ॥७४॥ जन्मापासून जो जो देहाडा तो तो नीच नवा पवाडा । ब्रह्मसुखाचा उघडा । केला रोकडा सुकाळ ॥ ७५ ॥ अवतारांमाजीं श्रीकृष्ण । निजनिष्टंक ब्रह्म पूर्ण । त्याचें चरित्र ज्ञानघन । पठणें पावन जन होती ॥ ७६ ॥ ऐसी पावन कृष्ण-कीर्ती । पढतां वाचक उद्धरती । श्रद्धेनें जे श्रवण करिती । तेही तरतीं भवसिंधू ॥ ७७ ॥ कलियुगीं जन मंदमती । त्यांसी तरावया सुगमस्थिती । परम पावन कृष्णकीर्ती । कृपेनें निश्चितीं विस्तारली ॥ ७८ ॥ ऐसी पावन भगवत्कीर्ती । विस्तारली श्रीभागवतीं । त्यांत दशमस्कंधाप्रती । श्रीकृष्णकीर्ती अतिगोड ॥ ७९ ॥ उपजल्या दिवसापासूनी । चढोवढी प्रतिदिनीं । कीर्ति विस्तारी चक्रपाणी । दीनजनीं तरावया ॥ ३८० ॥ धरूनि नटनाट्यवेष । अवतरला हृषीकेश । तेथें नानाचरित्रविलास । दिवसेंदिवस विस्तारी ॥ ८१ ॥ त्याहीमाजीं बाळचरित्र । मधुर सुंदर अतिपवित्र । मालखंडां जें केलें क्षेत्र । परमपवित्र पावनत्वें ॥ ८२ ॥ जरासंध पराभवून । काळयवनातें निर्दाळून । तें अतिविचित्र विंदान । लाघवी श्रीकृष्ण स्वयें दावी ॥ ८३ ॥ रुक्मिया रणीं विटंबून । शिशुपाळादि वीर गांजून । कृष्ण करी भीमकीहरण । ते परम पावन हरिलीला ॥ ८४ ॥ पट्टमहिषींचें वरण । भौमा-

---

कीर्तीचें आदरानें स्मरण केलें असतां भवबंधाचा नाश होतो, हें निश्चित जाण. ३७० श्रीकृष्णकीर्तीपाशीं पूर्ण वैभव आणि पूर्ण वैराग्य रहातें. ज्यांच्या मनांत श्रीकृष्णाची कीर्ति असते, ते कळिकाळासहि नागवितात. ७१ आळसानें जरी कृष्णमूर्तीचें स्मरण केलें तरी सगळीं पातकें जळून भस्म होतात. ७१ जे कृष्णकीर्ति निरंतर गात असतात, त्यांच्या चारी मुक्ति आंदण दिलेल्या दासी होतात. ७२ श्रीकृष्णकीर्तीचें एकेक अक्षर महापातकांच्या राशी जाळून टाकितें व जगाचा उद्धार करणारा असा अतिशय उदार मोक्ष देतें. ७३ देवानें आतांपर्यंत अनेक अवतार घेतले; पण या अवताराचें काय आश्चर्य आहे पहा. त्यानें ज्या ज्ञानप्रधान लीला केल्या त्या ब्रह्मदेवादिकांसहि अगम्य झाल्या. ७४ जन्मापासून त्यानें नित्य नवीं अद्भुत कृत्यें केलीं. नित्य नवा चमत्कार केला. ब्रह्मसुखाचा तर सुकाळच केला. ७५ अवतारांमध्यें श्रीकृष्ण परिपूर्ण परब्रह्म होता. त्याच्या ज्ञानस्वरूप चरित्राच्या पठणानें लोक पावन होतात. ७६ अशी पवित्र कृष्णकीर्ति वाचली असतां वाचकांचा उद्धार होतो व जे श्रद्धेनें श्रवण करितात तेहि भवसिंधु तरून जातात. ७७ कलियुगांत लोक मंदबुद्धीचे होतील. त्यांना तारण्यासाठीं हा सोपा मार्ग करून ठेविला आहे. ही परम पवित्र कृष्णकीर्ति मोठ्या कृपेनें पसरली आहे. ७८ ही परम पावन भगवत्कीर्ति भागवतांत विस्तारानें वर्णिली आहे. त्यांतील दहाव्या स्कंधांत श्रीकृष्णकीर्ति अतिशय गोड आहे. ७९ श्रीकृष्ण उपजल्या दिवसापासून प्रत्येक दिवशीं त्याचा प्रताप अधिक वाढत होता. श्रीकृष्णानें दीन जनांना तारण्यासाठीं ही कीर्ति पसरली आहे. ३८० श्रीकृष्णानें नाट्यकुशल नटाचा वेष घेऊन अवतार घेतला. त्यामुळें त्यानें नानाप्रकारचें चरित्र दिवसेंदिवस करून दाखविलें. ८१ त्यांत त्याचें बालपणचें चरित्र मधुर, सुंदर व अतिशय शुद्ध आहे. त्यानें जें ओसाड मालखंड होतें, त्याचें परम पवित्र क्षेत्र केलें. ८२ श्रीकृष्णानें जरासंधाचा पराभव केला. कालयवनाला मारिलें व त्या लाघवी श्रीकृष्णानें विलक्षण कौतुक दाखविलें. ८३ कृष्णानें रुक्मीची युद्धांत विटंबना केली. त्यानें शिशु-पाळादि वीरांना गांजिलें आणि रुक्मिणीचें हरण केलें. ही हरीची लीळा परम पावन आहे. ८४ रुक्मिणी, सत्यभामा

सुरांचें निर्दळण । पारिजातांचें हरण । पाणिग्रहण सोळासहस्रीं ॥ ८५ ॥ समुद्रीं वसवूनि द्वारावती । निद्रा न मोडितां निश्चितीं । मथुरा आणिली रातोरातीं । अभिनव कीर्ती कृष्णाची ॥ ८६ ॥ वत्सें वत्सप होऊनि आपण । आपुलें दावी पूर्णपण । ब्रह्मादिकां न कळे जाण । अवतारी कृष्ण पूर्णांशें ॥ ८७ ॥ खाऊनि भाजीचें पान । तृप्त केले ऋषिजन । ऐसीं चरित्रें ज्ञानप्रधान । परम पावन आचरिला ॥ ८८ ॥ ऐसी कृष्णलीला परमाद्भुत । पाठकां करी परम पुनीत । ते दशमामाजीं समस्त । कथा साद्यंत सांगितली ॥ ८९ ॥ एकादशाची नवलस्थिती । मूळापासूनि परम प्राप्ती । ज्ञान वैराग्य भक्ति मुक्ती । स्वमुखें श्रीपति संवादला ॥ ३९० ॥ प्रथमाध्यायीं वैराग्य पूर्ण । मुख्य अधिकाराचें कारण । नारदवसुदेवसंवाद जाण । भूमिशोधन साधकां ॥ ९१ ॥ तेथ निमिजायंतसंवादन । निर्भयाचें कोण स्थान । उत्तम भागवत कोण । मायातरण कर्मब्रह्म ॥ ९२ ॥ इत्यादि विदेहाचे नव प्रश्न । नवांचीं नव उत्तरें पूर्ण । तेचि नव नांगर जाण । क्षेत्रकर्षण अतिशुद्ध ॥ ९३ ॥ ते पांचां अध्यायांच्या अंतीं । देवीं प्रार्थिला श्रीपती । कृष्ण कुलक्षयाच्या प्रांतीं । निजधामाप्रतीं निघेल ॥ ९४ ॥ हे उद्धवें जाणोनि आपण । निर्वेद केला जो संपूर्ण । तेचि कल्पनाकाशाचें निर्दळण । पालव्या छेदन विकल्पांच्या ॥ ९५ ॥ कामलोभांचें गुप्त खुट । आडवूं लागले उद्भट । ते समूळ केले सपाट । अतितिखट अनुतापें ॥ ९६ ॥ क्रोधाचिया अतिजाडी । समूळ उपडिल्या महापेडी । शांति निवडक चोखडी । समूळ उपाडी मूळेंसीं ॥ ९७ ॥ उद्धवचातकआर्तिहरण । बोलिला श्रीकृष्ण कृपाघन । क्षेत्र ओलावलें सबाह्य पूर्ण । लागली संपूर्ण निजबोधवाफ ॥ ९८ ॥ तेथें पूर्ण ब्रह्म निजबीज । चाडें तंतु सर्व परित्यज्य । श्रवणनळें अधोक्षज । पेरिलेंचि सहज स्वयें पेरी ॥ ९९ ॥ यदुअवधूतसंवादस्थिति । चोविसां गुरूंच्या उपपत्ती । आगड खणविला

इत्यादि अष्ट नायिकांसह पट्टराण्यांशीं विवाह, भौमासुराचा वध, पारिजातकाचें हरण व सोळा सहस्र स्त्रियांचें पाणिग्रहण केलें. ८५ त्यानें समुद्रांत द्वारका वसविली. लोकांची झोंप न मोडतां रातोरात मथुरा आणिली. अशी श्रीकृष्णाची कीर्ति अद्भुत आहे. ८६ तो गायींची गुराखी झाला व त्यानें आपलें पूर्णपणें दाखविलें. श्रीकृष्ण पूर्णांशानें अवतार आहे, हें ब्रह्मादिकांसहि कळलें नाहीं. ८७ त्यानें भाजीचें पान खाऊन दुर्वासादि ऋषींना तृप्त केलें. असें ज्ञानप्रधान परम पावन चरित्र त्यानें आचरिलें. ८८ अशी श्रीकृष्णाची अद्भुत लीला दहाव्या स्कंधांत सविस्तर वर्णिली आहे. ८९ ती वाचणारास परम पावन करितें. एकादशस्कंधाचा विषय तर अपूर्व आहे. त्यांत आरंभापासून परमपदाची प्राप्ति आहे. ज्ञान, वैराग्य, भक्ति व मुक्ति यांचें निरूपण श्रीहरीनें स्वमुखानें केलें आहे. ३९० पहिल्या अध्यायांत नारद व वसुदेव यांचा संवाद आहे. त्यांत मुख्य अधिकाराचें कारण असलेलें वैराग्य पूर्णपणें भरलेलें आहे. तीच साधकाची भूमिशुद्धि होय. ९१ त्यांत निमि-जायंतसंवाद, निर्भय स्थान कोणतें, उत्तम भागवताचें लक्षण, मायातरण, कर्म ब्रह्म, ९२ इत्यादि जनकराजाचे नऊ प्रश्न आहेत व त्या नऊ प्रश्नांचीं नऊ संपूर्ण उत्तरें आहेत. तेच नऊ नांगर होत. त्यांनीं जमीन नांगरून अतिशुद्ध शेत तयार केलें. ९३ नंतर पांच अध्यायांच्या शेवटीं देवांनीं श्रीकृष्णाची स्वधामाला येण्याविषयीं प्रार्थना केली, तो कुलक्षयाच्या शेवटीं निजधामाला जाण्यास निघेल, ९४ हें उद्धवाला कळतांच त्यानें खेद प्रदर्शित केला. तोच कल्पनारूप आकाशाचा नाश होय. त्यांत त्यानें विकल्पाचीं जाळीं तोडून टाकिलीं. ९५ काम, लोभ यांचे खुंट मध्यें राहिले होते ते अडथळा करूं लागले. तेव्हां अत्यंत तीव्र पश्चात्तापानें तें सर्व समुळ खणून शेत सपाट करून टाकिलें. ९६ क्रोधाचीं दाट बेटें समूळ उपटलीं. सुंदर शांति प्रकट केली. अशांतीचा समूळ नाश केला ९७ व उद्धवरूपी चातकाची तृषा तृप्त करणारा दयाघन श्रीकृष्ण बोलला. त्यामुळें शेत सबाह्य ओलें झालें. त्यांत आत्मबोधाची लागवड केली. ९८ तेथें पूर्णब्रह्म हेंच आत्मबीज होतें. त्यांतील सगळे चहाड तंतु टाकून श्रवणरूपी कळकाच्या नळानें श्रीकृष्णानें स्वतः तें बीज पेरिलें. ९९ यदु-अवधूतसंवादानें चोवीस गुरूंचा प्रकार सांगितला. तोच शेताच्या सभोंवार

क्षेत्राप्रती । वोढाळ पुढती रिघों न शके ॥ ४०० ॥ चीकभरित जाहल्या पिकातें । भोरड्या वोरबडिती तेथें । ते दशमाध्यायीं श्रीअनंतें । उडविलीं मतें भजनगोफणीं ॥ १ ॥ अकरावे अध्यायीं जाणा । हुरडा ओंब्या आणि घोळाणा । तिळगुळेंसीं चाखविलें सुजाणा । मुक्तलक्षणांचेनि हातें ॥ २ ॥ ते श्रियेचे भोक्ते एथ । सत्संगति भगवद्भक्त । तो बारावा अध्याय साद्यंत । कृपायुक्त सांगितला ॥ ३ ॥ विषयांची विषयावस्था । बाधक नोहे साधकांच्या चित्ता । तेचि त्रयोदशीं कथा । जाण निश्चितीं सांगितली ॥ ४ ॥ एवं तेराव्या अध्यायाप्रती । जाहली पिकाची पूर्ण निष्पत्ती । तेचि हंसगीत-उपपत्ती । समाधि श्रीपति सांगोनि गेला ॥ ५ ॥ समाधीं सांठवलें जें पीक । तें कैसेनि पावती साधक । तदर्थी भजनपूर्वक । चौदावा देख निरूपिला ॥ ६ ॥ पीक चढतचढतां हातीं । माझारीं सिद्धि झडपोनि नेती । ते सिद्धित्यागाची उपपत्ती । पंधराव्याप्रती दाविली ॥ ७ ॥ पीक न माय त्रिजगतीं । तरी त्याच्या सांठवणा किती । त्या षोडशाध्यायीं विभूती । उद्देशें श्रीपती दावूनि गेला ॥ ८ ॥ क्षेत्र अधिकारी एथें जाण । चारी आश्रम चारी वर्ण । सतरा अठरा निरूपण । बाढें संपूर्ण विभागिलें ॥ ९ ॥ एकुणिसाव्या अध्यायीं जाण । करूनि पिकाची संवगण ॥ जेणें कोंडेनि वाढले कण । तेही निवडूनि कण घ्यावे ॥ ४१० ॥ ऐसे निवडिले जे शुद्ध कण । ते प्राप्यप्राप्तीचें लक्षण । त्रिविधभाग-निरूपण । विसावा जाण निरूपला ॥ ११ ॥ भागा आले शुद्ध कण । ते राखावे आपले आपण । गुणदोषांचे चोरटे जाण । खळें फोडून निजकण नेती ॥ १२ ॥ सर्वांच्या भागास येताति कण । परी खावों न लाहती चोरट्याभेण । थोर थोर नागविले जाण । यालागीं संरक्षण दृढ किजे ॥ १३ ॥ गुणदोषांची नवलकथा । मिळणीं मिळोनि आप्तता । ठकूनि नेती सर्व स्वतां । दाणाही हाता नेदिती येवों ॥ १४ ॥ गुणदोष आतुर्बळी । सज्ञानातें तत्काळ छळी । गुणदोषांतें जो निर्दळी । तो महाबळी तिहीं लोकीं ॥ १५ ॥ हे शिकवण उद्धवें ऐकतां । तो म्हणे चोरांचा प्रतिपाळिता । तुझा वेदचि गा तत्त्वतां ।

खंदक खणविला. त्यामुळें ओढाळ गुरूं पुढें येऊं शकलें नाहीं. ४०० नंतर पीक जेव्हां चिकाला आलें, तेव्हां अनेक मतरूपी शाळू खाणाऱ्या भोरड्या त्यावर तुटून पडल्या. १ त्यांचा दहाव्या अध्यायांत श्रीकृष्णानें भजनरूपी गोफणीनें फडशा उडविला. (त्यांच्या मतांचें खंडण केलें.) २ अकराव्या अध्यायांत मुक्ताच्या लक्षणांच्या रूपानें ज्ञात्याकडून तिळगुळांसह शाळूचा हुरडा, गव्हाच्या ओंब्या व बाजरीचा निंबूर खावविला. ३ बाराव्या अध्यायांत मोठ्या कृपेनें त्यांचें माधुर्य सविस्तर वर्णिलें. त्याचे भोक्ते सत्संगति धरणारे भगवद्भक्त आहेत. तेराव्या अध्यायांत पीक पूर्णपणें तयार झालें. ४ तें हंसगीत व समाधि यांच्या निरूपणानें श्रीकृष्णानें सांगितलें. ५ चवदाव्या अध्यायांत समाधीनें सांठवून ठेवलेलें तें पीक साधकाच्या हातीं येण्यासाठीं भजनपूर्वक निरूपण केलें. ६ पंधराव्या अध्यायांत पीक हातीं येत असतां सिद्धि झडप घालून तें हिसकावून नेतात, म्हणून सिद्धींच्या त्यागाचा उपदेश केला. ७ सोळाव्या अध्यायांत तें विपुल पीक त्रिभुवनांतहि मावत नाहीं. त्याची सांठवण करण्याचीं स्थानें विभूतियोगानें श्रीकृष्णानें दाखवून दिलीं. ८ सतराव्या व अठराव्या अध्यायांत या शेताचे अधिकारी जे चार वर्ण व चार आश्रम त्यांचा विभाग करून दिला. ९ एकोणिसाव्या अध्यायांत शेताची कापणी केली व भुसामध्यें असलेले दाणेहि निवडून काढावे, हें सांगितलें. १० विसाव्या अध्यायांत असे निवडून काढिलेले जे भरीव दाणे ते पदरांत कसे पडतील याविषयीं त्रिविधभागनिरूपणानें प्राप्यप्राप्तिलक्षण सांगितलें. ११ एकविसाव्या अध्यायांत आपल्या वांटणीला आलेले दाणे आपण जपून ठेवावे, कारण गुण-दोषरूपी चोर खळें फोडून धान्य लुटून नेतात. १२ सगळ्यांच्या वांट्याला दाणे येतात; पण ते चोरांच्या भीतीनें त्यांना खातां येत नाहींत. मोठमोठ्या समर्थांनाहि या चोरानीं लुटलें आहे. यास्तव त्या धान्याचें काळजीपूर्वक रक्षण करावें. १३ हे गुण-दोषरूपी चोर महाठक असतात. ते आरंभीं साधकाशीं चांगला स्नेह जोडितात आणि अखेर फसवून सगळें लुबाडून नेतात. एक दाणाहि हातीं येऊं देत नाहींत. १४ असे हे गुण-दोष अति प्रबल आहेत. ते सज्ञानालाहि तत्काल नागवितात. या गुण-दोषांना जो जिंकतो, तोच त्रिभुवनांत खरा समर्थ होय. १५ उद्धवानें हा उपदेश ऐकतांच

गुणदोषप्रबळता त्याचेचि अंगें ॥ १६ ॥ मुख्य चोरांचा कुरुठा । तुझा वेद गा खोटा । त्यामाजीं गुणदोषांचा घरटा । नाना चेष्टा तो शिकवी ॥ १७ ॥ एवं प्रतिपाळोनि गुणदोषांसी । वेद नागवी समस्तांसी । एवं उद्धवें वेदांच्या शिसीं । कुडेपणासी स्थापिलें ॥ १८ ॥ तो वेदानुवाद नव्हे कुडा। ऐसा प्रतिपदीं दिधला झाडा । निरूपणीं अतिचोखडा। अध्याय रोकडा एकविसावा ॥ १९ ॥ चोर कोणे मार्गीं येती । पिकलें पीक ज्या वाटा नेती । तो मार्ग बुजावया निश्चितीं । तत्त्वसंख्याउपपत्ती बाविसावा ॥ ४२० ॥ मुख्यत्वें ज्ञानाचें संरक्षण । दृढ शांतीचें कारण । तें भिक्षुगीतनिरूपण । स्वयें श्रीकृष्ण सांगोनि गेला ॥ २१ ॥ मुख्य चोरांचें चोरटेपण । मनापाशीं असे जाण । तें मनोजयाचें लक्षण । भिक्षुगीतनिरूपण तेविसावा ॥ २२ ॥ चोर जन्मती जिचे पोटीं । ते मुख्यत्वें प्रकृति खोटी । पिकल्या पिका करूनि लुटी । लपती शेवटीं तीमाजीं ॥ २३ ॥ आदीं निर्गुण अंतीं निर्गुण । मध्यें मिथ्या प्रकृतीसीं त्रिगुण । हें मुख्य पिकाचें संरक्षण । केलें निरूपण चोविसावा ॥ २४ ॥ मोकळें पीक असतां शेतीं । पशु पक्षी चोर रिघों न शकती । ते सहज संरक्षणउपपत्ती । निर्गुणोक्ती पंचविसावा ॥ २५ ॥ स्त्रीकामाची धाडी जाण । सकळ पिकासी नागवण । पुरूरवा नागवला आपण । इतरांचा कोण पडिपाड ॥ २६ ॥ कामासक्ति करितां जाण । प्रमदाबंदीं पडिले पूर्ण । त्यांसी अनुताप करी सोडवण । हें केलें निरूपण सव्विसावा ॥ २७ ॥ निकोप पीक लागल्या हातीं । त्याची करावया निष्पत्ती । क्रियायोगाची निजस्थिती । सत्ताविसाव्याप्रती प्रकाशिली ॥ २८ ॥ एवं पीक भोगिलें सकळ । त्याचा परिपाक पक्वान्न सबळ । अठ्ठाविसावा अमृतफळ । अतिरसाळ निजगोड्या ॥ २९ ॥ मृदु मधुर अतिअरुवार । तेणें वासें निवे जेवणार । त्याचा सेवितां ग्रासमात्र । सबाह्यअभ्यंतर नित्यतृप्ती ॥ ४३० ॥ आकांक्षेसी

तो म्हणाला कीं, चोरांना उत्तेजन देणारा तुझा वेदच आहे. त्याच्याच मुळें गुण-दोष प्रबल झाले आहेत. १६ या चोरांचा मुख्य आश्रय असलेला तुझा वेदच खोटा आहे. बरें, त्यांत गुण-दोषांचा अड्डा आहे. तोच त्यांना अनेक प्रकारच्या चेष्टा शिकवितो. १७ असा हा वेद गुण-दोषांना आश्रय देऊन सगळ्यांना नागवितो. याप्रमाणें उद्धवानें वेदांच्या माथीं खोटेपणाचा आरोप ठेविला. १८ तेव्हां श्रीकृष्णानें वेदानुवाद खोटा नाहीं, याचें सुंदर प्रतिपादन केलें. असा हा एकविसावा अध्याय सरस आहे. १९ बाविसाव्या अध्यायांत चोर कोणत्या मार्गानें येतात व पिकलेलें पीक कोणत्या मार्गानें नेतात हें दाखविलें आणि त्यांच्या त्या वाटा बुजवून टाकण्याचा निश्चित उपाय, असा तत्त्वांच्या संख्येचा विचार, पूर्णपणें सांगितला. ४२० तेविसाव्या अध्यायांत मुख्यत्वें ज्ञानाचें संरक्षण व शांतीचें कारण असें जें भिक्षुगीत त्याचें श्रीकृष्णानें निरूपण केलें. २१ चोराचा मुख्य चोरटेपणा मनापाशीं असतो. त्या मनोजयाचें लक्षणहि या भिक्षुगीतांतच सांगितलें. २२ चोविसाव्या अध्यायांत जिच्या पोटीं हे चोर जन्मतात ती प्रकृति म्ह० मायाच मुळीं खोटी आहे. हे चोर पिकलेलें पीक लुटून नेतात आणि शेवटीं तिच्यामागें जाऊन लपतात. २३ आदि निर्गुण, अंतीं निर्गुण, मध्येंच तेवढें प्रकृतीचे सत्त्व-रजादि तीन गुण प्रकट होतात. यास्तव त्यांच्यापासून मुख्य पिकाचें संरक्षण करावें. २४ पंचविसाव्या अध्यायांत शेतांत पीक मोकळें असलें तरी तेथें पशु,पक्षी, चोर इत्यादि कोणीहि जाऊं शकत नाहींत, असा त्यांच्या संरक्षणाचा उपाय निर्गुणोक्तीनें सांगितला आहे. २५ सव्विसाव्या अध्यायांत, एकदा कामासक्तीची टोळधाड आली म्हणजे सगळ्या पिकाची नासाडी होते. स्वतः पुरूरवा राजा पूर्णपणें नागवला; मग इतरांची काय कथा! २६ कामासक्तीनें अनेक लोक स्त्रियांच्या पाशांत अडकून पडतात. त्यांना त्यांतून पश्चात्तापच सोडवूं शकतो; याचें निरूपण केलें आहे. २७ सत्ताविसाव्या अध्यायांत निकोप पीक जरी हातीं लागलें तरी त्याची पाकनिष्पत्ति चांगली करितां यावी म्हणून कर्मयोगाचा प्रकार सांगितला. २८ अठ्ठाविसाव्या अध्यायांत अशाप्रकारें उत्तम पीक पदरांत पडल्यावर त्याचीं स्वादिष्ट मधुर पक्वान्नें करून दिलीं आहेत. हा अध्याय आपल्या माधुर्यानें रसाळ, अमृतफळ चाखविणारा, २९ मृदु, मधुर, खुसखुशीत, त्याच्या नुसत्या वासानेंच जेवणाराची तृप्ति करणारा आणि एका घांसानेंच पूर्णपणें अंतर्बाह्य नित्य तृप्ति देणारा आहे.

निवाली भूक । सुखावरी तृप्तिसुख । तो हा अठाविसावा देख । अलोलिक निजगोड्या ॥ ३१ ॥ अठ्ठाविसाव्याची निजगोडी । चाखावया अतिआवडी । ब्रह्मादिकां अवस्था गाढी । चवी चोखडी अनुपम ॥ ३२ ॥ हें जिव्हेवीण जेवण । रसनेवीण गोडपण । अदांतां दांत पाडूनि पूर्ण । आपुली आपण चवी चाखे ॥ ३३ ॥ श्रीकृष्णें परवडी ऐशी । ताटस्थ केलें उद्धवासीं । एका जनार्दन-चरणीं माशी । सुखें त्या रसासी स्वयें सेवी ॥ ३४ ॥ जेथ रिघमू नाहीं थोरथोरांसीं । तेथें सुखेंचि रिघे माशी । एवं धाकुटे जे होती सर्वांसीं । कृष्णरस त्यांसी सुसेव्य ॥ ३५ ॥ अगम्य योगें योगभांडार । गुह्यज्ञानें ज्ञान गंभीर । परम सुखाचें सुखसार । अतिगंभीर अठ्ठाविसावा ॥ ३६ ॥ या जेवणीं जे धाले नर । त्यांचे तृप्तीचे सुखोद्गार । तो एकुणतिसावा सधर । अतिविचित्र निरूपणें ॥ ३७ ॥ एकुणतिसाव्याची स्थिती । दृढ आकळिली होय चित्तीं । तैं सकळ भागवताची गती । ये धांवती तयापाशीं ॥ ३८ ॥ एकुणतिसावा अध्यावो । साध्यसाधना एकात्मभावो । निर्दळोनि अहंभावो । परमानंदें पहा उद्गार देत ॥ ३९ ॥ सकळ भोजना मंडण । तांबूल आणि चंदन । तो तिसावा एकतिसावा जाण । कृष्णनिर्याण-निजबोधू ॥ ४४० ॥ येणें भोजनें नित्य तृप्ती । त्यासी ममताबंध नव्हे प्राप्ती । सकळ कुळ निर्दळूनि एथीं । निजधामा निश्चितीं हरी गेला ॥ ४१ ॥ पूर्ण ब्रह्मानुभव ज्यासी । एथवरी ममता नसावी त्यासी । हें स्वांगें दावूनि हृषीकेशी । निजधामासी स्वयें गेला ॥ ४२ ॥ श्रीभागवत महाक्षेत्र । तेथें ब्रह्म मुख्य बीजधर । नारद तेथ मिरासीकर । पेरणी विचित्र तेणें केली ॥ ४३ ॥ तेथ श्रीव्यासें अतिशुद्ध । बांधारे घातले दशविध । पीक पिकलें अगाध । स्वानंदबोध निडारे ॥ ४४ ॥ तेथ शुक बैसला सोंकारा । तेणें फोडिला हरिकथापागोरा । पापपक्ष्यांचा थारा । उडविला पुरा निःशेष ॥ ४५ ॥ त्याची

---

४३० इच्छेची भूक समूळ शांत होते. त्यानें सुखापेक्षांहि अधिक तृप्ति होते. असा हा अध्याय आपल्या स्वाभाविक गोडी मुळें अलौकिक आहे. ३१ या अध्यायाची गोडी चाखण्याची ब्रह्मदेवादिकांसहि अत्यंत आवड आहे. त्याची उत्कृष्ट चव अनुपम आहे ३२ हें जिभेवांचून जेवण आहे. रसनेवांचून माधुर्य आहे. दांत नसलेल्यास त्याचे सगळे दांत पाडून आपली [illegible] चाखविली जाते. ३३ श्रीकृष्णानें पक्वान्नांची अशी रेलचेल करून उद्धवाला पानावर बसविलें. तेव्हां जनार्दनचरणांची माशी असलेला एकनाथ त्या रसाचें स्वतः यथेच्छ सेवन करूं लागला. ३४ ज्या ठिकाणीं मोठमोठ्यांचा प्रवेश होऊं शकत नाहीं, तेथें माशी सहज जाते. वास्तव जे सर्वांहून धाकटे असतात, त्यांस भगवद्रूपी रस सहज सेवन करितां येतो. ३५ अशा अगम्य ज्ञानाचें योगभांडार, गुह्यज्ञानाचें गंभीर ज्ञान, परम सुखाचें सुखसार [illegible] अठ्ठाविसावा अध्याय अतिगंभीर आहे, ३६ एकोणतिसाव्या अध्यायांत या जेवणानें जे पुरुष तृप्त झाले त्यांच्या तृप्तीचे उद्गार प्रकट केले आहेत. त्यांतील निरूपण अत्यंत विलक्षण आहे. ३७ या अध्यायांतील सार जर मनांत ठसलें, तर सगळ्या भागवताचें फल त्याच्यापाशीं धांवत येते. ३८ हा एकोणतिसावा अध्याय अहंभावाचा नाश करून साध्य-साधनांचा एकात्मभाव व्यक्त करितो आणि परमानंदाचा ढेंकर देतो. ३९ [illegible] व एकतिसाव्या अध्यायांत सगळ्या भोजनाची संभावना असें जें तांबुल व चंदन तें अर्पण केलें आहे. त्यांत श्रीकृष्णाच्या निर्वाणप्रसंगाचा उपदेश व वृत्तान्त सांगितला आहे. ४४० या भोजनानें ज्याची नित्यतृप्ति होते, त्याला मायापाश बाधत नाहीं. सगळ्या कुलाचा संहार करून श्रीहरि निजधामाला गेला. ४१ ज्याला पूर्ण ब्रह्मानुभव प्राप्त झाला आहे, त्याला येथपर्यंत ममता नसावी, हें स्वतः दाखवून श्रीहरि निजधामाला गेला. ४२ श्रीभागवत हें मोठें शेत आहे. त्यांत ब्रह्म हें मुख्य बीज धारण केलें आहे. नारद तेथला वहिवाटदार आहे त्यानें ही विचित्र पेरणी केली. ४३ तेथें श्रीव्यासानें दहा प्रकारचे शुद्ध बांधारे घातले. तेव्हां असें अगाध पीक पिकलें व स्वानंदबोध [illegible] पावला. ४४ तेथें श्रीशुकाचार्य राखण बसले. त्यांनीं हरिकथारूपी गोफणीचा पदर उलगडला [illegible] पक्ष्यांचे थवे निःशेष उडवून लाविले ४५ व श्रीकृष्णोक्तीचे भरीव दाणे वेंचून घेऊन

एकादशीं जाण । उद्धवें केली संवगण । काढिले निडाराचे कण । अतिसघन कृष्णोक्ती ॥ ४६ ॥ तेथ नानायुक्तिपडिपाडीं । उत्तमोत्तम प्रश्नपरवडी । केलीं पक्वान्नें चोखडीं । त्यांची नीच नवी गोडी अविनाशी ॥ ४७ ॥ ते अविनाशी निजगोडी । पदोपदीं अतिचोखडी । एकादशामाजीं रोकडी । उद्धवाचिये जोडी उपकार जगा ॥ ४८ ॥ त्या उद्धवाचे मागले पंक्तीं । त्यक्तोदक श्रवणार्थी । शुकमुखें परीक्षिती । निजात्मतृप्तीं निवाला ॥ ४९ ॥ त्या समर्थांचिये पंक्तीं । भावार्थदीपिका धरोनि हातीं । श्रीधरें दावितां पदपदार्थीं । निजात्मस्थितीं निवाला ॥ ४५० ॥ जेथ देशभाषापदपक्षेसीं । एका जनार्दनकृपेची माशी । तृप्ती होय अवघ्यांसरशी । निषेध तिशीं असेना ॥ ५१ ॥ एका जनार्दनीं मांजर वेडें । भावार्थदीपिकाउजियाडें । हे रस देखोनि चोखडे । ताटापुढें पैं आलें ॥ ५२ ॥ मीयों मीयों करितां स्मरण । कृपेनें तुष्टले सज्जन । शेष प्रसाद देऊनि जाण । संतृप्त पूर्ण पैं केलें ॥ ५३ ॥ एका जनार्दनाचें पोसणें । मी मांजर जाहलों नीचपणें । चाटितां संतांचें शेषभाणें । म्यां तृप्ति पावणें परिपूर्ण ॥ ५४ ॥ हो कां त्या समर्थांच्या ताटीं । पूर्ण ब्रह्मरसें भरली वाटी । ते मी अत्यंत प्रेमें चाटीं । स्वानंदपुष्टी संतोषें ॥ ५५ ॥ जो काया मनें आणि वाचा । सद्भावें विनीत होय नीचा । तो अधिकारी एकादशाचा । हा जनार्दनाचा उपदेश ॥ ५६ ॥ जंव जंव देहीं ज्ञानाभिमान । जंव जंव योग्यता सन्मान । तंव तंव एकादशाचें ज्ञान । सर्वथा जाण अनोळखचि ॥ ५७ ॥ सर्व भूतीं भगवद्भजन । सद्भावें जंव नुपजे पूर्ण । तंववरी एकादशाचें ज्ञान । सर्वथा जाण कळेना ॥ ५८ ॥ यापरी श्रीभागवतक्षेत्र । पीक पिकलें परम पवित्र । एथ सुखी होती साधक नर । ज्यांसी अत्यादर सर्व भूतीं ॥ ५९ ॥ एकादश क्षेत्र नव्हे जाण । हाचि समुद्र परिपूर्ण । जो जैसा एक होय निमग्न । तो तैशींच आपण रत्नें लाभे ॥ ४६० ॥ हा एकादश नव्हे निर्धारीं । जीवगजेंद्राच्या उद्धारीं । सवेगें पावला हरी । ज्ञानचक्र करीं घेउनी ॥ ६१ ॥ हेही नव्हे

त्यांची एकादश स्कंधांत सांठवण केली. ४६ उद्धवानें नित्य नव्या नव्या युक्तींनीं अनेक प्रश्न करून त्यांचीं उत्तम रुचकर पक्वान्नें तयार केलीं. त्यांचीं गोडी नित्य नवी व अविनाशी आहे. ४७ एकादशस्कंधांत अशी नित्य अविनाशी गोडी भरलेली आहे. ती पदोपदीं अत्यंत रुचि वाढविते. उद्धवानें जगावर एवढे उपकार करून ठेविले आहेत. ४८ त्या उद्धवाच्या मागच्या पंक्तींत उदक सोडून श्रवणाला बसलेला परीक्षिति राजा शुकमुखानें आत्मज्ञानानें तृप्त झाला व आत्मस्वरूपांत निमग्न झाला. ४९ त्या श्रेष्ठांच्या पंक्तींत भावार्थ दाखविणारा टीकारूपी दीप हातीं घेऊन श्रीधरस्वामींनीं जेव्हां पदरूपी पदार्थ दाखविले ४५० तेव्हां देशी भाषेच्या पदांनीं जनार्दनकृपेची माशी असलेला एकनाथहि सर्वांबरोबर तृप्त झाला. त्याच्या तृप्तीला कोणीं प्रतिबंध केला नाहीं. ५१ एकनाथ हें जनार्दनाचें वेडें मांजर आहे. तें भावार्थ दीपिकेचा प्रकाश पडतांच हे मधुर रस पाहून ताटापुढें येऊन बसलें. ५२ आणि त्यानें म्यांव, म्यांव करून स्मरण करितांच सज्जनांना दया आली व ते प्रसन्न झाले. त्यांनीं ताटांत उरलेला प्रसाद देऊन त्याला संतुष्ट केलें. ५३ हलकेपणा स्वीकारून मी एकनाथ जनार्दनाचें पाळलेलें मांजर झालों व संतांचीं उष्टीं ताटें चाटून पूर्णपणें तृप्त झालों. ५४ त्या समर्थांच्या ताटांत पूर्ण ब्रह्मरसाची भरलेली वाटी होती. ती मीं अत्यंत प्रेमानें चाटली आणि स्वानंदाच्या बलानें संतुष्ट झालों. ५५ जो काया-वाचा-मनानें लीन होऊन सद्भावानें नम्र होतो, तोच या एकादश स्कंधाचा अधिकारी होय, असा जनार्दनाचा उपदेश आहे. ५६ एखाद्याच्या मनांत ज्ञानाभिमानानें योग्यता व सन्मान यांची आवड जशी जशी वाढूं लागतें, तसें तसें त्याला एकादशस्कंधाचें ज्ञान पारखें होतें. ५७ जोंवर सर्वांभूतीं भगवद्भाव उपजणार नाहीं, तोंवर एकादशस्कंधाचें ज्ञान होणार नाहीं. ५८ याप्रमाणें श्रीभागवतरूपी शेतांत परम पवित्र पीक पिकलें आहे. ज्या साधकांना सर्व प्राण्यांविषयीं अत्यादर असतो तेच याच्या योगें सुखी होतात. ५९ एकादश हें केवळ शेतच नव्हे तर, तो समुद्रहि आहे. त्यांत जो जशी बुडी मारील तसें त्याला रत्न सांपडेल. ४६० या एकादशस्कंधाच्या रूपानें जीवरूपी गजेंद्राचा उद्धार करण्यासाठीं श्रीहरि ज्ञानरूपी चक्र हातीं घेऊन प्राप्त झाला. ६१ या स्कंधाचा एवढाच महिमा नाहीं, तर अहंकार-

एकादशाची थोरी । अहंहिरण्यकशिपू विदारी । तो हा प्रकटला नरहरी । भक्तकैवारी कृपापूर्ण ।। ६२ ।। गंगा यमुना दोनी सांग । कृष्ण उद्धव उत्तम चांग । गुप्त सरस्वती ज्ञानबोध । त्रिवेणीप्रयाग एकादश ।। ६३ ।। तेथ वैराग्यमाघमासीं जाण । श्रद्धा अरुणोदयीं नित्य स्नान । करितां होऊनि पावन । कृष्णपदवी पूर्ण पावती ।। ६४ ।। हेही एकदशाची नव्हे कोटी । कृष्णउद्धवांची गुह्य गोठी । हे बहुकल्प कपिलाषष्ठी । पर्वणी गोमटी निजसाधकां ।। ६५ ।। ते पर्वकाळीं जे निमग्न । ते तत्काळ पावती कल्याण । बाधू न शके जन्ममरण । ब्रह्म परिपूर्ण स्वयें होती ।। ६६ ।। हा एकादश नव्हे जाण । एकातिसां खणांचें वृंदावन । एथ नित्य वसे श्रीकृष्ण । स्वानंदपूर्ण निजसत्ता ।। ६७ ।। एथ पंध्राशतें जे श्लोक । तेचि अत्यंत पानें चोख । माजीं ज्ञानमंजरीचे घोख । अतिसुरेख शोभती ।। ६८ ।। तेथ जे घालिती निजजीवन । ते होती परम पावन । स्वयें ठाकती कृष्णसदन । ब्रह्म परिपूर्ण स्वानंदें ।। ६९ ।। जे वंदिती मूळींचे उदका । जे लाविती मूळमृत्तिका । ते वंद्य होती तिहीं लोकां । नित्य निजसखा श्रीकृष्ण जोडे ।। ४७० ।। जे पठणरूपें जाणा । प्रत्यगावृत्ति प्रदक्षिणा । सद्भावें करितां सुजाणा । श्रीकृष्णचरणां विनटती ।। ७१ ।। ये कथेच्या विचित्र लीला । जे नित्य घालितां रंगमाळा गाळां । ते नागवती कालिकाळा । सदा त्याजवळा श्रीकृष्ण ।। ७२ ।। हें एकादशाचें वृंदावन । जो श्रवणें करी नित्य पूजन । त्यासी प्रसन्न तो श्रीकृष्ण । देहाभिमान निर्दळी ।। ७३ ।। तेथ मनाची पुष्पांजळी । जो अनुदिनीं अर्पी त्रिकाळीं । तोही पावे हरिपदकमळीं । निजात्ममेळीं निजनिष्ठा ।। ७४ ।। हें श्रीभागवत वृंदावन । मेळवूनि संत सज्जन । ये कथेचें करी जो व्याख्यान । जो पठण करी निरपेक्ष ।। ७५ ।। हें देखूनि महापूजन । संतोषे श्रीजनार्दन । श्रोते वक्ते जे सावधान । त्यांसी निजात्मज्ञान स्वयें देत ।। ७६ ।। श्रवणें पठणें मननें । अर्थावबोधव्याख्यानें । एकादशें समान देणें । ज्ञान पावणें जाणत्यां नेणत्यांही

रूपी हिरण्यकशिपूचें विदारण करण्यास हा भक्तांचा कैवारी नरहरीच कृपेनें प्रकट झाला आहे. ६२ गंगा व यमुना या दोन नद्या म्हणजेच श्रीकृष्ण व उद्धव होत. गुप्त सरस्वती हाच ज्ञानबोध आहे. त्यांचा एकादशस्कंधांत त्रिवेणी संगम झाला आहे. ६३ तेथें वैराग्यरूपी माघमासांत श्रद्धारूपी प्रातःकाली जे नित्य स्नान करून पावन होतात, ते कृष्णपदवीला पूर्णपणें प्राप्त होतात. ६४ एकादशस्कंधाची एवढीच थोरवी नाहीं तर कृष्ण-उद्धवाच्या गुह्य गोष्टीचा तो साठ वर्षांनीं येणारा कपिलाषष्ठीचाच योग होय. ६५ त्या पर्वकालांत स्नान करणारांचें तत्काल कल्याण होतें. त्यांस जन्म-मरण बाधूं शकत नाहीं. ते स्वतःच परिपूर्ण ब्रह्म होतात. ६६ हा एकादश स्कंध नव्हे, तर हें एकतीस खणांचें वृंदावन आहे. तेथें स्वानंदपूर्ण श्रीकृष्ण आपल्या सत्तेनें नित्य वास करितो. ६७ त्याचे पंधराशें श्लोक हींच सुंदर विस्तृत पानें आहेत. त्यांत ज्ञानमंजरीचे सुरेख घोस अतिशय शोभतात. ६८ त्यांस जे आपलें जीवितरूप जल अर्पण करितात, ते परमपावन होतात व स्वतः परिपूर्ण ब्रह्म होऊन स्वानंदानें वैकुंठाला जातात. ६९ त्याच्या मुळांतील पाण्याला जे वंदन करितात, तेथील माती मस्तकीं लावितात, ते त्रिभुवनांत वंद्य होतात. श्रीकृष्ण नित्य त्यांचा सखा होऊन राहतो. ४७० जे सद्भावानें पठणवृत्तिरूप प्रदक्षिणा घालितात, ते श्रीकृष्णचरणाला प्राप्त होतात. ७१ या कथेची अशी विचित्र लीला आहे. जे आपल्या गळ्यांत नित्य रंगमाळा घालितात, ते कळिकाळाला नागवितात. श्रीकृष्ण सतत त्यांच्याजवळ असतो. ७२ हें अकराव्या स्कंधाचें वृंदावन जो श्रवणरूपानें नित्य पूजितो, त्यावर श्रीकृष्ण प्रसन्न होऊन त्याच्या देहाभिमानाचा नाश करितो. ७३ जो मनाची पुष्पांजलि नित्य तिन्ही कालीं अर्पण करितो, तोहि आत्मनिष्ठेनें हरीच्या पदकमलांना प्राप्त होतो. ७४ जो संत-सज्जन जमवून श्रीभागवतरूपी वृंदावनांत ही कथा सांगतो, निरपेक्ष चित्तानें जो पठण करितो, ७५ त्याचें हें महापूजन पाहून श्रीकृष्ण संतुष्ट होतो व सावधान असलेल्या श्रोत्यांना व वक्त्यांना स्वतः आत्मज्ञान देतो. ७६ अकराव्या स्कंधाचें श्रवण, मनन, पठण व अर्थ जाणून त्याचें व्याख्यान करणारांस सारखेंच फल मिळतें. सज्ञान व अज्ञान दोघांसहि सारखेंच ज्ञान प्राप्त होतें. ७७

॥ ७७ ॥ श्रवण मनन नव्हे पठण । तरी एकादशाचें पुस्तक जाण । ब्राह्मणासी द्यावें दान । विवेकज्ञान तेणें उपजे ॥ ७८ ॥ एकादश द्यावें दान । करावें एकादशाचें पूजन । करितां एकादशाचें स्मरण । पाप संपूर्ण निर्दळे ॥७९॥ एकादशसंग्रह जो करी । कृष्ण तिष्ठे त्याचे घरीं । जो एकादशाची श्रद्धा धरी । ज्ञान त्यामाझारीं स्वयें रिघे ॥४८०॥ श्लोक श्लोकार्ध पदमात्र । नित्य स्मरे ज्याचें वक्त्र । तोही होय परम पवित्र । अतिउदार एकादश ॥ ८१ ॥ अवचटें कार्यांतरीं । दृष्टी पडे एकादशावरी । तैं पातकें होतीं रानभरी । अपधाकें दूरी तीं पळतीं ॥ ८२ ॥ तो एकादश ज्याचे करीं । देव वंदिती त्यातें शिरीं । तो निजांगें जग उद्धरी । एवढी थोरी एकादशाची ॥ ८३ ॥ सकळ पुराणांमाझारीं । हा एकादश नवकेसरी । भवगजातें विदारी । क्षणामाझारीं श्लोकार्धें ॥ ८४ ॥ ' मामेकमेव शरणं ' । याचि श्लोकाचें करितां पठण । मायेचा गळा धरोनि जाण । अपधाकें पूर्ण संसार निमे ॥ ८५ ॥ ' निरपेक्षं मुनिं शांतं ' । हा श्लोक चढे जैं हात । तैं सेवका सेवी कृष्णनाथ । भवभय तेथ उरे कैंचें ॥ ८६ ॥ एकादशींचा एकेक श्लोक । होय भवबंधच्छेदक । जेथ वक्ता यदुनायक । तेथ हा विशेख म्हणों नये ॥ ८७ ॥ श्रीभागवतामाजीं जाण । एकादश मोक्षाचें स्थान । यालागीं श्लोकार्धमात्रेंकरून । भवबंध निर्दळी ॥ ८८ ॥ श्रीकृष्ण वेदांचें जन्मस्थान । त्याचे मुखींचें हें निरूपण । तैं सकळ वेदार्थ जाण । माहेरा आपण स्वयें येती ॥८९॥ यालागीं एकादशीं वेदार्थ । माहेरीं सुखावले समस्त । ते साधकांसी परमार्थ स्वानंदें देत संपूर्ण ॥ ४९० ॥ मंथोनि वेदशास्त्रार्थ । व्यासें केलें महाभारत । त्या भारताचा माथितार्थ । श्रीभागवत हरिलीला ॥९१॥ त्या भागवताचा सारांश । तो हा जाण एकादश । तेथ वक्ता स्वयें हृषीकेश । परब्रह्म सुरस प्रबोधी ॥९२॥ भागवतमाजीं एकादश । जैसा यतींमाजीं परमहंस । कां देवांमाजीं जगन्निवास । तैसा एकादश परम वंद्य ॥ ९३ ॥ पक्ष्यांमाजीं राजहंस । रसांमाजीं सिद्धरस । तैसा भागवतामाजीं एकादश । परम सुरस अतिवंद्य ॥ ९४ ॥ तीर्थ क्षेत्र

श्रवण, मनन, पठण जर घडलें नाहीं, तर अकराव्या स्कंधाचें पुस्तक ब्राह्मणाला दान द्यावें. त्यायोगें विवेकज्ञान उत्पन्न होतें. ७८ अकराव्या स्कंधाचें दान द्यावें, पूजन करावें. किंवा नुसतें स्मरण जरी केलें तरी सगळ्या पातकांचा नाश होतो. ७९ जो अकराव्या स्कंधाचा संग्रह करितो, त्याच्या घरीं श्रीकृष्ण रहातो. जो या स्कंधावर श्रद्धा ठेवितो त्याला सहज ज्ञान प्राप्त होतें. ४८० ज्याचें मुख यांतील श्लोकांचा, श्लोकार्धाचा किंवा एखाद्या पदाचा सहज उच्चार करितें, तोहि परमपावन होतो. असा हा स्कंध अति उदार आहे. ८१ काम करीत असतां सहज जरी या स्कंधावर दृष्टि पडली, तरीहि सगळीं पातकें भयानें दूर पळून जातात. ८२ असा हा अकरावा स्कंध ज्याच्या हातीं असतो त्याला देव मस्तकानें वंदन करितात, तो स्वतःच सगळ्या जगाचा उद्धार करितो. एवढा या स्कंधाचा महिमा आहे. ८३ सगळ्या पुराणांत हा अकरावा स्कंध अपूर्व सिंहच आहे. तो भवरूपी हत्तीचें अर्ध्या श्लोकानेंच एका क्षणांत विदारण करितो. ८४ ' मामेकमेव शरणम् ' म्ह० मला एकालाच शरण यावें, या श्लोकाचें पठण केलें असतां संसार मायेचा गळा दाबून भयानें नाहींसा होतो. ८५ ' निरपेक्षं मुनिं शांतम् ' हा श्लोक हातीं आला असतां श्रीकृष्णनाथच त्याची सेवा करितो. मग तेथें भवभय कोठून उरणार ! ८६ या अकराव्या स्कंधांतील एकेक श्लोक भवबंधाचा छेद करणारा आहे. जेथें श्रीकृष्ण वक्ता, तेथें हा चांगला व हा वाईट ही निवड रहातच नाहीं. ८७ अकरावा स्कंध भागवतांतील मोक्षाचें स्थान आहे. त्यामुळें त्यांतील अर्धा श्लोकहि भवबंधाचा नाश करितो. श्रीकृष्ण वेदाचें जन्मस्थान आहे व हें त्याच्याच मुखांतील निरूपण आहे. म्हणून सगळ्या वेदांचा अर्थ आपण होऊन माहेरीं आला आहे. ८९ त्यामुळें या स्कंधांत वेदार्थ माहेरीं राहून सुखावला आहे. तो साधकाला स्वानंदानें संपूर्ण परमार्थ देतो. ४९० सगळ्या वेद-शास्त्रांचें मथन करून श्रीव्यासानें महाभारत रचिलें त्या भारताचा मथितार्थ जी हरीची लीला तेंच हें भागवत होय. ९१ त्या भागवताचा सारांश या अकराव्या स्कंधांत आहे. त्यांत श्रीकृष्णानें वक्ता होऊन स्वतः परब्रह्माचा सुरस उपदेश केला. ९२ यतींमध्यें जसा परमहंस, देवांमध्यें जसा जगन्निवास श्रीविष्णु तसा भागवतांत हा अकरावा स्कंध परमवंद्य आहे. ९३ पक्ष्यांमध्यें जसा राजहंस, रसामध्यें जसें अमृत, तसा हा भागवतांतील अकरावा स्कंध परम सुरस व अत्यंत वंद्य आहे. ९४ तीर्थक्षेत्रांतील वाराणशी, किंवा गंगा जशी पावन तसा हा स्कंध जीवांचा उद्धार करणारा

वाराणसी । पावनत्वें गंगा जैशी । जीवोद्धारीं एकादशी । माहिमा तैसी अनिर्वाच्या ॥ ९५ ॥ त्या एकादशाची टीका । जनार्दनकृपें करी एका । तो एकत्वाच्या निजसुखा । फळे भाविका सद्भावें ॥९६ ॥ धरोनि बाळकाचा हात । बाप अक्षरें स्वयें लिहिवीत । तैसा एकादशाचा अर्थ । बोलविला परमार्थ जनार्दनें ॥ ९७ ॥ कैसा चालवावा ग्रंथ । केवीं राखावा पदपदार्थ । ये व्युत्पत्तीची नेणें मी मात । बोलवी समर्थ जनार्दन ॥ ९८ ॥ जनार्दनें नवल केलें । मूर्खाहातीं ज्ञान बोलविलें । ग्रंथीं परमार्थरूप आणिलें । वाखाणविलें एकादशा ॥ ९९ ॥ एकादशाचा पदपदार्थ । शास्त्रवक्त्यां अतिगूढार्थ । तोही वाखाणविला परमार्थ । कृपाळु समर्थ जी जनार्दन ॥ ५०० ॥ जनार्दनें ऐसें केलें । माझें मीपण निःशेष नेलें । मग परमार्था अर्थविलें । बोलवूनि बोलें निजसत्ता ॥ १ ॥ खांबसूत्री बाहुलीं । सूत्रधार नाचवी भलीं । तेवीं ग्रंथार्थाची बोली । बोलविली श्रीजनार्दनें ॥ २ ॥ अवघा जनार्दनचि देखा । तोचि आडनांवें जाहला एका । तेणें नामें ग्रंथ नेटका । अर्थी सात्विकां तत्त्वार्थ दावी ॥ ३ ॥ कवित्वीं घातलें माझें नांव । शेखीं नांवाचा नुरवीच ठाव । ऐसें जनार्दनवैभव । अतिअभिनव अलौलिक ॥ ४ ॥ ग्रंथ देखोनियां सज्ञान । म्हणती ज्ञाता एका जनार्दन । जवळीं जाहलिया अदर्शन । मूर्ख संपूर्ण मानिती ॥ ५ ॥ एका जनार्दनाचा वृत्तांत । एक म्हणती भक्तियुक्त । एक म्हणती जीवन्मुक्त । प्रपंचीं निश्चित मानिती ॥ ६ ॥ अहो हा एका जनार्दन । नाहीं आसन न देखे ध्यान । नेम मुद्रा माळा जाण । उपासनलक्षण या नाहीं ॥ ७ ॥ कोण मंत्र असे यासी । काय उपदेशी शिष्यांसी । मंत्र न दे कोणासी । भुललें भाविक त्यासी या भावार्थें ॥ ८ ॥ नुसत्या हरिनामाचा घोख । लावूनि भुलविले येणें लोक । ऐसे नाना विकल्प । जनार्दन देख उपजवी स्वयें ॥ ९ ॥ मी जेथ झाडा देऊं जायें । तें बोलतें

आहे. त्याचा महिमा अवर्णनीय आहे. ९५ त्या अकराव्या स्कंधावर जनार्दनाच्या कृपाप्रसादानें एकनाथानें टीका लिहिली व तो सद्भावानें ऐक्याच्या आनंदाला प्राप्त झाला. ९६ पिता पुत्राचा हात धरून त्याच्याकडून जशीं अक्षरें लिहवितो, तसा जनार्दनानें माझ्याकडून या एकादश स्कंधाचा अर्थ करवून परमार्थ बोलविला. ९७ ग्रंथ कसा करावा, पदांचा अर्थ कसा लावावा, याची मला कांहीचीहि माहिती नसतां समर्थ जनार्दनानेंच तो माझ्याकडून बोलविला. ९८ जनार्दनानें काय आश्चर्य केलें पहा. त्यांनीं मज मूर्खाच्या तोंडून ज्ञान बोलविलें. ग्रंथामध्यें परमार्थस्वरूप आणिलें व एकादश स्कंधाचें वर्णन करविलें. ९९ या स्कंधाचा पद-पदार्थ शास्त्र-वक्त्यांनाहि अगम्य आहे, पण तो परमार्थ मजकडून त्यांनीं बोलविला. असा दयाळु जनार्दन समर्थ आहे. ५०० जनार्दनानें असें केलें कीं, माझें मीपण निःशेष नेलें व नंतर आपल्या सत्तेनें परमार्थाचें व्याख्यान करविलें. १ सूत्रधार जसा कळसूत्री बाहुल्यांना कुशलतेनें नाचवितो, तसा हा ग्रंथार्थ जनार्दनानें बोलविला. २ सगळा जनार्दनच भरलेला होता. तो आडनांवानेंच एकनाथ झाला आणि त्याच नांवानें हा उत्तम ग्रंथ रचून त्यानें सात्त्विकांना त्याचा तत्त्वार्थ दाखविला. ३ कवित्वांत माझें नांव घातलें, पण शेवटीं नांवालाहि अवकाश ठेविला नाहीं. असें जनार्दनाचें अत्यंत विलक्षण व अलौकिक वैभव आहे. ४ सज्ञान लोक हा ग्रंथ पाहून एका-जनार्दन ज्ञानी आहे असें म्हणतील; पण समक्ष भेट झाल्यास ते मला मूर्खच मानतील. ५ आतां एकाजनार्दनाविषयीं म्हणाल, तर कोणी त्याला भाविक म्हणतात, कोणी जीवन्मुक्त म्हणतात तर कोणी प्रपंची म्हणतात. ६ अहो, हा एका-जनार्दन असा आहे कीं, त्याला आसन नाहीं, ध्यान नाहीं, नेम, मुद्रा, माळा, इत्यादि उपासनेचें एकहि लक्षण नाहीं. ७ याचा मंत्र कोणता! हा शिष्यांना कशाचा उपदेश करितो, म्हणून विचारावें तर हा कोणाला मंत्र देत नाहीं. नुसत्या भावार्थानेंच भाविक लोक याच्यावर भुलले आहेत. ८ यानें नुसत्या हरिनामाचा घोष करून लोकांना भुलविलें आहे. असे नाना प्रकारचे विकल्प जनार्दनानें उत्पन्न केले आहेत. ९

जनार्दन होये। युक्तिप्रयुक्तीचें पाहें । मीपण न राहे मजमाजीं ॥ ५१० ॥ एवं माझें मीपण समूळीं । जनार्दन स्वयें निर्दळी । माझी जे हाले अंगुळी । ते क्रिया चाळी जनार्दन ॥ ११ ॥ निमेषोन्मेषांचे संचार । श्वासोच्छ्वासांचे बिडार । सकळ इंद्रियांचा व्यापार । चाळिता साचार जनार्दन ॥ १२ ॥ जेथ मी म्हणों जाय कविता । ते जनार्दनचि होय तत्त्वतां । माझें मीपण धरावया पुरता । ठाव रिता नुरेचि ॥ १३ ॥ माझें जें कां मीपण । जनार्दन जाहला आपण । एका जनार्दना शरण । ग्रंथ संपूर्ण तेणें केला ॥ १४ ॥ हेही बोल बोलतां जाण । खुणा बारी जनार्दन झाडा सूचितां संपूर्ण । वेगळेपण अंगीं लागे ॥ १५ ॥ आतां वेगळा अथवा एक । अवघा जनार्दन स्वयें देख । तेणें ग्रंथार्थाचे लेख । अत्यंत चोख विस्तारिले ॥ १६ ॥ ग्रंथ देशभाषा व्युत्पत्ती । म्हणोनि नुपेक्षावा पंडितीं । अर्थ पहावा यथार्थी । परमात्मस्थिती निजनिष्ठा ॥ १७ ॥ जरी संस्कृत ग्रंथ पूर्ण । तरी देशभाषाव्याख्यान । मा हें आयतें निरूपण । साधक सज्ञान नुपेक्षिती ॥ १८ ॥ या ग्रंथा आदर करिती । अथवा जे कां उपेक्षिती । केवळ जे कोणी निंदिती । तेही आम्हां ब्रह्ममूर्ति सद्गुरुरूपें ॥ १९ ॥ हेंही शिकविलें जनार्दनें । सर्व भूतीं मजाचि पाहणें । प्रकृतिगुणांचीं लक्षणें । सर्वथा आपणें न मानावीं ॥ ५२० ॥ शिष्याचे क्षोभ न साहवती । निंदकांची निंदा न जिरे चित्तीं । तैं तो कोरडाचि परमार्थी । क्षोभें निश्चितीं नागविला ॥ २१ ॥ एवं पराचे प्रकृतिगुण । पाहतां सर्वथा क्षोभे मन । ते न पहावे आपण । सर्व भूतीं चैतन्य समत्वें पहावें ॥ २२ ॥ येचि उपदेशीं अत्यादर । जनार्दनें केला थोर । यावेगळा भवाब्धिपार । सज्ञान नर पाहों न शके ॥ २३ ॥ येणेंचि निर्धारें गुरु तो गुरू । आम्हां शिष्य तोही संवादगुरू । निंदक तो परम गुरू । निरपराध सद्गुरु जनार्दनकृपा ॥ २४ ॥ जनार्दनकृपां एथें । गुरूवेगळें नुरेचि रितें । मीपणासह सकळ भूतें । गुरुत्वा निश्चितें आणिलीं तेणें ॥ २५ ॥ तेणेंचि

त्यांना मी उत्तर द्यावें तर जनार्दनच बोलूं लागतो. युक्ति-प्रयुक्तीचा मीपणाहि माझ्यामध्यें रहात नाहीं. ५१० असें माझें मीपण जनार्दन स्वतःच नाहींसें करितो. माझें बोट हलतें तेंहि कर्म जनार्दनच करितो. ११ नेत्रांचे निमिषोन्मेष, श्वासोच्छ्वास, इंद्रियांचा सगळा व्यापार जनार्दनच करितो. १२ मी कविता म्हणूं लागल्यास तीहि जनार्दनच होतो. त्यामुळें मला 'मीपण' धरण्यास रिकामी जागाच उरत नाहीं. १३ माझें सगळें 'मीपण' जनार्दनच झाला आहे. याप्रमाणें एकनाथ जनार्दनाला शरण गेल्यामुळें त्यानेंच हा सगळा ग्रंथ पूर्ण केला. १४ हे शब्द बोलत असतांहि जनार्दन खूण करून सुचवीत आहे कीं, यांत तुझ्याकडे वेगळेपणा येतो. १५ आतां वेगळा किंवा एक सगळा जनार्दन स्वतःच आहे. त्यानेंच ग्रंथार्थाचा उत्तम प्रकारें विस्तार केला. १६ हा ग्रंथ प्राकृत भाषेंत आहे. म्हणून पंडितांनीं त्याची उपेक्षा करूं नये. आत्मनिष्ठेनें त्यांतील परमार्थाविषयींचा खरा अर्थ पहावा. १७ जरी संस्कृतांत संपूर्ण ग्रंथ आहे, तरी देशी भाषेंत त्याचा अर्थ सांगावा लागतो; मग हें आयतेंच निरूपण मिळाल्यावर सज्ञान साधक त्याची उपेक्षा कशी करतील. १८ या ग्रंथाचा जे आदर करितील, जे उपेक्षा करितील किंवा जे कोणी निंदा करतील, ते सगळे आम्हांला सद्गुरुरूपानें ब्रह्मस्वरूपच आहेत. १९ सर्व भूतांमध्यें मलाच पहावें व प्रकृतिगुणांचें लक्षण सर्वथा मानूं नये, हेंहि मला जनार्दनानेंच शिकविलें. ५२० ज्याला शिष्यांचा क्षोभ सहन होत नाहीं, निंदकानें केलेली निंदा मनाला सोसवत नाहीं, तो परमार्थाविषयीं कोरडाच राहिला व क्षोभामुळें पुर्ता नागवला, असें जाणावें. २१ याप्रमाणें इतरांचें प्रकृतिगुण पाहून मनाला क्षुब्ध होऊं देऊं नये. आपण त्यांच्याकडे पाहूंहि नये सर्व भूतांमध्यें समत्वानें आत्मतत्त्व पहावें. २२ हाच उपदेश जनार्दनानें अत्यादरानें केला आहे. त्यावांचून ज्ञानी पुरुषहि भवसागराचा परतीर पाहूं शकणार नाहीं. २३ याच निश्चयानें आह्मांला गुरु तो गुरूच; व जो शिष्य तोहि संवादगुरु व निंदक तर परमगुरूच आहे. अशी सद्गुरु जनार्दनाची कृपा निरुपम आहे. २४ येथें सर्वत्र जनार्दनकृपाच आहे. गुरूवांचून रिकामी जगाच नाहीं. त्यानें मीपणासह सगळीं भूतें गुरुत्वाला आणलीं आहेत. २५ त्यानेंच ही ग्रंथकथा परमार्थसिद्धीला पोंचविली. ही माझ्या

हे ग्रंथकथा । सिद्धि पावविली परमार्था । माझे गांठीची नव्हे योग्यता । हें जाणितलें श्रोतां ग्रंथारंभीं ॥ २६ ॥ ग्रंथारंभ प्रतिष्ठानीं । तेथ पंचाध्यायी संपादूनी । इतर ग्रंथाची करणी । आनंदवनीं विस्तारिली ॥ २७ ॥ अविमुक्त महाश्मशान । वाराणसी आनंदवन । एकासचि नांवें जाण । ऐका लक्षण त्याचेंही ॥ २८ ॥ अतिशयें जेथ मुक्ती । अधमोत्तमां एकी गती । पुढती नाहीं पुनरावृत्ती । अविमुक्त म्हणती या हेतू ॥ २९ ॥ जे श्मशानी सांडिल्या प्राण । प्राणी पुनः न देखे मसण । यालागीं हें महाश्मशान । अंतीं ब्रह्मज्ञान शिव सांगे ॥ ॥ ५३० ॥ मर्यादासेतु वरुण अशी । मध्यें नांदे पंचक्रोशी । रिगमु नाहीं पातकांसी । यालागीं वाराणसी म्हणिपे इतें ॥ ३१ ॥ वरुणा पातकांतें वारी । अशी महादोष संहारी । मध्यें विश्वेश्वर नगरी । वाराणसी खरी या हेतु ॥ ३२ ॥ जें विश्वेश्वराचें क्रीडास्थान । जेथ स्वानंदें शिव क्रीडे आपण । यालागीं तया आनंदवन । ज्यालागीं मरण अमर वांछिती ॥ ३३ ॥ जेथें जितां सदन्नें भुक्ती । मेल्यां मागें अचुक मुक्ती । यालागीं आनंदवन म्हणती । पार्वतीप्रती सदाशिव सांगे ॥ ३४ ॥ तया वाराणसी मुक्तिक्षेत्रीं । मणिकर्णिकामहातीरीं । पंचमुद्रापीठामाझारीं । एकादशावरी टीका केली ॥ ३५ ॥ ऐकतां संतोषले सज्जन । स्वानंदें तुष्टला जनार्दन । पंचाध्यायीं संपतां जाण । स्वमुखें आपण वरद वदला ॥ ३६ ॥ ग्रंथ सिद्धि पावेल यथार्थीं । येणें सज्ञानही सुखी होती । मुमुक्षु परमार्थ पावती । साधक तरती भवसिंधू ॥ ३७ ॥ भाळे भोळे विषयी जन । याचें करितां श्रवण पठण । हरिभक्त होती जाण । सन्मार्गी पूर्ण बहुत होती ॥ ३८ ॥ हे टीका तरी मराठी । परी ज्ञानदानें होईल लाठी । ऐसें निजमुखीं बोलोनि गोठी । कृपादृष्टीं पाहिलें ॥ ३९ ॥ तेथ म्यांहीं

पदरची योग्यता नव्हे, हें मी श्रोत्यांना ग्रंथाच्या आरंभींच सांगितलें आहे. २६ मीं पैठणांत ग्रंथाला आरंभ केला. तेथें पांच अध्याय पुरे करून पुढला सर्व ग्रंथ आनंदवनांत शेवटास नेला. २७ अविमुक्त, महास्मशान, वाराणसी, आनंदवन हीं सगळीं एका काशीक्षेत्राचींच नांवें आहेत. त्याचेंहि लक्षण सांगतों, ते ऐका. २८ तेथें अत्यंत मुक्ति मिळते. उत्तम व अधम, या सगळ्यांना एकसारखीच गति मिळते. जीवाला पुनः जन्म घ्यावा लागत नाहीं. म्हणून तिला अविमुक्त म्हणतात. २९ तेथल्या स्मशानांत एकदां मरण आल्यावर पुनः त्या प्राण्याला स्मशान पहावें लागत नाहीं, शंकर त्याला मरणसमयीं ब्रह्मज्ञान सांगतो. म्हणून त्याला महास्मशान म्हणतात. ५३० वरुणा आणि अशी, या दोन नद्यांच्या सीमेच्या आंत पंचक्रोशी आहे. तेथें पातकांचा प्रवेश होत नाहीं, म्हणून तिला वाराणशी म्हणतात. ३१ वरुणा पातकांचें निवारण करिते. अशी महादोषांचा नाश करिते. या दोघींच्यामध्यें विश्वेश्वर नगरी आहे. यास्तव तिला वाराणशी म्हणतात. ३२ तें विश्वेश्वराचें क्रीडास्थान आहे, तेथें श्रीशंकर स्वतः स्वानंदानें क्रीडा करितो, म्हणून त्याला आनंदवन म्हणतात. त्यामुळें अमर देवहि तेथें मरणाची इच्छा करितात. ३३ तेथें जिवंतपणीं सुग्रास अन्नानें तृप्ति होते आणि मरणोत्तर खात्रीनें मुक्ति मिळते म्हणून त्याला आनंदवन म्हणतात, असें शंकरानें पार्वतीला सांगितलें आहे. ३४ अशा त्या मुक्तक्षेत्र वाराणशीमध्यें मणिकर्णिकेच्या महातीरावर पंचमुद्रापीठामध्यें या एकादश स्कंधावर मीं टीका लिहिली. ३५ ती ऐकून संतांना संतोष झाला. जनार्दन स्वानंदानें संतुष्ट झाले. पांच अध्याय संपतांच त्यांनीं आपल्या मुखानें वर दिला. ३६ कीं, हा ग्रंथ निर्विघ्नपणें सिद्धीस जाईल. यानें सज्ञानहि सुखी होतील. मुमुक्षूला परमार्थ लाभेल. साधक भवसिंधु तरून जातील. ३७ भाळे-भोळे विषयीजन याचें श्रवण-पठण करतील व हरिभक्त होतील आणि अनेक लोक पूर्ण सन्मार्गी होतील. ३८ ही टीका जरी मराठींत आहे, तरी ज्ञानदान करण्यास समर्थ आहे, असें बोलून त्यांनीं कृपादृष्टीनें मजकडे पाहिलें. ३९ तेव्हां मीं त्यांना विनंति केली कीं, या ग्रंथांचा अर्थ जाणण्याची इच्छा करणारे जे असतील त्यांस ब्रह्मभावानें ब्राह्मण-

केली विनंती । जे ये ग्रंथीं अर्थार्थी होती । त्यांसी ब्रह्मभावें ब्राह्मणभक्ती । नामीं प्रीती अखंड द्यावी ॥ ५४० ॥ ते न व्हावे ब्रह्मद्वेषी । निंदा नातळावी तयांसी । समूळ क्षय ब्रह्मद्वेषेंसीं । निंदेपासीं सकळ पापें ॥ ४१ ॥ ऐसी ऐकतां विनवण । कृपेनें तुष्टला जनार्दन । जें जें माझें वरदान । वरद आपण स्वयें वदला ॥ ४२ ॥ ये ग्रंथीं ज्या अनन्यभक्ती । निंदाद्वेष नुपजे चित्तीं । रामनामीं अतिप्रीती । सुनिश्चितीं वाढेल ॥ ४३ ॥ अविद्य सुविद्य व्युत्पत्ती । न करितां ब्राह्मणजाती । ब्रह्मत्वें होईल ब्राह्मणभक्ती । तेणें ब्रह्मप्राप्ती अचूक ॥ ४४ ॥ नामापरता साधनसद्भावो । नाहीं ब्राह्मणापरता आन देवो । तो ये ग्रंथीं भजनभावो । नीच नवा पहा हो वाढेल ॥ ४५ ॥ ऐसे देवोनि वरदान । हृदयीं आलिंगी जनार्दन । म्हणे या ग्रंथीं ज्याचें भजन । त्याचें भवबंधन मी छेदीं ॥ ४६ ॥ हेही अलंकारपदवी । स्वयें जनार्दन बोलवी एवं कृपा केली जनार्दनदेवीं । हे ठेवाठेवी मी नेणें ॥ ४७ ॥ थोर भाग्यें मी पुरता । पूर्ण कृपा केली श्रोतां । समूळ सांभाळिलें ग्रंथा । अर्थपरमार्था समसाम्यें ॥ ४८ ॥ पुढें या ग्रंथाचें व्याख्यान । जेथ होईल कथाकथन । तेथ द्यावें अवधान । हें प्रार्थन दीनाचें ॥ ४९ ॥ हे ऐकोनि प्रार्थना जाण । संतोषले श्रोतेजन । हे कथा आमुचें निजजीवन । जेथ व्याख्यान तेथ आम्ही ॥ ५५० ॥ ऐसे तुष्टले श्रोतेजन । वरदें तुष्टला श्रीजनार्दन । एका जनार्दना शरण । ग्रंथ संपूर्ण जाहला ॥ ५१ ॥ वाराणसी महामुक्तिक्षेत्र । विक्रमशक वृष संवत्सर । शके सोळाशें तिसोत्तर । टीका एकाकार जनार्दन-कृपा ॥ ५२ ॥ महामंगळ कार्तिकमासीं । शुक्ल पक्ष पूर्णिमेसी । सोमवारशिवयोगेंसीं । टीका एकादशी समाप्त जाहली ॥५३॥ स्वदेशींचा शक संवत्सर । दंडकारण्य श्रीरामक्षेत्र । प्रतिष्ठान गोदावरीतीर । येथील उच्चार तो ऐका ॥ ५४ ॥ शालिवानशकवैभव । संख्या चौदाशें पंचाणव । श्रीमुख संवत्सराचें नांव । टीका अपूर्व तैं जाहली ॥ ५५ ॥ एवं एकादशाची टीका । जनार्दनकृपा करी एका । ते हे

भक्ति व नामामध्यें अखंड प्रीति द्यावी. ५४० ते ब्रह्मद्वेष्टे होऊं नयेत. निंदेला त्यांनीं स्पर्शहि करूं नये. कारण ब्रह्मद्वेष केल्यानें समूळ क्षय होतो व निंदेजवळ सगळीं पातकें असतात. ४१ ही माझी विनंति ऐकून श्रीजनार्दन-स्वामी कृपेनें प्रसन्न झाले व मीं जें जें मागितलें तें तें वरदान त्यांनीं स्वतः उच्चारून दिलें. ४२ या ग्रंथावर ज्याची अनन्य भक्ति असेल, त्याच्या मनांत निंदा-द्वेष उपजणार नाहीं. त्याची रामनामावरील प्रीति अतिशय वाढेल. ४३ विद्वान, अविद्वान् यांचा विचार न करितां ब्राह्मण जातीमध्यें ब्रह्मत्वानें त्याची ब्राह्मणभक्ति दृढ होईल व त्यामुळें अचूक ब्रह्मप्राप्ति होईल. ४४ हरिनामासारखें दुसरें सद्भावाचें साधन नाहीं. ब्राह्मणासारखा दुसरा देव नाहीं. या ग्रंथावर नित्य नवा भजनभाव वाढत जाईल. ४५ असें वरदान देऊन श्रीजनार्दनानें मला हृदयाशीं धरून आलिंगन दिलें व म्हटलें कीं, या ग्रंथावर ज्याची भक्ति असेल त्याचें भवबंधन मी तोडून टाकीन. ४६ ही देखील अलंकारिक भाषा स्वतः जनार्दनच बोलवीत आहे. याप्रमाणें जनार्दन-देवानें कृपा केली. तीहि मला ठाऊक नाहीं. ४७ माझें भाग्य थोर खरे. म्हणूनच श्रोत्यांनी अर्थ व परमार्थ यांच्या साह्यानें मला पूर्णपणें संभाळून घेतलें. ४८ पुढेंहि या ग्रंथाचें जेथें व्याख्यान होईल, जेथें कथाकीर्तन होईल तेथेंहि असेंच लक्ष द्यावें, अशी मज दीनाची प्रार्थना आहे. ४९ ही प्रार्थना ऐकून श्रोत्यांना संतोष झाला. ते म्हणाले, ही कथा आमचा प्राणच आहे. जेथें याचें निरूपण होईल तेथें आम्ही आहोंच. ५५० याप्रमाणें श्रोते संतुष्ट झाले आणि वर देऊन जनार्दन प्रसन्न झाला. एका जनार्दनाला शरण गेला व ग्रंथ संपूर्ण झाला. ५१ महामुक्तीचें क्षेत्र जें वाराणसी, जेथें विक्रम शकाच्या वृषसंवत्सरांत शके सोळाशें तीसमध्यें जनार्दनकृपेनें एकनाथानें ही टीका लिहिली. ५२ अत्यंत मंगलकारक कार्तिक महिन्यांत शुद्ध पौर्णिमेच्या दिवशीं सोमवारीं शिवयोगावर ही एकादश स्कंधावरील टीका समाप्त झाली. ५३ आतां स्वदेशाचा शक व संवत्सर ऐका. दंडकारण्यांतील श्रीरामक्षेत्र; गोदावरीच्या तीरावरील पैठण गांव, तेथील उच्चार ऐका. ५४ शालिवाहन शक चवदाशें पंचाणव श्रीमुखनाम संवत्सर या वर्षीं ही अपूर्व टीका केली. ५५ याप्रमाणें एकादश-

उभयदेशआवांका । बोलिला नेटका शकसंवत्सर ॥ ५६ ॥ पंधराशतें श्लोक सुरस । एकतीस अध्याय ज्ञानरहस्य । स्वमुखें बोलिला हृषीकेश । एकाकी एकादश दुजेनिवीण ॥ ५८ ॥ एकादश म्हणिजे एक एक । तेथ दुजेपणाचा न रिघे अंक । तेंचि एकादश इंद्रियीं सुख । एकत्वें अलोलिक निडारलें पूर्ण ॥ ५८ ॥ त्या एकादशाची टीका । एका रस करी एका । ते एकत्वाच्या निजसुखा । फळेल साधकां जनार्दनकृपा ॥ ५९ ॥ हा ज्ञानगर्भ चिद्रत्न । यथार्थ अर्थविला संपूर्ण । माझेनि नांवें श्रीजनार्दन । ग्रंथकर्ता आपण स्वयें जाहला ॥ ५६० ॥ एका जनार्दना शरण । जनार्दना पढियें एकपण । जेवीं कां सूर्याचे किरण । सूर्यतेजें पूर्ण निरसी तम ॥ ६१ ॥ तेवीं जनार्दनतेजें जाण । प्रकाशलें एकपण । तेणें प्रकाशें ग्रंथ संपूर्ण । जनार्दनार्पण एकपणेंसीं ॥ ६२ ॥ जनीं जनार्दन एक । जाणे तो सुटला निःशेख । हेंचि नेणोनियां लोक । गुंतले अनेक भवचक्रीं ॥ ६३ ॥ इति श्रीभागवते महापुराणे परमहंससंहितायां एकादशस्कंधे एकाकारटीकायां मौसलोपाख्यानं नाम एकत्रिंशोऽध्यायः ॥ ३१ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवतमहापुराणे एकादशस्कन्धे मौसलोपाख्यानं नाम एकत्रिंशोऽध्यायः ॥ ३१ ॥

स्कंधावरील टीका जनार्दनकृपेनें एकनाथानें केली. तिचाच दोन प्रकारचा देश, संवत व शक यांनीं उल्लेख केला. ५६ पंधराशें सरस श्लोक व एकतीस अध्याय, यांत श्रीकृष्णानें स्वतः ज्ञानरहस्य सांगितलें. हा अकरावा स्कंध ऐक्यानें भरलेला आहे. त्यांत दुजेपणा नाहीं. ५७ अकरा म्हणजे एकावर एक. तेथें दोन हा अंकच नाहीं. ५८ अकरा इंद्रियांतील अलौकिक सुख यांत ऐक्यरूपानें भरलें आहे. या अकराव्या स्कंधावरील टीका एकनाथानें एका ब्रह्मरसानेंच केली आहे. ती जनार्दनकृपेनें साधकांसहि एकत्वाच्या आत्मसुखाचें फल देईल. ५९ हा स्कंध म्हणजे ज्ञानरूप चिद्रत्न आहे. माझ्या नांवानें श्रीजनार्दन स्वतः ग्रंथकर्ता झाला व त्यानें माझ्या तोंडून संपूर्ण अर्थ वदविला. ५६० एकनाथ जनार्दनास शरण आहे. जनार्दनाला एकपणा फार आवडतो. सूर्याचे किरण जसे सूर्याच्या तेजानें अंधार पूर्णपणें घालवितात, ६१ तसें जनार्दनाच्या तेजानें एकत्व प्रकाशित झालें व त्यानें संपूर्ण ग्रंथ प्रकाशित केला. तो एकत्वानें जनार्दनाला अर्पण केला आहे. ६२ जनामध्यें एकच जनार्दन आहे हें जो जाणतो तो पूर्णपणें मुक्त होतो. पण हें न जाणल्यामुळेंच अनेक लोक संसारचक्रांत गुंतून पडले आहेत. ५६३.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार

विष्णुशर्मकृत सान्वयार्थ भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील मौसलोपाख्यान-

नांवाचा एकतिसावा अध्याय समाप्त झाला.

येथें एकादशस्कंधहि समाप्त जाहला.

श्रीकृष्णार्पणमस्तु.

आरती.

जयदेव जयदेव जय जनार्दना । परमार्थें आरती अभिन्न भावना ।। ध्रु० ।।
अवलोकितां जन न दिसे जनार्दन । भिन्ना भिन्न कैंचा दावी अभिन्न ।
अनेक एकत्व दिसे परिपूर्ण । थकली मन बुद्धि कैंचा गुण अवगुण ।। १ ।।

ज्योतीचिया ज्योती उजळली दिप्ती । तेणें तेजें झाली सतेज आरती ।
पाहाणें तें पाहाणेंपण पहावया स्थिती । नुरेचि पैं वेगळा देहा नवी तृप्ती ।। २ ।।

उजळितां उजळेना उजळायालागीं । वेगळेपण कैंचें नुरेचि भागी ।
आंगची अर्पिला आंगींचा आंगीं । जीवशीवपण गेलें हारपोनी वेगीं ।। ३ ।।

पाठ ना पोट अवघा निधोट । सर्वांगीं देखणा सर्वा वरिष्ठ ।
विष्ट ना निष्ट गुप्त ना प्रगट । ओहं सोहं सगट भरीयेला घोट ।। ४ ।।

सर्वदा दिसे परी नाकळ मना । जें जें दिसे तें तें दर्शन जाणा ।
अभाव भावनेसी हारली भावना । अभिन्नव आरती एकाजनार्दना ।। ५ ।।

आरत्या नाथांच्या

[१]

आरती एकनाथा । महाराजा समर्था ।। त्रिभुवनीं तूंचि थोर । जगद्गुरु जगन्नाथा ।। ध्रु० ।। 'एकनाथ' नाम सार । वेदशास्त्रांचें गूज ।। संसारदुःख नासे । महामंत्राचें बीज ।। आरती ० ।। १ ।। 'एकनाथ' नाम घेतां । सुख वाटलें चित्ता ।। अनंतगोपाळाची । धणी न पुरे गुण गातां ।। आरती एकनाथा ० ।। २ ।।

[२]

जयदेव जयदेव जय एकनाथा । निर्विकार ब्रह्म तूंचि तत्वता ।। नामें भवकुंजर ताडुनियां लाथा । भक्तप्रतिपाळक कळिकाळ-माथां ।। ध्रु० ।। नानारूपीं चाळक व्यापक तूं एक । म्हणुनी 'एका' नामें पाचारिति लोक ।। ज्याचे नामें न चले विषयाचा पंक । जनार्दनजवळी कीर्तीचा जनक ।। १ ।। निर्मळ गोदातटीं मुनिराज हंस । निर्गुण प्रतिष्ठानीं केला रहिवास ।। लोकत्रयीं मिरवी कीर्तीचा घोष । आचार विचार निर्मळ निर्दोष ।। २ ।। अपर भानुकुळीं उगवला भानू । सूर्याचाही सूर्य देदीप्यमानू ।। कामक्रोध लोभ मद मत्सर मानू । कृपादृष्टी करूनी तरिसि रजरेणू ।। ३ ।। भगवद्भावें करूनी सकळांसी मैत्री । म्हणुनी जन्म विश्वामित्राचे गोत्रीं ।। विश्व तरलें हरिहर-नामाचे मंत्रीं । पाहूं न शके जवळ कळिकाळ नेत्रीं ।। ४ ।। ब्राह्मणतीर्थीं पूजा नामाचा महिमा । सत्कर्में लोटली मोक्षाची सीमा ।। नाना मतांचिया वंदूनी गरिमा । मुक्तेश्वरें तेथें धरियेला प्रेमा ।। जयदेव० ।। ५ ।।

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

श्रीएकनाथकृत चिरंजीवपद

चिरंजीवपद पावावयासी । अधिकार कैसा साधकासी । किंचित् बोलूं निश्चयेंसीं । कळावयासी साधकां ॥ १ ॥ येथें मुख्य पाहिजे अनुताप । त्या अनुतापाचें कैसें रूप । नित्य मरण जाणे समीप । न मनी अल्प देहसुख ॥ २ ॥ म्हणे नरदेह किमर्थ निर्मिला । तो मीं विषयस्वार्थीं लाविला । थिता परमार्थ हातिंचा गेला । करी वहिला विचार हा ॥ ३ ॥ ऐसा अनुताप नित्य वाहतां । तंव वैराग्य ये तयाच्या हाता । त्या वैराग्याची कथा । ऐक आतां सांगेन ॥ ४ ॥ तें वैराग्य बहुतां परी । आहे गा हें अवधारीं । सात्त्विक-राजस-तामस त्रिप्रकारीं । योगीश्वरीं बोलिजे ॥ ५ ॥ नाहीं वेदविधि आचार । नेणें सत्कर्म साचार । कर्मधर्मीं भ्रष्टाकार । तो अपवित्र 'तामस' ॥ ६ ॥ त्याग केला पूज्यतेकारणें । सत्संग सोडूनि पूजा घेणें । शिष्यममता धरोनि राहणें । तें जाणणें 'राजस' ॥ ७ ॥ हे वैराग्य राजस तामस । तें न मानेच संतांस । तेणें न भेटे कृष्ण परेश । अनर्थास मूळ तें ॥ ८ ॥ आतां वैराग्य शुद्ध 'सात्त्विक' । जें मी जगद्वंद्य मानी यदुनायक । तें तूं सविस्तर ऐक । मनीं निष्टंक बैसावया ॥ ९ ॥ भोगेच्छा विषयक । ते तो सांडी सकळिक । प्रारब्धें प्राप्त होतां देख । तेथोनी निष्टंक अंग काढी ॥ १० ॥ कां जे विषय पांच आहेती । ते अवश्य साधकां नाडिती । म्हणोनि लागों नेदी प्रीती । कवणें रीतीं ऐक पां ॥ ११ ॥ जेणें धरिला शुद्ध परमार्थ । त्यासी जनमान हा करी अनर्थ । तेणें वाढे विषयस्वार्थ । ऐक नेमस्त विचार हा ॥ १२ ॥ वैराग्य पुरुष देखोनी । त्याची स्तुति करिती जनीं । एक सन्मानेंकरोनी । पूजेलागोनि पैं नेती ॥ १३ ॥ त्याचें वैराग्य कोमळ कंटक । नेट न धरीच निष्टंक । देखोनि मानस्तुति अलोलिक । भुलला देख पैं तेथें ॥ १४ ॥ जनस्तुति लागे मधुर । म्हणती उद्धरावया हा हरीचा अवतार । आम्हांलागीं जाहला स्थिर । तेणें तो धरी फार 'शब्दगोडी' ॥ १५ ॥ हा पांच विषयांमाजीं प्रथम । 'शब्द' विषयसंभ्रम । मग 'स्पर्श' विषय सुगम । उपक्रम तो ऐसा ॥ १६ ॥ नाना मृदु आसनें घालिती । विचित्र पर्यंक निद्रेप्रती । नरनारी शुश्रूषा करिती । तेणें धरी प्रीती स्पर्शाची ॥ १७ ॥ 'रूप' विषय कैसा गोंवी । वस्त्रें भूषणें देती बरवीं । सौंदर्य करी जीवीं । देहीं भावीं श्लाघ्यता ॥ १८ ॥ रूप विषय ऐसा जडला । 'रस' विषय कैसा झोंबला । जें जें आवडे तयाला । त्या त्या पदार्थाला अर्पिती ॥ १९ ॥ ते रसगोडी-करितां । घडी न विसंबे धरी ममता । मग 'गंध' विषय ओढिता । होय तत्त्वतां त्या कैसा । ॥ २० ॥ आवडे सुमन चंदन । बुका केशर बिलेपन । ऐसे पांचही विषय जाण । जडले संपूर्ण सन्मानें ॥ २१ ॥ मग जे जे जन वंदिती । तेचि त्याची निंदा करिती । परि अनुताप नुपजे चित्तीं । ममता निश्चितीं पूजकांची ॥ २२ ॥ म्हणाल 'विवेकी जो आहे । त्यासी जनमान करील काय'। हें बोलणें मूर्खाचें पाहें । जया चाड आहे मानाची ॥ २३ ॥ ज्ञात्यांसी प्रारब्धगतीं । मान झाला तरी नेघों न म्हणती । परी तेथेंचि गुंतोनि न राहती ।

उदास होती तत्काळ ॥ २४ ॥ यापरी साधकाच्या चित्तां । मानगोडी न संडे सर्वथा । जरी कृपा उपजेल भगवंता । तरी होय मागुता विरक्त ॥ २५ ॥ तो विरक्त कैसा म्हणाल । जो मानलें सांडी स्थळ । सत्संगीं राहे निश्चिळ । न करी तळमळ मानाची ॥ २६ ॥ मांडीना स्वतंत्र फड । म्हणे अंगा येईल अहंता वाड । धरूनि जीविकेची चाड । न बोले गोड मनधरणीं ॥ २७ ॥ नावडे प्रपंच-जनीं बैसणें । नावडे कोणासी बोलणें । नावडे योग्यता मिरवणें । बरवें खाणें नावडे ॥२८॥ नावडे लौकीक परवडी । नावडती लेणीं लुगडीं । नावडे परान्नगोडी । द्रव्यजोडी नावडे ॥ २९ ॥ नावडे स्त्रियांत बैसणें । नावडे स्त्रियांतें पाहणें । नावडे स्त्रियांचें रगडणें । त्यांचें बोलणें नावडे ॥ ३० ॥ नको नको स्त्रियांचा सांगात । नको नको स्त्रियांचा एकांत । नको नको स्त्रियांचा परमार्थ । करिती आघात पुरुषासी ॥ ३१ ॥ म्हणाल ' गृहस्थ साधकें । स्त्रियां सांडोनि जावें कें '। येच अर्थीं उत्तर निकें । एक आतां सांगेन ॥ ३२ ॥ तरी स्वस्त्रियेवांचोनी । नातळावी अन्य कामिनी । कोणे स्त्रियेसी सन्निधवाणी आश्रयो क्षणीं न द्यावा ॥ ३३ ॥ स्वस्त्रीसंही कार्यापुरतें । बोलावें स्पर्शावें निरुतें । परी आसक्त होऊनियां तेथें । सर्वथा चित्तें नसावें ॥ ३४ ॥ नरनारी शुश्रूषा करिती । भक्ति ममता उपजविती । परी शुद्ध जो परमार्थी । तो स्त्रियांचे संगतीं न बैसे ॥ ३५ ॥ अखंड एकांतीं बैसणें । प्रमदासंगें न राहणें । जो निःसंग निरभिमानें । त्यापें बैसणें सर्वदा ॥३६॥ कुटुंब-आहाराकारणें । अकल्पित न मिळे तरी कोरान्न करणें । ऐसें स्थिती जें वर्तणें । तें जाणणें शुद्ध वैराग्य ॥ ३७ ॥ ऐसी स्थिती नाहीं ज्यासी । तंव कृष्णप्राप्ती कैंची त्यासी । यालागीं कृष्णभक्तांसी । ऐसी स्थिती असावी ॥३८ ॥ या स्थिती-वेगळा जाण । कृष्णीं मिळूं पाहे तो अज्ञान । तो सकळ मूर्खांचें अधिष्ठान । लटिकें तरी आण देवाची ॥ ३९ ॥ हें बोलणें माझिये मतीचें । नव्हे नव्हेचि गा साचें । कृष्णें सांगितलें उद्धवा हिताचें । तें मी साचें बोलिलों ॥ ४० ॥ साच न मानी ज्याचें मन । तो विकल्पें न पावे कृष्णचरण । माझें काय जाईल जाण । मी तों बोलोन उतराई ॥ ४१ ॥ साधावया वैराग्य ज्ञान । मनुष्यदेहीं करावा प्रयत्न । सांगे एका जनार्दन आणीक यत्न असेना ॥ ४२ ॥